महाराष्ट्राचे
शिल्पकार

# तेजस्विनी अहिल्याबाई होळकर



2

विजया जहागीरदार

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

# तेजस्विनी
# अहिल्याबाई होळकर

विजया जहागीरदार

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

महाराष्ट्राचे शिल्पकार : क्र. १२
प्रथमावृत्ती : जानेवारी २००३
द्वितीय आवृत्ती : फेब्रुवारी २००५
तृतीय आवृत्ती : फेब्रुवारी २००६

प्रकाशक :
सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय इमारत,
१७२, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय मार्ग,
दादर, मुंबई - ४०० ०१४.

© प्रकाशकाधीन

मुद्रक :
प्रमोद भोगटे
स्नेहेश प्रिंटर्स
३२०-ए, शाह अँड नाहर इंड. इस्टेट अ-१,
धनराज मिल आवार, सीताराम जाधव मार्ग,
लोअर परळ, मुंबई-१३. (दूरध्वनी : २४९४५६१५)

मुखपृष्ठ : राजा बडसल

किंमत : रु. ३५/-

या पुस्तकात व्यक्त केलेली मते स्वत: लेखकाची असून या मतांशी साहित्य आणि संस्कृती मंडळ व महाराष्ट्र शासन सहमत असेलच असे नाही.

# दुसऱ्या आवृत्तीच्या निमित्ताने

## स्वयंप्रकाशी कर्तृत्वाला अभिवादन

'महाराष्ट्राचे शिल्पकार' या योजने अंतर्गत अहिल्यादेवीच्या चरित्राची दुसरी आवृत्ती निघत आहे. अहिल्यादेवीने आपल्या कर्तृत्वाने महाराष्ट्रात नव्हे तर भारतात आपला ठसा उमटवला. १७२४च्या सुमारास अहिल्या देवींचा जन्म झाला. जन्मापासून १७३३ पर्यंत आई-वडिलांच्या घरी बाल्यावस्था गेली. १७३३ मध्ये विवाहानंतर घरची सेवा चालू होती. १७५४ मध्ये सूरजमल जाटची लढता लढता कुंभेरच्या लढाईत अहिल्यादेवीचे पति युद्धात मारले गेले. १७६६ मध्ये सासरे मल्हारराव होळकर यांच्या निधनानंतर संपूर्ण राज्याची जबाबदारी त्यांच्यावर येऊन पडली. १७६६ ते १७९९ त्यांच्या जीवनातील स्वयंकर्तृत्वाचा आणि भारतीय महिलेच्या महान मुत्सद्देगिरीचा-न्यायनिपुण-नितीचा धैर्यशाली धोरणाचा गौरवशाली कालखंड होता.

## ही तर रणरागिणी प्रजा वत्सल राणी

ज्या समाज रचनेत कोणतीही उन्नतीची साधने स्त्रियांना उपलब्ध नसताना, त्याकाळी या महान कर्तृत्व शालिनीने 'पति' बरोबर 'सति' न जाता प्रजापालन करण्यासाठी जीवन जगण्याचा स्वीकार केला!! ही प्रजा वत्सल राणी जनमानसाच्या डोळ्यातील पाणी पुसणारी खरी लोकमंगल माता झाली!!

संपूर्ण भारतात त्यांचे नांव अत्यंत श्रद्धेने गौरवले गेले आहे. अत्यंत समृद्ध अशा राज्याची स्वामीनी असूनही आपली सर्व संपत्ती लोककल्याणार्थ खर्च केली. मंदिरे आणि तीर्थस्थाने यांना संरक्षण दिले. भारतीय शिल्प, कला, साहित्य आणि संस्कृती यांची अमोल सेवा केली. भारताच्या राज्य प्रशासनात त्यांच्या कार्याचे स्थान अढळ आहे. सर्व स्वकीयांना इंग्रज फिरंग्या विरुद्ध एकत्र होण्याचे त्यांनी आवाहन

केले. त्यांनी पुढील संकट ओळखले होते - अशी दूरदृष्टी - अशी प्रजा वत्सल समदृष्टी आणि कर्तृत्व सृष्टी - असलेल्या अहिल्या देवीचे या महान लोकमातेचे चरित्र प्रकाशित करण्यासाठी माजी अध्यक्ष प्राचार्य रा. रं. बोराडे, प्रभारी सचिव, उ. बा. सूर्यवंशी, श्री. ज. शं. साळवी व श्रीमती छा. दि. गोडांबे आणि मंडळाचे कर्मचारी यांचे मोलाचे सहकार्य लाभले, त्याबद्दल आभार. वाचक वर्ग उत्साहाने स्वागत करतील अशी आशा आहे.

प्रा. रतनलाल सोनग्रा

अध्यक्ष,

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

मुंबई,

दिनांक २९ डिसेंबर, २००४

# निवेदन

महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, आर्थिक व वैचारिक जडणघडणीत ज्या दिवंगत महनीय व्यक्तींचा महत्त्वपूर्ण सहभाग आहे अशा व्यक्तींची साधारणत: शंभर ते सव्वाशे पानांची सुबोध मराठी भाषेत चरित्रे लिहून ती ''महाराष्ट्राचे शिल्पकार'' या योजनेअंतर्गत पुस्तकरुपाने प्रकाशित करण्याची मंडळाने योजना आखली असून या चरित्रग्रंथमालेतील ''तेजस्विनी अहिल्याबाई होळकर'' हा बारावा चरित्रग्रंथ आहे.

या चरित्रग्रंथाच्या लेखिका श्रीमती विजया जहागीरदार यांनी या चरित्रग्रंथाच्या प्रारंभी जे मनोगत व्यक्त केले आहे त्या मनोगतात ''त्या पुण्यशील, धार्मिक म्हणून तर अवघ्या जगास माहीत. ठिकठिकाणचे घाट, देवळे, धर्मशाळा, अन्नछत्रे, विहिरी, तळी, कुंडे, रस्ते, यासारखे प्रचंड कार्य तर आसेतुहिमाचल पसरलेले आहे. पाणपोया, अन्नछत्रे आज दोनशे वर्षानंतरही चालू आहेत. हे कार्य अनेक मुखाने त्यांची धर्मपरायणता आणि औदार्य गर्जून सांगत आहे. परंतु आश्चर्याने थक्क करतं ते त्यांचं अपार शहाणपण, मुत्सद्दीपण, ज्ञानलालसा, असामान्य तडफ, हिशोबातली समूळ पारंगतता, तेज, झुंज घेण्याचा खंबीरपणा! प्रजावत्सलता, अचूक न्यायदान, आत्मविश्वास, पुरुषार्थ, रणकौशल्य, संरक्षणव्यवस्था, गुप्तहेर खाते, स्वाभिमान, राज्यकारभाराची जाण, रणकौशल्य आणि माणुसकीशी घट्ट नातं असणारं परदु:खकातर असं मन! श्रीमंतांच्या गादीशी असलेली निष्ठा, जिद्द, बाणेदार वृत्ती, साधी राहणी आणि कल्याणकारी विचारसरणी. या अनेक सद्गुणांचे, त्यांच्या तेजस्वी वागण्याचे, पुरावे इतिहासाच्या पानोपानी आहेत. त्यांची ही स्वाभिमानी आणि तेजस्वी बाजूसुद्धा सर्वांना कळावी, याचा ध्यास मला लागला.'' असे नमूद केले आहे.

त्यांचे हे मनोगत इतके बोलके आहे की, या ग्रंथाच्या संदर्भात मी काही वेगळे लिहिण्याची आवश्यकता आहे, असे मला वाटत नाही.

या चरित्रग्रंथमालेतील यापूर्वी प्रसिद्ध झालेल्या अकरा चरित्रग्रंथांना मराठी वाचकांनी जसा भरघोस प्रतिसाद दिला त्या प्रमाणेच याही ग्रंथाला मराठी वाचक प्रतिसाद देतील, अशी अपेक्षा आहे.

रा. रं. बोराडे

अध्यक्ष,

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

मुंबई.

दिनांक : २६ जानेवारी, २००३

# मनोगत

गेली कित्येक वर्षे माझं मन अहिल्यादेवींनी व्यापून टाकलं आहे. त्यातूनच सहा वर्षे अनेक पुस्तकांचे वाचन करून, अभ्यास करून 'कर्मयोगिनी' ही ३०० पानी चरित्र कादंबरी इतिहासाशी इमान राखून लिहिली. मध्यप्रदेश साहित्य ॲकॅडमीने त्या कादंबरीस भा. रा. तांबे पुरस्कार देऊन यथोचित गौरव केला. त्यानंतर मुलांसाठी लोकमाता हे कथांचे पुस्तक लिहिले.' (दिलीप महाजन - मोरया प्रकाशन - डोंबिवली) आणि आज 'तेजस्विनी' हे देवींचे चरित्र लिहिले आहे. कितीही लिहिले तरी या अपूर्व स्त्रीचे वर्णन पूर्ण होत नाही.

त्या पुण्यशील, धार्मिक म्हणून तर अवघ्या जगास माहीत. ठिकठिकाणचे घाट, देवळे, धर्मशाळा, अन्नछत्रे, विहिरी, तळी, कुंडे, रस्ते, यासारखे प्रचंड कार्य तर आसेतुहिमाचल पसरलेले आहे. पाणपोया, अन्नछत्रे आज दोनशे वर्षांनंतरही चालू आहेत. हे कार्य अनेक मुखाने त्यांची धर्मपरायणता आणि औदार्य गर्जून सांगत आहे. परंतु आश्चर्याने थक्क करतं ते त्यांचं अपार शहाणपण, मुत्सद्दीपण, ज्ञानलालसा, असामान्य तडफ, हिशोबातली समूळ पारंगतता, तेज, झुंज घेण्याचा खंबीरपणा! प्रजावत्सलता, अचूक न्यायदान, आत्मविश्वास, पुरुषार्थ, रणकौशल्य, संरक्षणव्यवस्था, गुप्तहेर खाते, स्वाभिमान, राज्यकारभाराची जाण, रणकौशल्य आणि माणुसकीशी घट्ट नातं असणारं परदु:खकातर असं मन! श्रीमंतांच्या गादीशी असलेली निष्ठा, जिद्द, बाणेदार वृत्ती, साधी राहाणी आणि कल्याणकारी विचारसरणी. या अनेक सद्‌गुणांचे, त्यांच्या तेजस्वी वागण्याचे, पुरावे इतिहासाच्या पानोपानी आहेत. त्यांची ही स्वाभिमानी आणि तेजस्वी बाजूसुद्धा सर्वांना कळावी याचा ध्यास मला लागला, त्यामुळेच हे लेखन तळमळीने झाले आहे. काही टीकाकारांनी त्यांच्या दानधर्मात होणाऱ्या पैशांच्या उधळपट्टीला दोष दिलेला मी वाचला, अन् त्याचवेळी त्यामागची भूमिका आणि अनेक सद्‌गुण, सर्वांना कळलेच पाहिजे असं प्रकर्षाने वाटलं. पहिलीच गोष्ट अशी की दान हे आपल्या संस्कृतीचे वरदान आहे. त्याला कुणी उधळपट्टी म्हणत नाहीत. हा दानधर्म, इतकेच नव्हे तर अनेक मंदिरे, तळे, धर्मशाळा त्यांनी त्यांच्या खाजगी उत्पन्नातून केलेल्या आहेत. 'खाजगी खर्चाची पैसुद्धा सरकारी तिजोरीवर पडू नये.' हे त्यांचे ब्रीदवाक्य होते. त्यांच्यावर कोसळलेले कौटुंबिक आघात पाहिले तर त्यांच्या धार्मिक वृत्तीस दोष देण्याचे धारिष्ट्य कुणालाच होणार नाही. पती खंडेरावांचा अकाली मृत्यू,

त्यांच्याबरोबर सती गेलेल्या नऊ सवती! गौतमाबाई आणि मल्हारराव यांचे मृत्यू जरी वयोमानाप्रमाणे झाले तरी अहिल्याबाईंचा आधारच निखळून पडला. मल्हाररावांच्या दोन बायकांना सती जातांना त्यांना पाहावं लागलं. याहूनही भयानक आघात पुढे होतेच. पुत्र मालेराव अवघ्या बावीस वर्षाच्या तरुण वयात मृत्यूमुखी पडला. त्याच्या दोन बायका सती गेल्या. मुक्ता ही मुलगी. तिचा मुलगा नथूही बावीसाव्या वर्षी क्षयाला बळी पडला. त्या दोन चिमण्या नातसुनांचं सती जाणं, त्यांना बघणं, त्यांच्या दुर्दैवात होतं. शेवटी मुक्ता फक्त राहिली होती. जावई यशवंतराव फणसे कॉलऱ्याचा बळी ठरले आणि मुक्ता तिच्या दोन सवतींसह सती गेली. एकूण पांच जिवलगांचे मृत्यू आणि अठरा सतींच्या किंकाळ्या ज्यांनी ऐकल्या त्यांच्या वेदनांचं, दु:खाचं वर्णन कोण आणि कसं करणार? तरीही ही बाणेदार स्त्री शेवटपर्यंत कुणालाही शरण न जाता कठोर कर्मयोग आचरत राहिली. तुकोजीची कर्जे निवारत, पैसा पुरवित राहिली. त्यांच्या कर्तव्यकर्माचा पट मोठा आहे. बुद्धीचा आवाका दांडगा, सामर्थ्य थोर आहे!

हे सारे वाचकांना एकत्रितपणे कळावे म्हणून चरित्रकथनानंतरही मी चार प्रकरणे यात घातली आहेत. एकंदर आढावा, रुढीपरंपरा, मूळ तत्त्वे आणि कूटनीती या प्रकरणातून त्यांच्या राज्यकारभाराचे चित्र स्पष्ट होते. महाराष्ट्रात ठिकठिकाणी अहिल्याबाईंच्या खुणा आहेत. त्यांचे कार्य वेगवेगळ्या रूपात उभे आहे. अहिल्याबाईंनी केलेला दानधर्म प्रजेच्या सुखासाठी केला. त्यांच्या औदार्याचा परिणाम त्यावेळच्या इतर राजांवरही झाला आणि तेही दानधर्म करू लागले. औदार्याचे बीज पेरण्याचे फार मोठे कार्य त्यांनी केले. पुणे ही राजधानी असल्यामुळे पुणे दरबारी अहिल्यादेवींची तेजस्वी छाप पडली होती. 'पुणे दरबारचे पुण्यद्वार महेश्वर आहे.' असे खुद्द पेशव्यांनी म्हटले आहे.

अहिल्याबाईंनी दिलेल्या कित्येक गावाच्या जहागिऱ्या वंशपरंपरेने चालत होत्या. कूळकायदा १९५५ साली आल्यानंतर त्या जहागिऱ्या विलीन करण्यात आल्या.

महाराष्ट्राच्या सामाजिक, धार्मिक, जीवनावर अहिल्याबाईंचा फार मोठा ठसा उमटलेला आपल्याला दिसतो. आज दोनशे वर्षानंतरही त्यांचे नांव ताजेतवाने आहे, हेच त्यांच्या कर्तृत्वाचे फार मोठे गमक आहे.

अहिल्यादेवी लोकमाता होत्या, पुण्यश्लोक होत्या. त्यांचे हे चरित्र अनेकांना धैर्य, शौर्य, स्फूर्ती, सामर्थ्य देवो अशी इच्छा व्यक्त करून, त्यांना अभिवादन, प्रणिपात आणि नमस्कार करून पूर्णविराम देते आणि हे चरित्र लोकार्पण करते.

**-सौ. विजया जहागीरदार**

१ सोना मोती अपार्टमेंट,
५६०/५८ दक्षिण सदर बाजार, सोलापूर-४१३ ००३.

# अनुक्रमणिका


कर्मयोगिनी अहिल्याबाई ........ २
मल्हारराव होळकरांच्या आधीचा काळ ........ ४
मल्हाररावांचा परिचय ........ ६
अहिल्येचा गृहप्रवेश ........ ८
सद्गुणांची खाण - अहिल्या ........ १२
खंडेराव ........ १५
कुंभेरीचा वेढा - खंडेरावाचा मृत्यू ........ १७
उत्तरक्रिया ........ १९
कारभार ........ २१
पानिपतचा संग्राम ........ २४
मल्हाररावांचा मृत्यू ........ २५
अहिल्यापुत्र मालेरावास सुभेदारी ........ २९
मालेरावांची अंदाधुंदी ........ ३१
रघुनाथरावांची फजिती ........ ३३
चंद्रावतांशी युद्ध ........ ३७
अहिल्यादेवींचे कामकाज ........ ४०
बाणेदारपणा ........ ४८
अहिल्याबाईची खाजगी तिजोरी ........ ५१
मोरोपंत ........ ५३
नथोबाचा मृत्यू ........ ५५
शिंदे होळकर ........ ५७
खुन्या मुरलीधराची कथा ........ ५९
निजामाशी लढाई ........ ६२

अखेरचा श्रावण ........................................................................ ६४

दानाने धनशुद्धी होते. ................................................................. ६७

समकालीनांच्या दृष्टिकोनातून अहिल्यादेवी ........................................ ७२

अहिल्या ते लोकमाता ................................................................. ७६

राज्यशासक ............................................................................... ७८

अहिल्याबाईंच्या कारकीर्दीचा आढावा .............................................. ८१

अहिल्याबाई आणि रुढीपरंपरा ...................................................... ८८

मूळ तत्त्वे ................................................................................... ९३

कूटनीतीज्ञ अहिल्यादेवी ............................................................... ९६

कालानुक्रम ............................................................................... १०५

नातेवाईक ................................................................................ १०७

ग्रंथसूची आणि आभार ................................................................ १०९

# तेजस्विनी

## अहिल्याबाई होळकर यांचे चरित्र

इतिहासाने पानोपानी...
जिची गाईली गाथा!
होळकरांची तेजस्वी ती...
पुण्यश्लोक माता!

# कर्मयोगिनी अहिल्याबाई

हे चरित्र आहे अहिल्याबाई होळकर यांचे! लोकमाता, पुण्यश्लोक, देवी, गंगाजळ निर्मळ, या सगळ्या पदव्या, अहिल्याबाई होळकरांना लोकांनी अर्पण केल्या होत्या. मनापासून, हृदयापासून! कुठलाही पदवीदान समारंभ न होताही, या पदव्या आज दोनशे वर्षे टिकून आहेत. टिकणार आहेत. अत्यंत प्रेमाने त्यांनी सामान्य माणसाचे हित बघितले. प्रजेतील गरिबांना जास्तीत जास्त सुखाने जगता यावं, इकडे लक्ष दिले. त्या धार्मिक होत्या हे तर, सर्वांना माहित आहे, परंतु एक राज्यशासक म्हणून त्यांचे कर्तृत्व फार महत्त्वाचे आहे. अपार शहाणपण आणि तडफ असणारी ती अलौकिक स्त्री होती. खंबीर मन आणि चातुर्य यामुळे, अनेक संकटे त्यांनी पार केली. न्यायदान तर इतके अचूक की, भांडणाऱ्या दोन्ही बाजू त्यांना दुवा देत. रणनीतीची त्यांना जाण होती. एका नजरेत हिशोब करण्यात त्या तरबेज होत्या. प्रजावत्सलता आणि परदु:खाने व्याकूळ होणारं मन, त्यांना लाभलं होतं. त्या स्वत: रणांगणात युद्धाला उतरत! तोफा ओतणे, जंबुऱ्याच्या गोळ्या तयार करणे, याचे शास्त्र त्यांना माहीत होते. घोड्यावर स्वार होण्याचे कौशल्य तर होतेच, पण त्यांनी स्त्रियांचे सैनिकदलही तयार केले होते. मातीवर, देशावर निष्ठा, बाणेदार वृत्ती, साधी राहाणी, उच्च चारित्र्य हे त्यांचे विशेष! त्यांचे कौटुंबिक जीवन अत्यंत दु:खी, काळेकुट्ट असे होते. पण प्रशासन धवलशुभ्र, निष्कलंक असे! मला या चरित्रातून त्यांच्या या अनेक गुणांचा परिचय करून द्यायचा आहे. त्या धार्मिक होत्या पण धर्मांध नव्हत्या. ठिकठिकाणचे घाट, देवळे, धर्मशाळा, विहिरी, रस्ते असे त्यांचे कार्य आहे. अन्नछत्रे आणि पाणपोया आजही चालू राहिल्या आहेत. अनेकजण आपली भूकतहान तिथे शांत करीत आहे. हे सारे कार्य जातीधर्मात अडकलेले नाही. सर्व धर्मियांसाठी त्यांनी मदत केली. म्हणूनच केवळ 'धार्मिक' इतकीच त्यांची ओळख नाही. त्यांच्या दूरदृष्टीमुळे त्यांनी केलेले कार्य आजही जिवंत आहे कारण मंदिरे, दर्गे, अन्नछत्रे वगैरे ठिकाणी त्या त्या कार्याच्या खर्चासाठी त्यांनी सालीना उत्पन्न करून ठेवले. त्यांची ही दूरदृष्टी चकित करणारी आहे. त्यांच्यात अनेक सद्गुण बहरास आलेले होते. अठरा सतींच्या किंकाळ्या

आणि सर्व जीवलगांचे मृत्यू त्यांना बघावे लागले. शेवटी त्या एकट्या राहिल्या. संसाराचा हा उन्हाळा सोसून, ही बाणेदार स्त्री, कुणालाही शरण न जाता कर्तव्यकठोर असा कर्मयोग आचरत राहिली. प्रजेचं सुख बघत राहिली. दु:खाला खंबीरपणे सामोरे जातांनाही आपले कर्तव्य ठामपणे त्यांनी केले. हे सर्व वाचकालाही सामर्थ्य, शक्ति देणारे आहे. तेजस्विनी वाचून वाचकाला निश्चितपणे आत्मविश्वास मिळेल. तेवढे सामर्थ्य अहिल्यादेवींच्या चरित्रात आहे आणि तेच मला प्रामुख्याने अधोरेखित करीत लिहायचे आहे.

✡

# मल्हारराव होळकरांच्या आधीचा काळ

सुमारे अडीचशे वर्षांपूर्वी मोहम्मद शहाची राजवट चालू होती. त्यावेळी माळवा प्रांतावर, दयाबहादूर राज्य करीत होता. मोहम्मद शहा सुखोपभोगात दंग होता. मोंगलांचे विस्तृत साम्राज्य अत्यंत स्वार्थी आणि लोभी माणसांच्या हातात सापडले होते. दयाबहादूर त्यातलाच एक! हा प्रजेचा अतोनात छळ करीत असे. त्याच्या अत्याचारांना प्रजा अगदी कंटाळून गेली होती. दयाबहादूरच्या राज्यात मोगल सम्राटांतर्फे राव नंदलाल यांना प्रमुख अधिकारी नेमण्यात आले. कर वसूल करण्याचे काम तेच करीत. आपल्या फौजेसह ते इंदुरास राहात. त्यामुळे दयाबहादूर प्रजेवर करत असलेले अत्याचार, त्यांना समक्ष दिसत. त्यांना प्रजेचा हा छळ सहन करणे कठीण होत होते. राव नंदलाल दयाबहादूरला सतत समजावत. अत्याचार, छळ थांबव अशी विनंती करीत. पण स्वार्थी दयाबहादूर लोभाने पिसाट झाला होता. अखेर राव नंदलाल बादशहांकडे गेले. त्यांना माळव्याची दयनीय स्थिती सांगितली. पण बादशहा आपल्या अधिकाऱ्यांवर वचक ठेवू शकला नाही. अधिकाऱ्यांना धाक उरला नव्हता. अखेर राव नंदलाल निराश होऊन परत आले. बादशहाने राव नंदलालांची तक्रार ऐकून घेतली नाही हे कळताच दयाबहादूरला आनंद झाला. तो अधिकच शिरजोरी करू लागला. राव नंदलाल दयाळू होते. माळव्याच्या लोकांचा छळ त्यांना बघवेना. राव नंदलाल बादशहाला दरवर्षी २५००० रुपयांचा वसूल देत. तो त्यांनी बंद केला आणि बादशहास कळवले की, 'माळव्याच्या लोकांवर दयाबहादूरकडून जे अन्याय चालू आहेत ते यापुढे सहन केले जाणार नाहीत. आपल्या पाठिंब्यामुळेच दयाबहादूर शिरजोर झाला आहे.' पण बादशहा केवळ उपभोगात दंग होता. त्याला हे ऐकण्यास वेळ नव्हता. कारवाई करण्यास वेळ नव्हता.

त्या काळात थोरले बाजीराव पेशवे, प्रजेच्या सुखासाठी, साम्राज्याचा विस्तार करण्यासाठी आटोकाट प्रयत्न करीत होते. राव नंदलाल यांनी पेशव्यांना पत्र पाठवून माळव्यातील लोकांचे हाल त्यांना कळवले. बादशहा आणि दयाबहादूर यांच्याकडून होत असलेल्या प्रजेच्या छळाची पूर्ण वार्ता कळवली आणि पुढे

लिहिले की, 'आपण जर माळव्यावर चढाई केली तर मी आपणास सर्व तऱ्हेची मदत करेन.' थोरले बाजीराव अत्यंत शूर होते. त्यांनी लगेच मल्हारराव होळकरांना माळव्यावर चढाईसाठी पाठवले. राव नंदलाल यांनी भेरूघाटाच्या मार्गाने सैन्यास माळव्यात घुसविले. हे बघताच दयाबहादूर राव नंदलाल यांचे पाय धरू लागला. त्यांना अनेक प्रलोभने दाखवली. अधिकाराची पदे देऊ केली. पण राव नंदलाल आपल्या निश्चयापासून तसूभरही दूर गेले नाहीत. दयाबहादूर अखेर भीतीने फौजेसकट पळाला आणि अखेर १२ ऑक्टोबर १७३१ रोजी मारला गेला. मल्हाररावांनी माळव्यावर मराठ्यांचा झेंडा रोवला.

त्याच काळात अफगाण, फ्रेंच उदयास येऊ लागले होते. त्यांनी व्यापाराच्या निमित्ताने भारतात प्रवेश केला होता. इंग्रजांचे पाऊलही पुढे पडत होते. सिंध, पंजाब, काश्मीर यावर अधिकार करत अहमदशाह अब्दाली पुढे सरकत होता. पोर्तुगालने काही स्थाने घेतली होती. उत्तर भारताची स्थिती खालावत चालली. सर्वत्र अराजक आणि अशांतता पसरली होती. यामुळे शूर मराठ्यांच्या शौर्याला, पराक्रमाला जणु आमंत्रणच मिळाले. मराठ्यांनी याचा पुरेपूर फायदा घेतला.

त्या काळात महाराष्ट्रात फार एकी होती. नसानसातून जणु काही शौर्य पराक्रम सळसळत होता. पेशव्यांचा झेंडा भारतभर फडकवण्यासाठी त्याचे हात शिवशिवत होते. याच काळात पेशव्यांनी भरपूर पैसा आणून आधी आपले राज्य शक्तिमान केले. चौथाई, सरदेशमुखीची वसूली केली. उत्तर भारतात पेशव्यांचा वचक बसवला. अशा रीतीने आपले सामर्थ्य वाढवून पेशव्यांनी बलाढ्य फौजेसह दिल्लीवर मोर्चा नेला. २८ फेब्रुवारी १७१९ रोजी, पेशव्यांनी बादशहाच्या वाड्याला वेढा दिला. २० मार्च रोजी त्यांनी बादशहाकडून तीन सनदा मिळवल्या. त्याद्वारे पेशव्यांना विस्तिर्ण प्रदेशात चौथाई आणि सरदेशमुखी करवसूलीचे अधिकार मिळाले. यावेळी मल्हारराव होळकर पेशव्यांबरोबर होते. मल्हाररावांनी शौर्याची शर्थ केली. ते पेशव्यांचे विश्वासू मित्र झाले. त्यांना बहुमोल अनुभव मिळाला. याच वेळी बाळाजी विश्वनाथ या थोरल्या पेशव्यांचा मृत्यू होऊन १७२० मध्ये बाजीराव पेशवे गादीवर आले. त्यांच्याशी मल्हाररावांचे भावासारखे प्रेमसंबंध निर्माण झाले. हे मल्हारराव होळकर म्हणजेच, अहिल्यादेवी होळकरांचे सासरे. मल्हारराव होळकरांचा पुत्र खंडेराव याच्याबरोबर अहिल्यादेवींचा विवाह झाला. आणि अहिल्याबाईंच्या तेजस्वी गाथेची सुरवात झाली.

✡

# मल्हाररावांचा परिचय

मल्हारराव होळकरांचे जीवन म्हणजे एक शौर्यगाथाच होती. होळकरांचे पूर्वज दक्षिण भारतातील वाफगाव इथे रैहात होते. परंतु काही काळानंतर ते पुणे शहराजवळच्या होळ या गावी स्थायिक झाले. म्हणूनच त्यांना होळकर असे नांव पडले. होळ येथील खंडोजी होळकर गावच्या पाटलाचे मदतनीस होते. त्यांना १६९३ साली पुत्ररत्नाचा लाभ झाला. हा पुत्र म्हणजेच मल्हारराव होळकर. मल्हाररावांनी आपल्या पराक्रमाने, इतिहासात आपले स्वत:चे स्थान निर्माण केले. लहानपणी मेंढ्यांची राखण करणारा मल्हार मोठेपणी इतिहासप्रसिद्ध घटनांचा साक्षीदार झाला. प्रजेचा तारणहार झाला. एका थोर सेनेचा सूत्रधार झाला. असामान्य शौर्य, निष्ठा यांच्या बळावर पेशव्यांचा विश्वासू सुभेदार आणि सल्लागार झाला. त्यांचे चरित्र अत्यंत रोचक आणि स्फूर्तिदायक आहे.

रामनवमीस जन्माला आलेले मल्हारराव, लहानपणापासूनच धाडसी होते. भीती हा शब्दच त्यांना माहित नव्हता. आईवडिलांना त्याचा अभिमान वाटे. हे बाळ पुढे काहीतरी कर्तृत्व करून दाखवेल अशी त्यांना खात्री होती. पण दुर्दैवाने मल्हार तीन वर्षांचा होताच त्याचे पितृछत्र हरपले. खंडोजीचा मृत्यू झाला. आई जिवाईवर आकाश कोसळले. खंडोजीच्या कुटुंबियांनी मल्हारकडे पाठ फिरवली. उलट त्यांच्या वाटेची जमीन हडप करण्याचा उद्योग चालवला. मल्हारच्या जिवालाही धोका होईल अशी जिवाईला भीति वाटली. म्हणून ती छोट्या मल्हारला घेऊन खानदेशातल्या नंदुरबारजवळ असणाऱ्या तळोदे या गावी, आपल्या भावाकडे आश्रयास गेली. जिवाईचे भाऊ भोजराज बारगळ हे गांवचे अधिकारी होते. कंठाजी कदमबांडे यांच्या पदरी ते पन्नास घोडेस्वारांच्या पथकाचे नायक होते! त्यांनी जिवाई आणि मल्हारला आधार दिला.

मल्हार आठ वर्षांचा झाला. तो रानात मेंढ्या चारायला नेई. एकदा एका झाडाखाली मल्हार झोपला होता. जिवाई दुपारी भाकरी घेऊन आली तेव्हा तिने एक अपूर्व दृष्य पाहिले. एक जातीवंत नाग आपल्या फणीचे छत्र, मल्हारच्या डोक्यावर धरून वेटोळे घालून बसला होता. जिवाई भीतीने अर्धमेली झाली. तिने

आजुबाजूच्या लोकांना बोलावले. सर्वांनी ते दृष्य पाहिले. माणसांची गजबज ऐकून नाग शांतपणे निघून गेला. जिवाईला जो तो म्हणू लागला, ''बाई ग, हा पोर फार भाग्यवंत निघणार आहे. हा राजा होईल.'' मल्हारच्या मामांनी त्यादिवसापासून त्याला रानात पाठवले नाही. घोड्यांवर देखरेख करण्याचे काम दिले. मल्हार घोडे राखण्यात पटाईत झाला. काही वर्षांनी जिवाई वारली; पण मामांनी भाचा मल्हार याचे शौर्य जाणले. त्याची शूराची निधडी छाती ओळखली आणि आपली कन्या गौतमाबाई हिचा विवाह मल्हारशी करून दिला. मल्हार मोठ्या शुभवेळेला घोड्यावर बसला. त्याने पुण्यापासून दिल्लीपर्यंत शौर्य गाजवले. पराक्रमाने मल्हारराव खरंच माळव्याचे राजे झाले. मेंढपाळाचे प्रजापाल झाले.

✡

# अहिल्येचा गृहप्रवेश

गौतमाबाई आणि मल्हार यांचा संसार सुरू झाला. मल्हाररावांचे शौर्य चारी दिशांना तळपत होते. त्यांना उसंत नव्हती. अनेक चढाया, युद्धे यातून त्यांच्या शौर्याच्या कथा पुढे येत होत्या.

गौतमाबाईंना पुत्र झाला आणि सगळीकडे आनंदीआनंद पसरला. त्याला आजोबांचे खंडेराव हेच नांव ठेवण्यात आले. खंडेराव हळूहळू मोठे होऊ लागले. त्याच्या शिक्षणाची चोख व्यवस्था केली. पण या मुलाची लक्षणे विपरीत होती. त्याला राज्यकारभार, लढाया, घोडे वगैरेमध्ये अजिबात रस नव्हता. तो अतिशय भांडकुदळ, उद्धट, तापट होता. तारुण्यात पदार्पण केल्यावर तर दुर्गुण अधिकच उसळू लागले. नशापाणी करण्याचं त्याला व्यसन लागलं. त्याची राहाणी फारच डामडौलाची असे. आचारविचार मात्र हीन होते. साठमारी, कोंबड्यांची झुंज, शिकार असले खेळ त्यांना आवडत. त्यांचे शौर्य अशाप्रकारे वाया जात असलेले बघून मल्हारराव दु:ख, चिंतेत बुडून गेले होते. आपल्या पुत्राचे जीवन मार्गी कसे लागेल याची चिंता त्यांना लागली.

एकदा बाजीरावांबरोबर लढाईहून परत येतांना सैन्याचा तळ चौंडी गावातील सीना नदीच्या काठी पडला. नदीकाठी महादेवाचं देऊळ होतं. तिथे अहिल्या आपल्या आईबरोबर दर्शनाला आली होती. मैत्रिणींबरोबर नदीकाठच्या वाळूत शिवलिंग तयार करत होती. शाळुंकेवर वाळूचे लहान लहान गोळे ठेवून नक्षी काढत होती. तोच सैन्यातला घोडा उधळला. मैत्रिणी ओरडल्या 'अहिल्ये, पळ. घोडा उधळला.' मैत्रिणी पळाल्या सुद्धा. पण अहिल्या? तिने आपले सर्व शरीर त्या पिंडीवर झाकले. भरधाव सुटलेला घोडा अहिल्येच्या बाजूने निघून गेला. त्याचवेळी मल्हारराव अन् बाजीराव धापा टाकत तिथे पोहोचले. तिला संतापाने खसकन् उभे करीत बाजीरावांनी ओरडून विचारले, ''पोरी, इथे कां थांबलीस? उधळता घोडा तुला तुडवून गेला असता तर?'' त्यावर मुळीच न घाबरता, आपले तेजस्वी डोळे बाजीरावांच्या डोळ्याला भिडवत ती म्हणाली, ''जे आपण घडवावे ते जीवापाड, प्रसंगी जीव सांडूनही रक्षण करावे असंच सगळी वडील माणसे सांगतात. मी तेच

केले. मी घडवलेल्या पिंडीचे रक्षण केले! माझे काही चुकले का?'' त्या तेजस्वी चिमुरडीचे शब्द ऐकून बाजीराव थक्क झाले. तिच्या डोळ्यात विलक्षण तेज होते. तिचा बाणेदारपणा बघून मल्हाररावही आनंदाने बघत राहिले. बाजीराव मल्हाररावांकडे वळत उत्स्फूर्तपणे म्हणाले, ''मल्हारबा, या पोरीस तुमची सून करून घ्या. तिला राज्याच्या लायक करा. ही राज्य नांवारुपास आणेल. राज्याचं प्राणपणानं रक्षण करेल. हिचे डोळे रत्नासारखे तेजस्वी आहेत. तुमचा कुळपुत्र खंडेराव त्याला राज्याच्या लायक हीच करू शकेल. हिला सून करून घ्या आणि राज्यकारभाराच्या अनेक पदरांचं शिक्षण द्या.''

बीड जिल्ह्यातील, जामखेड तालुक्यातलं चौंडी हे एक लहान गांव. माणकोजी शिंदे आणि सुशीला या मातापित्यांच्या पोटी अहिल्येने जन्म घेतला. तिला दोन भाऊ होते. चौंडीची ही अहिल्या बघताच बाजीराव आणि मल्हाररावांनी तिच्या आईवडिलांची गाठ घेऊन अहिल्येला मागणी घातली. थाटात लग्नसमारंभ पार पडला. अहिल्या होळकरांची सून झाली. १७३३ मध्ये हा विवाह झाला आणि अहिल्या भाग्याची सोनपाऊले घेऊनच होळकरांच्या घरात आली. मल्हाररावांचे ऐश्वर्य वाढत चालले. अहिल्येच्या लग्नाबरोबरच तिचे शिक्षण सुरू झाले.

पेशवे यांची राजधानी पुणे इथे होती. परंतु त्यांचं काम मात्र उत्तर हिंदुस्थानातच बहराला आलं होतं. मल्हाररावांच्या मदतीने बाजीराव पेशवे उत्तर हिंदुस्थानातील सूत्रे हलवीत होते. अनेक लहानमोठ्या लढाया चालू होत्या. १७३० मधे माळव्यावर जे आक्रमण केले होते त्याचं सेनापतीपद मल्हाररावांकडेच होतेच. त्यावेळचे मोगल सरदार पळून गेले. २ ऑक्टोबर १७३० रोजी मल्हाररावांना माळव्यातील सर्व परगण्यांचा सर्व अधिकार मिळाला. नंतर महंमद बंगशनेही माळवा परत काबीज करण्याचा प्रयत्न केला; पण त्याला मल्हाररावांच्या शौर्यापुढे हार पत्करावी लागली. आता माळव्यावर मराठ्यांची सत्ता स्थापन करण्यासाठी पेशव्यांनी जहागीरदारी आणि वतनदारीची प्रथा राबविली. आपल्या प्रमुख सरदारांना वतने दिली. याच प्रथेनुसार राणोजी शिंदे यांना उज्जैन, आनंद पवार यांना धार आणि जिवाजी पवारास देवास मिळाले. त्यानंतर २० जानेवारी १७३४ रोजी पेशव्यांनी होळकरांना माळव्यात वंशपरंपरा चालणारी वतने, परगणे, इनाम दिले. मल्हाररावांचा खास गौरव करून होळकर राज्याची रीतसर स्थापना करण्यात आली. हे वैभव अहिल्यादेवींच्या पायगुणामुळे, त्यांच्यातील असामान्य कर्तृत्वामुळे प्रतिदिन वाढतच गेले.

लग्न झाले तेव्हा अहिल्या केवळ दहा वर्षांची होती. परंतु मल्हाररावांनी तिच्यातलं तेज, हुशारी जाणून, तिच्या शिक्षणासाठी गुरू नेमले. तिची बुद्धी प्रखर

होती. असा उल्लेख आहे की, दूध घटाघटा प्यावे त्याप्रमाणे ती ज्ञान पिवून टाकीत होती. गणित, वाचन याप्रमाणेच भूगोलाचं शिक्षणही त्यांना देण्यात येत होते. आपल्या गोड स्वभावाने आणि सेवावृत्तिने ती सर्वांची लाडकी झाली. मल्हाररावांना त्या काळच्या प्रथेप्रमाणे आणखी दोन बायका होत्या. बनाबाई आणि द्वारकाबाई. या तिन्ही सास्वांची उत्तम सेवा करीत असे अहिल्या. सगळ्यांचा प्रेमवर्षावही अहिल्येवर होई. मल्हारराव आणि गौतमाबाई आपल्या या सुनेची अपार काळजी घेत. अहिल्येच्या पायगुणाने वैभवाची कमान उंच उंच जात होती. तिची अभ्यासातली प्रगती चकित करणारी होती.

सात आठ वर्षातच ती केवळ एका नजरेने हिशोबातली चूक काढू लागली. चौदिशेस घोडासवारी करू लागली. जिल्हे, तालुके, वाटा, क्षेत्रे सर्व माहिती घेतली. रामायण, महाभारत वाचून संपलं. स्तोत्रे तोंडपाठ झाली. रोज फडनिशीत जावे, हिशोब बघावे, वसूल जमा बघावी, त्यासाठी माणसं पाठवावी, न्यायनिवाडे करावे, सरदारांना पत्रे पाठवावी, फौजा तयार ठेवाव्या, खाजगी उत्पन्न आणि सरकारी उत्पन्न रोखठोकपणे वेगळे ठेवावे, खातेनिहाय पैशांचे वाटप करावे, गोळाबारुदा बाणभाते, ढालीतलवारी सज्ज राखाव्या, सासऱ्यांच्या पत्राबरहुकूम सर्व रवाना करावे. मल्हारराव म्हणत, आम्ही तलवार गाजवतो ती सूनबाईच्या भरोशावर. मार्तंडांनेच हे रत्न आम्हास दिले. अवघी वीस बावीस वर्षांची अहिल्या कुशल प्रशासक होऊ लागली. इतिहासात याचे दाखले आहेत.

खंडेरावांची व्यसने वाढत होती. खंडेराव स्वतंत्र वाड्यात राहात. त्यांना आणखी बायका होत्या. त्या काळी 'पतिव्रता' शब्दाचा इतका धाक होता की दुर्गुणी नवऱ्यालाही काही बोलणे हे धर्मविरुद्ध वर्तन समजले जाई. तरीही अहिल्याबाई शांतपणे खंडेरावांना रणविद्या शिकण्यासाठी प्रेरणा देत. युद्धावर जाण्यासाठी प्रोत्साहन देत. परंतु त्याचा फारसा उपयोग होत नसे. त्यांना रेड्यांची झुंज, कोंबडाझुंज, शिकार यातच रुची होती.

१७४५ साली अहिल्याबाईंना पुत्र झाला. त्याचे नांव मालेराव ठेवण्यात आले. राज्यात सर्वत्र आनंदीआनंद झाला. परंतु मल्हाररावांना खंडेरावांच्या वागण्याची खंत वाटे. अहिल्येसारखे रत्न लाभूनही खंडेरावात काहीही फरक पडत नाही हे बघून त्यांना अपरंपार दुःख होई. हळूहळू खंडेराव सुधारेल ही आशाही त्यांनी सोडून दिली. आता अहिल्याबाई हेच त्यांचं आशेचं एकमेव स्थान होते. अहिल्याबाईंची हुशारी, बुद्धिमत्ता यांची पारख त्यांनी केली होती. होळकरांचे निशाण अहिल्यादेवीच उंचावर नेतील याची खात्री होती. ते अहिल्याबाईंना राजकारण, व्यवहार, देशाची स्थिती, सावधानता, गुप्तहेरांचं महत्त्व, पैशांची

व्यवस्था, कारभारातले प्रश्न, खाचाखोचा सारं समजावून देत. अहिल्याबाईंची विलक्षण बुद्धी, हे सारे धडे पाठ करून टाकी. त्या दिवसेंदिवस समर्थ होत होत्या.

मल्हारराव सदैव लढायात गुंतलेले असत. दूरदूरच्या ठिकाणाहून मल्हाररावांची पत्रे येत. अहिल्याबाई पत्रातील आदेश तंतोतंत पाळून, त्यांची चोख व्यवस्था करीत. अहिल्याबाई मल्हाररावांबरोबर रणांगणावरही गेल्याचे इतिहासाने नमूद केले आहे. तिथेही त्यांनी धाडस, साहस आणि रणकौशल्य दाखवून सर्व कार्यात भाग घेतला होता. रणांगणाशी संबंध येणाऱ्या प्रत्येक गोष्टींचे त्यांना ज्ञान होते. मल्हाररावांच्या आदेशाप्रमाणे काही ठिकाणी त्यांना स्वतः जाऊन कामे उरकावी लागत. राज्यकर्त्याने देशात फिरून भूगोल पाहिला पाहिजे, सामाजिक स्थितीचे ज्ञान करून घेतले पाहिजे असं मल्हारराव त्यांना नेहमी सांगत. एकदा एका महत्त्वाच्या व्यक्तिस काशीला जायचे होते. त्यांची व्यवस्था करण्याची विनंती बाजीराव पेशव्यांनी अहिल्याबाईंना केली होती. अहिल्याबाईंनी त्यांची व्यवस्था केलीच आणि इंदौरपासून काशीपर्यंत वाटेत लागणारी गावे, नद्या, घाट वगैरे तपशीलाचा एक नकाशा स्वतः तयार केला. आपल्या ठिकठिकाणच्या अधिकाऱ्यांना पत्रे दिली.

आपल्या पराक्रमी सासऱ्याच्या सुयोग्य मार्गदर्शनाखाली, त्यांनी सर्व राज्यकारभार नांवारूपास आणला. मालेरावांच्या पाठीवर अहिल्याबाईंना तीन वर्षांनी एक कन्यारत्न झाले. तिचे नांव मुक्ता असे ठेवण्यात आले.

✡

# सद्‌गुणांची खाण - अहिल्या

हे अहिल्यादेवींचं चरित्र आहे आणि अशांचीच चरित्रे लिहिली जातात की ज्यांनी काहीतरी अलौकिक केलं आहे, जे सत्याला सामोरे गेलेत, ज्यांनी चोख न्याय केला, ज्यांनी दुर्बळांची पाठ राखली, ज्यांनी सत्ताधिशांना त्यांच्या चुका दाखवल्या, ज्यांनी इतरांचा पैसा विषसमान मानला. अहिल्याबाईंनी या साऱ्यासाठी आपल्या आयुष्याचा क्षणक्षण वेचला. त्यातल्याच काही ठळक गोष्टी मी आपल्याला सांगणार आहे. या कथा इतिहासात नमूद झालेल्या आहेत. त्यांच्या चरित्राचे मनमोहक रूप दाखवणाऱ्या आहेत.

एकदा फडनिशीत हिशोब बघता बघता त्यांना पति खंडेरावांचे खाते दिसले. त्याचा वर्षाचा तनखा दोन महिन्यातच संपला होता. आता जर पति पैशांसाठी आले तर त्यांना नकार द्यावा लागणार होता. अन् तो प्रसंग आलाच. नशापाणी केलेले खंडेराव अहिल्येसमोर उभे होते. अहिल्येने पैसे देण्यास नम्रपणे नकार देताच ते म्हणाले, ''मला पैसे हवेत, सल्ला तर मुळीच नको. हवेत ते पैसे अन् ते आम्ही नेणारच. बघुया तुम्ही आमचे काय करता ते!'' त्यावर अहिल्याबाई शांतपणे म्हणाल्या, ''मी जे काय करावे ते दौलतीच्या, राज्याच्या हिताचे करावे, अशी मामंजींची आज्ञा आहे. आपल्या नांवे रुपये नाहीत. अर्थात आपली सेवा होऊ शकणार नाही.'' हे ऐकताच खंडेरावांनी अहिल्यादेवींसमोरची हिशोबाची वही घेतली अन् कोपऱ्यात भिरकावली. अहिल्याबाईंच्या डोळ्यातून ठिणग्या उडू लागल्या. त्या संतापून कारभारी गंगोबातात्यांना म्हणाल्या, ''तात्या, खतावणीची बेअब्रू करणाऱ्याचा जबाब लिहून घ्या, अन् त्यांना पंचवीस मोहरांचा दंड ठोका. वसूल करून घ्या, आम्ही सुभेदारीत जातो.'' मागे वळूनही न पाहाता अहिल्याबाई तिथून निघून गेल्या. गंगोबातात्या थक्क झाले. 'असे तेज पाहिले नाही' असे शब्द त्यांच्या मुखातून निघून गेले. प्रत्यक्ष पतीलाही दंड ठोकून वसूल करणारी कठोर शिस्तीत राज्यकारभार राबवणारी अशी होती अहिल्या.

एकदा अहिल्याबाई फडणिशीत गेल्या तोच सांडणीस्वार पत्र घेऊन आला. त्यात फार दु:खद वार्ता होती. श्रीमंत बाजीराव पेशवे यांचा नर्मदातिरी मृत्यू झाला

होता. बाजीरावांचे प्राण जाताच त्यांचा आवडता हत्ती आणि कुत्रा टाहो फोडत मरून गेले. सगळं राज्य शोकात बुडालं. मल्हारराव आले ते हृदय फुटल्याप्रमाणे रडत राहिले. बाजीरावांना परलोकी शांती लाभावी म्हणून ब्राह्मणांना दाने दिली गेली. वस्त्रे, मुद्रा यांचे दान, धर्मकार्ये यांच्यावर भरपूर खर्च झाला. काही दिवसांनी अहिल्याबाई हिशोब तपासायला बसल्या तेव्हा धर्मकार्याचा सर्व खर्च सरकारी खर्चात टाकलेला बघून चकित झाल्या. त्यांनी गंगोबातात्यांना हाक मारली. म्हणाल्या, ''तात्या, आपण थोर. बाजीराव श्रीमंतांच्या मुक्तिसाठी केलेल्या विधींचा खर्च आपण सरकारी तिजोरीवर टाकला? अहो काय म्हणावे याला?'' गंगोबातात्या चाचरत म्हणाले, ''बाईसाहेब, श्रीमंतांच्या पारलौकिक शांतीसाठी त्यांच्या सुभेदाराने केलेली कार्ये... म्हणजे ती सरकारीच नव्हे काय? मग ती खाजगी खर्चात कशी टाकावी?'' यावर तेजस्वी, निर्लोभी, अहिल्याबाई म्हणाल्या, ''तात्या, मामंजी काय फक्त सुभेदारच होते? अहो नाती काय फक्त रक्तातूनच येतात? काही नाती जिवाशिवाची, त्याची मोजमापे कशी घ्यावी? मामंजी आठ दिवस अन्नाला शिवले नव्हते, बाजीराव मामंजींचे शपथबंधू होते. तात्या, हा सर्व खर्च खाजगी खर्चाकडे टाका. यापुढे ही गोष्ट खंबीरपणे पाहा. कुठल्याही प्रकारच्या खाजगी खर्चाची पैसुद्धा सरकारी तिजोरीतून येता कामा नये, याची पक्की जरब ठेवा. खाजगीतून एखादे सरकारी काम झाले तर ते आम्हास चालेल पण खाजगी कामासाठी पैचा एक हिस्साही सरकारवर पडता कामा नये यासाठी पंचागे सावध रहावे.'' अहिल्याबाईंच्या स्वराला तिखट धार होती. त्यांचा धाक जबर होता. सोसायला जड होता.

एक दिवस एक विधवा स्त्री पहारेकऱ्यांचे कडे तोडून थेट आत आली. सांगू लागली, ''बाईसाहेब, मज अभागिनीस पुत्र नाही. सगळे नातलग आपापली पोरे घेऊन दारी ठाण मांडून बसले आहेत. हे पैशांसाठी मला विषही घालतील. मला यांची पोरे दत्तक नकोत. माझ्या दासीचा पुत्र मला दत्तक घ्यायचा आहे तर नातेवाईकांनी दंगा माजवला आहे. बाईसाहेब, नको मला ही संपत्ती. दान करू द्या मला आपल्या पायाशी. कुत्र्याच्या मौतीने मरण्यापेक्षा आपल्या पायाशी राहीन तर प्रतिष्ठा पावेन. माझी संपत्ती, वाडा सारं सरकारात जमा करून घ्या!'' यावर अहिल्याबाई म्हणाल्या, ''मातोश्री, नातलगांच्या रेट्यासमोर हार न घेता, तुम्हास मान्य असेल त्यास दत्तक घ्या. माझ्या राज्यात विधवेला दत्तक घेता येईल!'' यावर गंगोबा तात्या हळूच अहिल्याबाईंना म्हणाले, ''बाईसाहेब, अनायसे संपत्ती सरकारी तिजोरीत येते आहे. दत्तकाची परवानगी देणं म्हणजे आपलं नुकसान करून घेणं नाही का?'' यावर आपला राग आवरत आवाज हलका करीत त्या म्हणाल्या,

''तात्या, आपण काय हे बोलता? माळव्यातल्या विधवांना पतिच्या संपत्तीचा सुखाने उपभोग घेता यायला हवा. या विधवेच्या नातलगांना समज द्या. वाड्यावर सैनिक तैनात करा. तात्या, लक्षात ठेवा. स्त्रियांचा सन्मान हा माळव्याचा महालौकिक व्हायला हवा.'' मग त्या विधवेकडे वळत म्हणाल्या, ''मातोश्री, तुमच्या पसंतीचा दत्तक घ्या. दंगाफसादाची भाषा करणाऱ्या नातलगांना समज दिली जाईल. समारंभात संकट येवू नये म्हणून, आमचे नजरबाज तिथे राहातील. यावर गंगोबातात्या म्हणाले, ''बाईसाहेब, दत्तकाचा नजराणा किती मागायचा?'' यावर संतापाने अहिल्याबाई म्हणाल्या, ''विधवेचा नेकबंद गुजारा व्हावा हे बघायचं की नजराणा मागायचा? अशा नजराण्याला दरोडा मानते मी तात्याबा! होळकरांचं राज्य प्रजेची सेवा करण्यासाठी आहे. दत्तकाला आमच्या खाजगीतून पोशाख द्या!''

प्रजेच्या सुखासाठी अहिल्याबाई जागरूक होत्या. विधवांचा, स्त्रियांचा छळ करणाऱ्यांना क्षमा नव्हती. खाजगी खर्चाच्या पैचाही भार सरकारी तिजोरीवर पडू नये यासाठी त्या डोळ्यात तेल घालून दक्ष राहात. अशा होत्या अहिल्याबाई.

✡

# खंडेराव

मल्हारराव मोहिमात गुंतले होते. मल्हारराव अहिल्याबाईंना पत्रात लिहीत, सौ. अहिल्येप्रति मल्हाररावाचा आसीरवाद, तुम्ही इंदौरास आहात तर आम्ही असल्याप्रमाणेच आहे. सात हजार फौजेच्या तयारीत असावे. जंबुरा-तोफा-गाडे यात कुचराई नको. शागिर्दांप्रति वर्तन दयाळू ठेवावे. प्रजेकडून रुपये येतात. त्यांच्या सुखसोई नेटक्या कराव्या. नादान गोष्टीचा संशय घेऊन माणूस खराब करू नये. कित्येक रुपये खर्चावे तेव्हा माणूस कामाचा होतो. इंदौरास येणे सध्या अशक्य-संदेशाप्रमाणे फौज तयार राखावी. सरदारांकडे निरोप ठेवून सारे सज्ज ठेवावे.'' या अशा पत्रातून मल्हारराव अहिल्येला कारभाराची समजही देत आणि शिकवणही! अशा पत्रांना अहिल्याबाई लगेच उत्तर लिहीत. ''तीर्थरुप वडिलांप्रति अहिल्येचा साष्टांग दंडवत. आसीरवाद असो द्यावे. चूकभूल तर होणे आहेच. एकशेवीस जंबूरातोफा आणि बारुद पक्की सहा मण! सोबत तेज गोलंदाज, ग़ोज दिडीने पण निशाणी पक्की. आम्ही परिक्षा करून घेतली आहे. भरणावसूल नेटका चालू आहे. आपल्या तलवारीस यशच आहे. आपल्या हुकूमाप्रमाणे शिकस्त करते. आपली आज्ञाधारक, सौ. अहिल्या-''

फडातील कारकून अहिल्येचे कसब, मुत्सद्देगिरी, कौशल्य, रणनीतीचे ज्ञान बघून चकित होत. मल्हाररावांचा उजवा हात म्हणजे अहिल्या. जे त्यांचा कुळपुत्र करू शकत नव्हता ते सारं काम अहिल्याबाई करत होत्या. परंतु अहिल्याबाईंचं निर्मळ प्रेम आणि विनम्र सेवा याचा परिणाम खंडेरावावर होऊ लागला. ते तलवारीकडे लक्ष देऊ लागले. कधी कधी मल्हाररावांबरोबर जाऊ लागले. अहिल्येला बरं वाटे, पण व्यसनांचा पाय पुढेच होता.

त्यावेळी लढाईत जे जडजवाहिर मिळे, लूट मिळे त्याचं वजन करून, त्याचा ठराविक हिस्सा पुणे दरबारी पाठवावा लागे. प्रत्येक लढाईनंतर ही कामे खूप असत. कुठे गुंजेचीही लपवालपव नाही की मोहरेची फसवणूक नाही. अहिल्याबाई स्वत: हे सारं बघत. हे काटेकोरपणे अमलात येई.

खंडेराव राजमहाल येथे लढाईस गेले. तिथे त्यांचा पराभव झाला. पण त्यांनी

बरीच लूट आणली होती. ती सरकारात वजन न करता आपल्या वाड्यावर नेल्याचे कळताच अहिल्याबाई स्वत: तिथे गेल्या. तिथे लुटीचा ढीग होता. अहिल्याबाई शांतपणे म्हणाल्या, ''स्वामी, लूट परस्पर वाड्यात आणली? हा गुन्हा आहे.'' ''ही लूट आम्ही आमच्या मनगटाच्या जोरावर आणली आहे.'' यावर अहिल्याबाई म्हणाल्या, ''स्वामी, जे सुभेदारी भोगतात त्यांची मनगटे रयतेसाठी असतात. आपण सुभेदारांचे वारस. चोरपेंढारी नव्हेत! नियतशाबूती हा राज्यकर्त्यांचा प्राण! प्राण गेल्यावर उरते ते प्रेत असते... फक्त प्रेत! स्वामी, ही लूट आधी फडणिशीत जमा करा. हिस्सेवारी पुणे दरबारी आणि इथल्या तिजोरीत जमा करा आणि उरलेल्याचा उपभोग घ्या! अन्यथा मला झडतीसाठी कारभारी पाठवावे लागतील.'' यावर खंडेराव म्हणाले, ''ठीक आहे. आपलं कुंकू पुसूनच झडतीला पाठवा!'' हे ऐकून अहिल्या अत्यंत दु:खी झाली पण खचली नाही. त्यांनी शांतपणे एक चादर घेतली. त्यात सारी लूट बांधू लागल्या. खंडेरावांची त्यांना अडवायची हिंमत होत नव्हती. असे लोकोत्तर गुण अहिल्याबाईत होते. माणसांची चरित्रे अशा घटनांनी गुंफली जातात. चरित्रे म्हणजे केवळ सनावळी नव्हे. किंवा केवळ घटना नव्हे. सत्यासाठी नवऱ्यावरही झडती काढू शकणारी ही स्त्री म्हणजे सामर्थ्यांची मूर्तिमंत पुतळी होती. सत्यमूर्ति तेजशलाका होती.

राजमहालची लढाई, पराभव आणि लूट या प्रसंगांनी शिंदे, होळकर यांच्यातले वितुष्ट वाढीला लागले. वर्षेच्या वर्षे गेली. मालेराव आठ वर्षांचे अन मुक्ता पांच वर्षांची झाली. खंडेराव कुठेही कर्ते होत नव्हते. पण मालेरावही आजोबा मल्हाररावांसारखे न होता वडिलांच्याच वळणावर जात होते. अहिल्याबाईंना सर्वांत मोठे दु:ख हे होते. मालेरावाला अभ्यासात गति नव्हती. पंतोजीस तो आटोपत नसे. खेळही असेच क्रूर असत. विंचू मार, बेटकुळ्यांच्या पायांना दोऱ्या बांध, फुलपाखरांना सुया टोचाव्या, गाढवावर बसावें, कुत्र्यामांजराचे प्राण घ्यावे, झुरळे-उंदीर पकडावे, मांजरापुढे टाकावे, मांजराने ते मटकावले की टाळ्या पिटाव्या. अहिल्याबाई मुलाचे हे चाळे बघून धसकून जात. त्या पहाटे उठत. मालेरावास शिकवायला बसत. त्याला शौर्याच्या कथा सांगत. पण त्याचं लक्ष भिंतीवरच्या पालींकडे, किड्यांकडे असायचं. तो रोज नव्या नव्या खोड्या करी. कधी फुलांच्या करंडीत उंदीर भर, कुंकवाच्या डबीत तिखट भरून ठेव, ब्राह्मणांच्या जोड्यात विंचू घालून ठेव, पाण्याच्या तांब्यात मीठ टाकून ठेव आणि इतरांची फजिती झाली की पोट धरधरून हसत. हसता हसता लोळू लागत. एकदा तर झाडाला बांधलेल्या झोपाळ्यांच्या दोऱ्या झाडावर चढून सैल करून ठेवल्या. मुक्तेच्या मैत्रिणी झोका घेतांना पडल्यावर, मालेरावाची हसून मुरकुंडी वळली. अहिल्याबाईंना याचं अपार दु:ख होई. त्या मार्तंडाजवळ एकच मागणं मागत की या मालेरावाला सुबुद्धि दे. ✡

# कुंभेरीचा वेढा

१७५४ साली मल्हारराव अजमेर येथे गेले. त्यांनी चौथाई वसूल करण्याचा प्रयत्न केला. पण जाट ऐकेना. जाटांनी भांडण उकरले. आधीपासूनच कुरबुरी चालू होत्याच. मल्हारराव इंदौरला येताच रघुनाथरावांचा खलिता आला. त्यांनी लिहिले होते की, ''आम्ही अजमेर प्रांती जाऊन राजपुतान्याची खंडणी वसूल करतो. आमचेकडे खंडेरावास बिनीची फौज देऊन पाठवणे. दत्ताजी शिंदेही येत आहेत. आपण भरतपूर मुक्कामी तमाम फौजेसह एकत्र यावे. आम्हास तर बाजीराव पेशव्यांनी फौजेनिमित्त केलेली कर्जे निवारणे हेच एक उदंड काम झाले आहे. आपल्यासारख्या ज्येष्ठ स्तंभांवरच राज्याचा भार आहे. काही चुकले असल्यास, क्षमा करावी. कृपा कीजे!'' पत्र वाचून मल्हारराव अहिल्याबाईंना म्हणाले, ''खंडेरावांना पुढे पाठवतो. आम्ही लगोलग निघतोच!'' याप्रमाणे धावपळ सुरू होऊन फौजा कुंभेरीकडे रवाना झाल्या. सक्रांतीचा सण करून बायकाही जाणार होत्या. यावेळेस खंडेरावांनीच तशी आज्ञा केली होती. त्यांच्या दोन मुसलमान बायकांनाही सोबत घ्यावे लागले. अहिल्याबाई, गौतमाबाई, शबनम, सकीना, सगळे कुंभेरीस आले. मल्हारराव, रघुनाथराव, शिंदे, सरदार सेनापती यांच्या राहुट्या जवळजवळ होत्या. फक्त खंडेराव शबनम व सकीनासह वेगळ्या राहुटीत राहात. अहिल्याबाई, गौतमाबाई एकत्र होत्या. अहिल्याबाईंनी पहाटेच पूजा करावी. सर्वांना अंगारा लावावा. मग मुदपाकखान्याकडे बघावे. जखमींना उपचार करावे, शस्त्रास्त्रांची व्यवस्था करवून घ्यावी. दिवसभर तोफखाना संभाळावा, सगळीकडे जातीने लक्ष ठेवावे. खणाखणी, घोड्यांचे खिंकाळणे, माणसांच्या किंकाळ्या, रक्ताच्या चिळकांड्या! असाही दीड महिना संपला. तडजोड व्हायची चिन्हे दिसेनात. कुणी किल्ल्यातून बाहेर येईना की आत जाईना. सगळे आपल्या जागी घट्ट होते.

त्या दिवशी अहिल्याबाई अंगारा घेऊन खंडेरावांच्या राहुटीत गेल्या खंडेराव नशेत चूर होते. अहिल्याबाईंनी संतापाने दारुचे बुधले, अफूचे गाळावे चुलीत ओतले. सकीना शबनमला म्हणाल्या, ''मेल्यांनो, स्वामींना दासत बुडवता? ही

तुमची सेवा? खंडेरावांना जागे करत त्या म्हणाल्या, ''स्वामी, हे छावणीचे ठिकाण पंचेंद्रिये सावध राहायची वेळ! बुद्धिचा होश सुटेल असे करू नये.'' हे ऐकताच ताडकन उठत खंडेराव म्हणाले, ''कोण म्हणतो बेहोश? आत्ता, या क्षणीसुद्धा रणांगणातल्या तोफेपर्यंत जायची हिंमत आहे आमची. ही छाती शूराची आहे नामर्दाची नाही.'' आणि अहिल्याबाई नको नको म्हणत असतांनाही ते ऐकेनात. अहिल्याबाई म्हणाल्या, ''स्वामी, असे धाडस युद्धात करू नये. कुणी निशाणीवर टपून असेल, हत्यार सरसावून असेल...'' पण त्यांचे वाक्य तोंडातच राहिले. खंडेराव निशाण मोर्चाकडे धावत सुटले. तोच कुंभेरगडाहून तोफेचा गोळा सूसाट वेगाने आला. प्रलयी वीज पडावी तसा खंडेरावांच्या देहावर पडला. खंडेराव कोसळले. अहिल्याबाईंच्या किंकाळ्या राहुट्या कापीत गेल्या. मल्हारराव धावत खंडेरावाच्या प्रेताजवळ गेले. त्याला कुरवाळत म्हणाले, ''अरे जाटा, माझ्या या कोकराने तुझे काय केले होते? युद्धनीती मोडून तू भर थाळ्याच्या वेळी त्याला मारले. मी तुझा बदला घेईन.'' अहिल्याबाई बेशुद्ध होत्या.

✡

# उत्तरक्रिया

अहिल्याबाईंचा अनावर शोक बघून मल्हारराव घाबरून गेले. सगळे सरदार, 'खंडेरावाचा अंत्यविधी करायला हवा' असं सांगून मल्हाररावांना सावध करत होते. खंडेरावांच्या नऊ बायकांना इंदौरहून आणण्यात आले. त्या सगळ्याजणी सतीवस्त्रे नेसून उभ्या होत्या. अहिल्याबाईंनीही सती जायचा निर्धार जाहीर केला. त्याही सतीवस्त्रे नेसून, मळवट भरून उभ्या राहाताच मल्हाररावांच्या दु:खाला पारावार राहिला नाही. ते अहिल्याबाईंच्या पुढे डोई घासत म्हणाले, ''मुली, खंडूच्या या अपमृत्यूमुळे मी निर्जीव झालो. आता तूही मला सोडून जाणार? मुली, आता माझा पुत्र होण्याचे सोडून कुठे निघालीस?'' पुत्राचा अपमृत्यू बघायची दुर्दैवी वेळ तर त्यांच्यावर आलीच होती परंतु कर्तबगार अशा सुनेनं सती जायची तयारी केलेली बघून त्यांच्या हृदयाचा ठाव सुटला. अहिल्याबाईंना राज्यकारभाराचे सर्व पदर त्यांनी शिकवले ते तिला पुत्राच्या जागी मानूनच शिकवले. त्या तेजस्वी स्त्रीने हा सारा राज्यकारभार, त्यातल्या खाचाखोचा, तडफदारपणे शिकून घेतल्या. अहिल्याबाई कुटुंबाच्या आणि राज्याच्याही आधारस्तंभ झाल्या होत्या. हा आधारच आता कोसळणार होता. मल्हारराव दु:खाने खचून गेले. जीवनभर अनेक संकटांना धैर्याने तोंड देणारा हा महापराक्रमी रणशूर मुत्सद्दी अहिल्याबाईंच्या पायाशी कोसळून विलाप करीत होता. ''मला अनाथ करून जाऊ नकोस पोरी, तूच माझा खंडू आहेस. तू गेलीस तर मी निपुत्रिक होईन. हे राज्य आता तुझेच आहे. जीव द्यायचाच तर या प्रजेसाठी दे. या प्रजेची आई हो. तुझ्याकडे बघून मी माझं दु:ख विसरेन- पण तू गेलीस तर मी जिवंत राहाणार नाही. मुली, कष्टाने मिळवलेल्या या राज्याचा, या प्रजेचा विचार कर.'' तेथे उभे असलेल्या नातलगांनी मल्हाररावांचे सांत्वन करण्याचा खूप प्रयत्न केला. अहिल्याबाई म्हणाल्या, ''मामंजी, पतिव्रतेने सतीच जायचे असते ना? मी सती गेले नाही तर माझ्या धर्माची चेष्टा होईल, माझी अपकीर्ति होईल, मला सती जाऊ द्या!''

''पोरी, हे राज्य तुझ्या मदतीने नांवारुपास आले. आपण जे घडवावे ते प्राणपणाने रक्षावे हे तुझंच वाक्य! माझं पुण्य संपलं का पोरी?'' मल्हारराव ढसढसा

रडू लागले. तोवर गौतमाबाईंनी अहिल्येला मिठी घातली. म्हणाल्या, ''अग, तू माय आहेस या घराची! या झेंड्याची लाज राख! भीक घाल या म्हाताऱ्यांच्या पदरात!'' इकडे चिता रचली गेली. खंडेरावांचं प्रेत ठेवलं गेलं. त्यांच्या नऊ बायका चितेकडे निघाल्या. अहिल्येने सर्वांच्या पायावर डोकं ठेवलं. हात जोडले म्हणाली, ''स्वामी, माझ्या निष्ठेची शपथ. आजपासून सारे अलंकार, रंग, उपभोग या चितेत टाकते. आजपासून फक्त शुभ्र वस्त्रे नेसेन. यापुढील आयुष्य प्रजेसाठी, राज्यासाठी!'' अहिल्याबाईंनी सर्व अलंकार शेल्यात बांधून चितेवर ठेवले. चिता धडधडून पेटली. सगळा आसमंत सतीच्या किंकाळ्यांनी भरून गेला. डेऱ्यात आल्यावर मल्हारराव म्हणाले, ''आजपासून तुम्ही आम्हाला पुत्राच्या जागी. यापुढे तुम्हाला एकेरी हाकारणे नाही. आमच्या वस्तीला वणवा लागला. वीज कोसळली. पण तुमच्यासारखे एक अनमोल रत्न आम्ही वाचवले. तुमच्या पतिव्रताधर्माच्या आड आलो, त्याचा जबाब ईश्वराच्या दरबारात देऊ आम्ही!'' यानंतर अहिल्याबाईंनी सारे सुखोपभोग, रंगीत वस्त्रे वर्ज्य केली आणि मल्हाररावांनी अहिल्याबाईंना बहुमानार्थी संबोधने वापरायला सुरवात केली.

✡

# कारभार

पेशवे सरकारने खंडेरावाच्या उत्तरक्रियेसाठी दहा हजार रुपये मंजूर केले. सूरजमल जाटानेही, मल्हाररावांच्या रागाला, प्रतिज्ञेला घाबरून पंधरा हजाराची गावे दिली. अहिल्याबाईंनी कुंभेरीजवळ खंडेरावांच्या स्मृतीप्रित्यर्थ छत्री उभारली आणि जाटाने दिलेल्या पंधरा गावांचे उत्पन्न त्या छत्रीच्या खर्चासाठी बहाल करून टाकले. मल्हारराव तर खचून गेले होते. देशात सर्वत्र पुन्हा अशांतता माजू लागली. त्यांना स्वस्थ बसणे शक्य नव्हते. मल्हारराव जाटाविरुद्ध झुंज घेत होते तर रघुनाथराव साठ लाख घेऊन जाटाशी तह करण्याचे मनसुबे करत होते. वर्ष असंच सरलं. वर्षश्राद्धासाठी आलेले लोक अहिल्याबाईंच्या सती न जाण्याची चर्चा करीत राहिले. त्यावेळी मात्र मल्हाररावांनी रुद्रावतार धारण केला. म्हणाले, ''अहिल्याबाईंना आम्ही सती जाऊ दिलं नाही. यापुढे याविषयी कुणी शब्दही बोलाल तर, जिभेसकट त्या माणसालाच आग लावून टाकेन.'' मल्हारराव आणि गौतमाबाई समर्थपणे अहिल्याबाईंच्या पाठीशी उभे राहिले.

अहिल्याबाई कामकाज बघू लागल्या. पांढऱ्या घोंगडीवर शुभ्रवस्त्रे नेसून अलंकारविरहित अशा अहिल्याबाईंना बघून, माणसं कासावीस झाली. मल्हारराव पुन्हा मोहिमा गाजवू लागले. सायनूरची लढाई झाली. दहालक्षाचा मुलूख काबीज केला. अहिल्याबाई इंदौरातून पत्राबरहुकूम सारी व्यवस्था करीत होत्याच.

त्याचवेळी नजरबाजांकडून भिल्लांच्या उपद्रवाच्या बातम्या येत होत्या. भिल्ल यात्रेकरूंवर हल्ले करीत. त्यांची लूट करीत. या लुटीला सरंजामदारांची साथ आहे. ते लुटीतला हिस्सा घेतात, हे कळलं अन् अहिल्याबाई संतापून उठल्या. त्यांनी सर्व सरदारांना पत्रे लिहिली. लिहिले की, ''सर्व सरंजामदारांना ताकीद देण्यात येते की, कुणाचाही भिल्लांशी संबंध आहे असे कळले तर सरंजामी रद्द करण्यात येईल. मग सबबी ऐकल्या जाणार नाहीत. वाटा वाटांवर गस्ती फौज ठेवा. सहास्वारांचं पथक असावं. त्यांचे काम एकच, वाटसरूंना पुढील गस्ती फौजेच्या स्वाधीन करावं त्यांनी पुढच्या गस्तीपथकापर्यंत यात्रेकरूंना संरक्षण द्यावं. तशी नाकी आणि ठाणी बांधून घ्या!''

इतकेच करून दूरदर्शी अहिल्याबाई थांबल्या नाहीत तर त्यांनी राज्यात जाहीर केले की, ''जो भिल्लांचा उपद्रव नाहिसा करेल त्याच्याशी कन्या मुक्ता हिचा विवाह करून देण्यात येईल!'' त्या काळात हे केवढे धारिष्ठ्य होते याची आज कल्पनाही येणार नाही. मालेराव तर दुर्गुणीच होता, निदान जावई शूर मिळावा आणि भिल्लांचा उपद्रवही थांबावा या दुहेरी हेतूने केलेली ही योजना म्हणजे अहिल्याबाईंच्या तेजाची एक शलाकाच होती. त्या म्हणत, ''ज्या मातीत धार्मिक यात्रेकरूस वा सामान्य प्रवाशास लुटारूस तनधन देणे पडते, त्या मातीचा दुलौकिक चारही दिशा जाणार. दगाबाज भिल्लांचा पुरता बीमोड करणे हे माझे प्रथम कर्तव्य आहे.''

दरम्यान मल्हारराव आले ते मालेरावांची सोयरीक ठरवूनच! बहाड घराण्यातल्या मैना नांवाच्या मुलीशी मालेरावांचा विवाह ठरणार होता. या वार्तेने अहिल्याबाईंना मुळीच आनंद झाला नाही. बहाडांच्या घरची मंडळी मैनेस घेऊन आली. अहिल्याबाईंनी मैनेच्या आईवडिलांना एकांतात बोलावले आणि स्पष्ट सांगितले की, ''आपली कन्या चंद्राचे बिंब. पण माझ्या काही उणीवा स्पष्ट करणे माझ्या दैवी आहे. देणेघेणे म्हणाल तर सुतळीच्या तोड्याचीही अपेक्षा नाही, पण बेलभांडार हाती घेऊन सांगते की, मालेराव फार व्रात्य, टवाळ, चहाडखोर आहेत. आम्हाला जुमानित नाहीत. घुटीची गोळी घेऊन नशा करतात, रागाचे आहारी जाऊन चाबूक उठवतात. ब्राह्मणांचे पाठी विंचूसाप सोडतात. अवघा क्रूरपणा! मातृप्रेमास मात्र तिला इथे उणे नाही!'' आपल्या मुलाच्या दुर्गुणांचा पाढा त्याच्या भावी सासुसासऱ्यांपुढे वाचण्याची हिंमत त्यांच्यात होती. सत्यप्रियता हा त्यांच्या देहाचा जणु कणाच होता. मालेरावचे लग्न मैनाशी झाले त्याचवेळी मुक्ताच्या लग्नाचा 'पण' कानोकानी गेला.

अहिल्याबाईंना शांतता नव्हती. अबदाली सरहिंदवरून निघाल्याची वार्ता, लाहोरची लुटालूट हे सारं ऐकून त्या अस्वस्थ होत्या. अबदालीने मथुरा वृंदावनात मुंडक्यांच्या राशी घातल्या. यमुना लाल झाली. अहिल्याबाईंनी जाणले की हिंदूंना चिरेबंद आश्रयस्थाने हवीत. त्यांनी ठिकठिकाणी धर्मशाळा बांधून घेतल्या. मल्हाररावांनी बरीच लूट मिळवली असे नजरबाजांकडून कळल्यावर अहिल्याबाई फारच संतापल्या. तोच एक निनावी पत्र आले. त्यात लिहिले होते की, ''मल्हारराव जर दिल्लीत ठासून बसले असते तर अवघे मार्गी लागले असते. पण द्रव्यलोभाने हे दक्षिणेत गेले. खंडणी आणि लूट इतकीच कामे. अंतर्वेद, कुंजपुरा, कुरुक्षेत्र, नजिबखान सारख्या सर्पाच्या स्वाधीन केले. हे कृत्य मराठ्यांच्या नाशास कारण होणार. मातोश्री, मल्हारबांची आता साठी आली. बुद्धि नाठी झाली. त्यांना आवरा.

आपली खाजगी संपत्ती दूषित झाली आहे. कळावे. आपला विश्वासू पुत्र!''

भाद्रपदात सुभेदार आले. भरपूर द्रव्य घेऊन आले. अहिल्याबाईंना त्या द्रव्याचा तिळमात्र आनंद नव्हता. पेशव्यांना बरेच कर्ज झाल्याचे कळाल्यापासून तर त्यांना चैन नव्हतं. श्रीमंत पेशव्यांचे सरदार करोडोपती होतात आणि श्रीमंत पेशवे कर्जबाजारी होतात हे घडतंच कसं? धणियास पदर पसरावा लागत असेल तर, रुपयांची नदी कुणाच्यातरी खाजगी संपत्तीत शिरते याची त्यांना खात्री होती. गेल्या दोन वर्षांत हिस्सेवारी नीट दाखवली गेली नाही याची जाणीव त्यांनी स्पष्ट शब्दात मल्हाररावांना दिली. अपकीर्तीपेक्षा मरण बरे, हरामाचा पैसा अन फुकटची तनसडी नसावी. व्यक्तिगत स्वार्थापेक्षा देश मोठा, ही माती मोठी हे पुन्हा पुन्हा सांगितले. ही सारी शिकवण आपणच मला दिली अन् एकाएकी आपण द्रव्याच्या मागे का लागलात? असा खडा सवाल अहिल्याबाईंनी केला. आपण चोरपेंढारी नसून पेशव्यांचे सुभेदार आहात याची जाणीव करून दिली आणि पेशव्यांचे कर्ज फेडणे हे आपले कर्तव्य आहे असे सांगून द्रव्य घेऊन त्यांना पुणे मुक्कामी रवाना केले. अहिल्याबाईंच्या समजदारीला तोड नव्हती. इतिहासात त्यांच्या चातुर्याचे, दूरदृष्टीचे अनेक दाखले आहेत. अहिल्याबाई म्हणजे सद्‌गुणांचे भांडार होत्या. या साऱ्या कथांना इतिहासात आधार आहे.

अहिल्याबाईंनी इंदूरात तोफांचा कारखाना उघडला. त्या स्वत: तिथे जात. हस्तनाला, जेजाला, मिलाप, सुरतनाला, सुरुंग यातला फरक त्यांना माहित होता. बत्तीबांस, गाडे, गोळ्या यांच्यावर त्या स्वत: नजर ठेवीत. आजच्या पिढीला त्यांची ओळख एक धार्मिक स्त्री इतकीच आहे. म्हणूनच अहिल्याबाईंचे हे सर्व गुण वाचकांपर्यंत पोचवण्यासाठी हे अनेक दाखले दिले. ही सारी कल्पित रचना नसून इतिहासात याचे दाखले पुरावे पानोपानी आहेत.

✡

# पानिपतचा संग्राम

हे अहिल्याबाईंच चरित्र असल्यामुळे पानिपतच्या संग्रामाची हकीगत अहिल्याबाईंच्या संबंधापुरती मर्यादित राखली आहे. पुणे मुक्कामी जाऊन मल्हाररावांनी कर्जफेड केली. त्यानंतर ते लढाईतच गुंतले. त्यांचं वय आता झाले होते. अडुसष्टावं वर्ष लागले. अहिल्याबाईंना मल्हाररावांच्या प्रकृतीची चिंता वाटे. त्यांचं कशातच लक्ष लागत नसे. तोफांच्या कारखान्याचं काम जोरात चालू होतं. पुणे येथून भाऊसाहेब, विश्वासराव सैन्यासह उत्तरेकडे आल्याचे कळले. मल्हाररावांच्या पत्राप्रमाणे अहिल्याबाई तोफखाना घेऊन ग्वाल्हेर येथे गेल्या. पानीपतची रसद तुटली होती. अन्नपाणी मिळत नव्हतं. घोड्यांना चंदी नव्हती. अशातच १७६१ सालची संक्रांत आली. पानिपतावर भीषण संग्राम झाला. विश्वासरावासह अनेक योध्दे मारले गेले. भाऊसाहेब नाहिसे झाले. लाख माणसं मेली. अनेक घाव लागलेले मल्हारराव, भाऊसाहेबांच्या पत्नी पार्वतीबाई, गौतमाबाई सारे ग्वाल्हेरला भेटले. पानिपत युद्धाच्या वार्ता, विजेसारख्या अंगावर कोसळल्या. मल्हारराव तशाच अवस्थेत सर्वांना सुखरुप पोचवण्यासाठी निघाले. अहिल्याबाई इंदौरला आल्या. वाडा जखमी सैनिकांनी भरला होता. अन्न अन्न, पाणी पाणी करत सैनिक कोसळत होते. निराधार, जखमी, अखेरचा श्वास घेणारे! युद्धाने झालेले ते भयंकर नुकसान बघून, अहिल्याबाईंचा थरकाप झाला. त्यांनी लगेच सेवापथके उभारली. वाड्याच्या खोल्या खोल्यातून, सैनिकांवर उपचार चालू झाले. इंदौरातील सगळे वैद्य उपचार करीत होते. मोठमोठ्या कढयातून सांजा तयार झाला. सर्वांना पोटभर खायला दिले गेले. पंचवीस चुली पेटल्या. हजारो माणसे राबत होती. अहिल्याबाई सगळीकडे फिरून लोकांना धीर देत होत्या. त्यांच्या चरित्रात अशा अनेक उदात्त गोष्टी आहेत की ज्या वाचकांपर्यंत पोचल्या पाहिजेत. त्यांची खरी ओळख सर्वांना व्हायला हवी. अहिल्याबाई म्हणजे एक चालती बोलती माणुसकीची गाथा होती.

✡

# मल्हाररावांचा मृत्यू

पानिपतच्या अपयशाचा डाग धुवून काढण्यासाठी मल्हारराव सतत मोहिमांवर जाऊ लागले. पाच वर्षांत त्यांनी उत्तरेकडची घडी बसवली. कामकाज, वसूली वेळच्यावेळी होऊ लागली. अहिल्याबाई इंदौरचा कारभार दक्षतेने पाहात होत्या. पानिपतचे सैन्य पाणी पाणी करत मेले. हे अहिल्याबाईंनी लक्षात ठेवून ठिकठिकाणी विहिरी खोदून घेतल्या. दंगाफसादाच्या वेळी आश्रयस्थाने हवीत म्हणून धर्मशाळा बांधून घेतल्या. अहिल्याबाईंचे धार्मिक कार्यही असे समाजकार्याशी जोडलेले होते. पारलौकिक सुखासाठी नव्हे तर माणसांसाठी त्या धर्मकार्ये करीत होत्या. कामात व्यग्र असतांनाच गौतमाबाईंचा मृत्यू त्यांना पोरके करून गेला. मल्हाररावांच्या मस्तकी गोळा लागला होता. तेव्हापासून त्यांच्या कानात सतत कळा येत. तरी मंगळूर, औरंगाबाद, राक्षसभुवन इथल्या चढाईचे काम मल्हाररावांनी फत्ते केले. पुणे दरबारी माधवराव आणि चुलते रघुनाथराव यांच्यातील भांडणे विकोपाला गेली होती. अहिल्याबाई म्हणत, ''या भांडणात फिरंग्यांचे फावते एवढे कोणास कळू नये? यांच्या बुद्धीवर इतका बुरसा कसा आला आहे?'' अधुनमधून मल्हाररावांची पत्रे येत. त्यातील काही पत्रे वाचकांसाठी मुद्दाम देत आहे. अहिल्यादेवींची थोर योग्यता पटवून देणारी ही पत्रे आहेत.

१

चिरंजीव अहिल्याबाईंना मल्हारजी होळकर यांचा आशीर्वाद; तुमचे पत्र मिळाले. समाचार अवगत झाला. 'ग्वाल्हेरमधे तोफखाना ठेवल्यास चारापाण्याची अव्यवस्था होईल, त्यामुळे तो सिरोज येथे घेऊन जात आहे' असे तुम्ही लिहिले आहे. तोफखाना सिरोजमधे ठेवून, तेथे बैलांच्या चारापाण्याची उत्तम व्यवस्था करून, तानूला तोफखान्याबरोबर तेथेच राहू द्यावे व तुम्ही इंदौरला जावे. तेथे पोचल्यावर सेंधवा परगण्याची वसूली आणि ताजपूरचा बंदोबस्त जरूर करावा. येथील परिस्थिती तुम्हास लिहून कळवली आहेच. मी आता दिल्लीहून रवाना झालो आहे. अंतरवेदच्या मार्गाने बुंदेलखंडाजवळ पोचेन. पुढे जसा विचार होईल तसे करण्यात येईल. छ२ रमजान, छ१३, सन ११७४ फाल्गुन मास.

२

चि. अहिल्याबाईंना आसीरवाद. गोहदकरकडे गढीचा जमाव आहे काय? त्याच्याकडे पूर्ण लक्ष ठेवून तोफखाना पाठवावा. एकदम साहस करू नये. आपला प्रभाव टाकून जेवढे काम होईल तेवढे करून घ्यावे. दुसऱ्याच्या भरोशावर तोफखाना फार दूर पाठवू नये. तोफखान्याची इभ्रत राहील व आपलेही काम होईल, मतलब सिद्ध होईल, अशा युक्तिचा विचार करीत राहावे. ६-११, रमजान, आशीर्वाद.

३

चि. अहिल्याबाईंना मल्हारजी होळकर यांचा आशीर्वाद; येथील समाचार तुम्हाला यापूर्वीच कळवला आहे. त्यावरून तुम्हाला येथील परिस्थिती माहित झालीच असेल. ताजी माहिती अशी की, आम्ही दिल्लीहून रवाना होऊन अनूप शहराजवळील कर्णवास गावी ६-११ रमजानला आलो आहोत. येथे होळीचा सण होईल. गिलच्यांच्या झगड्यात नजीब सामील आहे. अबदाली सरहिंदकडे आल्याची अफवा पसरली आहे. त्याच्याकडे नजीबखानास पाठवले आहे. तिकडील पूर्ण खबर आल्यावर पुढचा विचार केला जाईल. निश्चित खबर येईपर्यंत, गंगाकिनारी मुक्काम राहील. पूर्ण माहिती मिळाल्यावर, सकूराबादहून यावे लागेल. देवा नांवाच्या दूताकडून जे पत्र तुम्हाला पाठवले आहे ते मिळालेच असेल. त्यानुसार रवानगीची व्यवस्था करावी. बरोबर भरवशाचा माणूस नसल्यामुळे रवानगी केली नसल्यास इकडे कुणाला पाठवू नये. तुम्ही ग्वाल्हेरलाच राहावे. आम्हीही लौकरच प्रांतात येत आहोत. तिकडे आल्यावर, आवश्यकता वाटल्यास तुम्हाला बोलावून घेऊ. तुम्ही गोहदवाल्यांचा एक किल्ला तोफ डागून खाली करवून घेतला अशी दूताने आम्हास खबर दिली आहे. म्हणून तुम्ही ग्वाल्हेरासच राहावे आणि तोफा व जम्बूरीच्या गोळ्यांचा कारखाना सुरू करून लढाईची संपूर्ण सामग्री एकत्रित करावी. आम्हाला गोहदवाल्यांना हरविणे आवश्यक आहे. तुमच्या पसंतीचे उत्तम सामान असल्यास विश्वासपात्र माणसाबरोबर रसद पाठवावी. अथवा तेथेच असू द्यावी. ता. ६-११ रमजान, पौ. ६-२३ रमजान सुभखैयास सितैन सन ११७४.

४

चि. अहिल्याबाईंना मल्हारजी होळकरांचा आशीर्वाद; तुमच्याकडील वर्तमान कळवीत असावे. रसद पाठविण्यासंबंधी एकदोन पत्रे पूर्वी पाठवली होती. तुमचा सर्वांचा विचार येथे येण्याचा आहे असे आम्ही ऐकले आहे. आमची इच्छा काय आहे ते तुम्हास माहितच आहे. अशा परिस्थितीत परवानगीशिवाय येथे येणे

कितपत ठीक असेल? आमच्या आज्ञेची आवश्यकता असेल तर जसे आम्ही लिहिले आहे त्याप्रमाणे राजेश्री बहेरी आनंद अथवा राजेश्री गोविंद शामराव यांचेबरोबर रसद पाठवून तुम्ही तोफखान्यासह त्वरित सिरोंजला रवाना व्हावे. चिरंजीव मालेराव वगैरे कोणी आल्यास त्याचा उपयोग होणार नाही ही गोष्ट लक्षात ठेवून जसे लिहिले आहे तसे करावे. अबदाली सरहिंदकडे आला आहे. सुजाउद्दौला व सर्व रोहिले एकत्र झाले आहेत. गिलची दिल्लीस येणार आहे. पुढे जसा अवसर मिळेल त्याप्रमाणे करण्यात येईल. तुम्ही घडीचाही विलंब न लावता तोफखाना घेऊन सिरोंजला जावे. वाटेत कोठेही थांबू नये. लिहिल्याप्रमाणे वाटेवरच्या मार्गाने रसद रवाना करावी. पी. ६-१३, ११७४ पारनदी, फाल्गुन मास.

५

चि. अहिल्याबाईंना मल्हारजी होळकरांचा आशीर्वाद, येथे कुशल आहे. तुमच्याकडील वर्तमान लिहून कळवावे. तानू तुमच्याजवळ तोफखाना घेऊन आला आहे. तोफखाना सिरोंज येथे ठेवून, चारापाण्याची व्यवस्था करून पुढे जावे. रा. चिमणाजी गोविंद मामलेदारास बैलांसाठी चाऱ्याची व्यवस्था व तोफखान्याची दुरुस्ती करण्यास ताकीद करून, तोफांची तयारी करून ठेवावी. यासंबंधी असावधानी नसावी. त्या प्रांतात आम्ही लौकरच येत आहोत. तेथे आल्यावर तोफांची जरूरी लागेल. ज्यावेळी पत्र पोचेल त्यावेळी तयारी असली पाहिजे. त्यासाठी कळ, दोर वगैरे सर्व सामान तयार ठेवावे. बैलांना सशक्त करून ठेवावे. तोफखान्याच्या तयारीसंबंधी तानूने लिहिले आहेच. तुम्हीही ताकीद करून बैलांची वगैरे उत्तम व्यवस्था करवून घ्यावी. ६-२ रमजान, अधिक काय लिहावे?

(ही पत्रे इंदूरहून निघणाऱ्या 'मल्हारी मार्तंड'च्या १६ ऑगस्ट १९१७ च्या अंकात प्रसिद्ध झाली होती.)

या पत्रांवरून मल्हारराव अहिल्याबाईंना किती मानत होते हे लक्षात येईल. अत्यंत सामर्थ्यवान असलेल्या अहिल्याबाईंनाही 'जसे लिहिले तसे करावे' अशी जरब मल्हारराव पत्रातून देत असत. अहिल्याबाईंचे वर्तन नम्र सुनेप्रमाणेच असे. त्यांची मते त्या स्पष्टपणे सांगत पण त्यात मल्हाररावांचा अपमान होणार नाही अशीही काळजी घेत. वडिलांचा आदर करणाऱ्या भारतीय संस्कृतीचे अहिल्याबाई म्हणजे मूर्तिमंत उदाहरण होते.

गोहदच्या राजाला पराभूत करण्यासाठी मल्हारराव कटिबद्ध होते. त्यांच्या अथक प्रयत्नांना अहिल्याबाईंची भरीव मदत होती. गोहदच्या राजाचा पराभव झाला. मल्हारराव सुखावले. अहिल्याबाई पण जरा निश्चिंत झाल्या. महादजी शिंदे मल्हाररावांच्या मदतीस होते. त्यांच्यासोबतच मल्हारराव अलमपूर मुक्कामी

विश्रांतीला गेले. अहिल्याबाई फडणीशी-कोतवाली बघू लागल्या कामे खूप होती. चारच दिवस लोटले आणि खलिता आला.

तीर्थस्वरुप अहिल्याबाई, कळविण्यास अत्यंत क्लेष होतात की, तीर्थरुप सुभेदार मल्हारराव अलमपूर मुक्कामी वीस तारखेस, मंगळवारी दोन प्रहरी पंचत्वात विलीन झाले. कानाला ठणके लागले होते. बहुत उपचार केले. पण यश आले नाही. आपण सत्वर यावे. शरीर राखून ठेवत आहोत. आपला विश्वासू-महादजी. (२०-५-१७६६)

# अहिल्यापुत्र मालेरावास सुभेदारी

मल्हाररावांच्या मृत्यूमुळे अहिल्याबाईंवर फार मोठा आघात झाला. स्वतःला सावरत त्यांनी मालेरावच्या हस्ते इतमामाने मल्हाररावांचे अंत्यसंस्कार केले. मल्हारराव त्यांच्या काळातले फार मोठे लढवय्ये, शूरवीर होते. मोठमोठे राजपूत राजे त्यांच्या भीतीने थरथर कापत. 'मल्हार आया' अशी नुसती अफवा जरी आली तरी माणसे थरकून जात. अशा थोर सासऱ्यांच्या नांवे अहिल्याबाईंनी अलमपूर येथे मल्हारबांचे स्मारक उभारले. त्यांच्या पद्धतीप्रमाणे काही गावे इनाम देऊन खर्चाची व्यवस्था केली. मल्हाररावांबरोबर द्वारकाबाई आणि बनाबाई सती गेल्या. आता हरकुँवर नांवाच्या मल्हाररावांच्या तलवारीशी लग्न करून आलेल्या खांडाराणी फक्त उरल्या. खांडाराणी म्हणजे तलवारीशी लग्न करून झालेली बायको. तिला सती जायची सक्ती नसे. आता हरकुँवर म्हणजेच हरकुआईचाच आधार उरला होता. सगळा वाडा रिकामा झाला. मालेराव, मुक्ता, मैना आणि हरकुँवर! सगळे इंदूर सूतकात बुडून गेले. घरोघरी माणसे रडत होती. कुठे चूल पेटली नाही की अन्न शिजले नाही.

पेशव्यांकडून मालेरावांसाठी सुभेदारीची वस्त्रे आणि सहीशिक्के आले. ३ जुलैला मालेरावांना सुभेदारीची वस्त्रे देण्यात येणार होती. अहिल्याबाई तर शोकात बुडून गेल्या होत्या. तेवढ्यात गंगोबा तात्यांनी आपली पगडी अहिल्याबाईंच्या पायाशी ठेवली. म्हणजेच नौकरी सोडायचा मनोदय सांगितला. अहिल्याबाईंनी विचारताच त्यांनी कारणे सांगितली. मालेरावांनी सरकारी तिजोरीतून खाजगी खर्चासाठी सपाटा लावला आहे. हजारो रुपये खर्चून समारंभासाठी पुरुषभर उंचीच्या समया, रुजामे, चांदीचे सिंहासन, लोड, तकिये, गाद्या वगैरे आणले गेले. गंगोबातात्या म्हणाले की, मी मालेरावांना समजवू लागताच म्हणाले, ''सुभेदार म्हणा मला. मी मालेराव नाही.'' ज्या मातोश्री अहिल्याबाईंनी पैचाही खर्च सरकारी तिजोरीतून केला नाही तिथे मालेराव हजारो रुपये उधळीत होते. ते अतिशय उद्धट आणि हेकेखोर होते. ते कुणालाही आटोपेनात. परंतु अहिल्याबाईंनी गंगोबांना समजावल्या. 'आपण मालेरावांना माणूस करायचे आहे' असे सांगून पगडी

उचलण्यास सांगितले. मालेरावांना वळण लावण्याचे प्रयत्न चालू होतेच!

पेशव्यांनी मालेरावास सनद दिली ती अहिल्याबाईंच्या भरोशावर. मालेरावांची लायकी ते जाणून होते. अधिकार प्राप्तीनंतर त्यांचे वेडाचार अधिकच वाढत चालले. मद्यपान करावे, गुटी खावी, हत्तीवर हिंडावे, घोडे पळवावे, झुंजी लावाव्या यातच त्यांचा वेळ जाऊ लागला. हिशोबाकडे वळूनसुद्धा बघत नव्हते. हाताखालच्यांना कामे करणे अवघड झाले होते. अहिल्याबाई सर्व प्रकारे उपदेश करीत. अहिल्याबाईंचा त्याला जाच वाटे. त्यांचा धाक सहन होत नसे. पण त्याच्या उद्धटपणास सीमा नव्हती. तो वारंवार अहिल्याबाईंनी महेश्वर येथे राहावे, आमच्या कारभारात लक्ष घालू नये असे बोलत असे. मुक्ता अठरा वर्षांची घोडनवरी झाली आहे, तिचं लग्न आधी करा असंही बोले. अहिल्याबाई महेश्वरी राहू लागल्या पण त्यांची नजर मालेरावांच्या कारभारावर होती.

महेश्वरला येताच दरबार भरवून अहिल्याबाईंनी घोषणा केली. राज्यात भिल्ल, पेंढारी मातले यासाठी आम्ही आमच्या प्राणप्रिय मुक्तेचा विवाह भिल्लांचा बंदोबस्त करणाऱ्या शूरासंगे लावणार. ही घोषणा या आधीही दिली गेली होती. पण भिल्लांचे दंगे प्रबळ होते. कुणी लढवय्या धजत नव्हता. पण अखेर यशवंतराव फणसे या तरुणाने विडा उचलला. त्यांना सर्व मदत देण्यात आली. सैन्य, घोडे, पैसा घेऊन यशवंतराव गेले. त्यांनी असामान्य शौर्य गाजवले. प्रजेस सतावणाऱ्या भिल्लांचे म्होरके धरून आणले. अहिल्याबाईंची मुत्सद्देगिरी यापुढेच आहे.

यशवंतराव फणसे आणि मुक्ताबाई यांचं थाटात लग्न झालं, लग्नात भिल्लांच्या म्होरक्यांना 'नायक' ही पदवी देऊन त्यांच्या पगारी नेमणुका केल्या. प्रवासी आणि यात्रेकरूंची पूर्ण जबाबदारी नायकांवर टाकण्यात आली. त्यांना पोशाख आणि बाळ्या दिल्या. लुटारुंचे नायक करण्यातला अहिल्याबाईंचा दूरदर्शीपणा थक्क करणारा आहे. त्याचा खूप फायदाही झाला.

✡

# मालेरावांची अंदाधुंदी

अहिल्याबाईंच्या इंदूरच्या खेपा चालूच होत्या. रात्री दोन दोन वाजेपर्यंत त्या फडनिशीत काम करीत. मालेरावांचे सर्व लक्ष रंगढंगात होते. मनमानी कारभार, लहरीपणाची कमाल, तापटपणा, विकारांचे दशावतार! ते लहरीत असले की अहिल्याबाई सांगत, ''मालेराव, सत्ताधाऱ्यांनी दयाळू असावं. वडीलधाऱ्यांचं ऐकावं. त्यांचा सल्ला मानावा. अपमान करू नये. राज्याचा वसूल वाढता असावा. सरकारी तिजोरीतला पैसा खाजगीकडे वापरू नये यासाठी दक्ष असावं.'' पण सगळं पालथ्या घड्यावर पाणी ओतल्याप्रमाणे व्यर्थ! सुभेदारीची वस्त्रे घेतल्यापासून खाजगीतले पांच लक्ष उडाले होते. सरकारी खर्चाचा तर खर्चवेच लिहिणे कठीण झाले होते. त्यातून आता मनुष्यवध करण्यापर्यंत त्यांची मजल गेली. मालेरावांची एक आवडती दासी होती. तिच्या पतीचा मालेरावाने खून केला. अहिल्याबाईंनी या सगळ्यांचे पुरावे प्रत्यक्ष पाहिले. नोकरांच्या जबान्या घेतल्या. मालेरावावर कारवाई करण्याचे मनी योजले; पण दैवात वेगळेच होते.

(मनुष्यवध - पुण्यश्लोक अहिल्याबाई - पान २७ / म. श्री. दीक्षित)

मरणाऱ्या त्या माणसाने, मरतांना मालेरावाला शाप दिला- ''भूत होऊन छातीवर बसेन. तुला अन्न खाऊ देणार नाही. मध्यरात्री गळा घोटेन.'' याचा परिणाम मालेरावच्या मनावर झाला. तो मनोरुग्ण झाला. त्याला अन्नात रक्त दिसू लागले. रात्री कुणीतरी गळा दाबतय असा भास होई. मधेच विंचू चावला, साप चावला असं ते ओरडत. दुधात त्या मेलेल्या माणसाचं शीर दिसे. मालेरावांना वेड लागलं.

तीन महिन्यात मालेरावाचं नुसतं अस्थिचर्म राहिले. अशातच वेड आणखी बळावले आणि मालेरावांचा मृत्यू झाला. अहिल्याबाईंनी त्याची दिवसरात्र सेवा केली. पण यश आलं नाही. मालेरावच्या दोन्ही बायका मैना आणि पिरता त्याच्याबरोबर सती गेल्या. अहिल्याबाईंना या सतीप्रथेची चीड येई. त्यानी या मुलींना वाचवण्याचा खूप प्रयत्न केला. पण नातेवाईकांच्या रेट्यापुढे त्यांचं काहीही चाललं नाही. 'तुम्ही सती न जावून धर्म बुडवला' हे त्यांना सतत ऐकावं लागलं. जी स्त्री

धर्मश्रेष्ठ होती तिला अशी दूषणे लावली गेली. त्या सती न जाताही रोज सती जात होत्या. मालेरावाने सातआठ महिनेही राज्य केले नाही. त्यातून चार पाच महिने तर वेडाने ग्रासले होते. पहिल्या चार महिन्यांत तिजोऱ्या रिकाम्या करण्याचेच कार्य केले.

आपल्या एकुलत्या एक मुलाच्या निधनाने, अहिल्याबाईंचे मन शोकात बुडून गेले. आपण वारस घडवू शकलो नाही याची त्यांना टोचणी लागली. कुठेतरी दूर निघून जावे या वेदनेपासून मनाच्या टोचणी झुरणीतून सुटावे असे वाटू लागले. पण अखेर अहिल्याबाई विवेकाची पुतळी होत्या. संयम, विवेक यांनी त्यांचे मन परिपूर्ण होते. ज्या प्रजेसाठी त्या सती गेल्या नाही त्या प्रजेची त्या आई होत्या. आपले कर्तव्य समोर आणून त्यांनी आपल्या मनाला आवर घातला. जीवनाच्या कठोर कार्यक्षेत्रात त्या पुन्हा झेपावल्या. कामे तर पुष्कळच होती. मुलाच्या स्मृतीनिमित्त इंदूर येथे छत्री उभारण्याचे काम त्यांनी सुरू केले. आता तेवढेच त्यांच्या हातात होते. मुलाची स्मृति!

✡

# रघुनाथरावांची फजिती

या स्वार्थी जगाला कर्तृत्ववान माणसाची किंमत नसते. ते आपले उखळ पांढरे करायच्या मागे असतात. गंगोबातात्या चंद्रचूड यांच्या मनात असंच पाप आलं. वास्तविक, अहिल्याबाई त्यांना बंधू म्हणत. गेली चाळीस वर्षे ते कारभारी होते. त्यांनी राघोबादादांना म्हणजेच रघुनाथराव पेशव्यांना गुप्त पत्र लिहिले. त्यात लिहिले होते, ''होळकरांची दौलत आता बेतलमाल झाली आहे. सगळे दु:खाने गालब आहेत. तेव्हा आपणा उभयतास ही अमृतसंधी आहे. आपण त्वरित येऊन दौलत समेटावी. मी आतून आपणास साथ देतोच आहे.'' हे पत्र मिळताच रघुनाथराव मोठे सैन्य घेऊन निघाले. अहिल्याबाईंना गुप्तहेरांकडून आणि काही स्वामीनिष्ठ मंडळींकडून ही वार्ता समजली. अहिल्याबाई संतापून गेल्या. मी खुळी नाही की दुबळी! त्यांनी लेखनिखास बोलावून पत्रे सांगण्यास सुरुवात केली. पहिले पत्र तुकोजी होळकर यांना लिहिले. हे मल्हाररावांचे दासीपुत्र होते. अहिल्याबाईंना मातोश्री म्हणत आणि अहिल्याबाईसुद्धा त्यांना चिरंजीव म्हणत.

चिरंजीव तुकोजी होळकरास शंकर आज्ञेकरून, मातोश्री अहिल्याबाईंचा आशीश.

मामंजींनी अवसानकाळी आमचे पुत्राचा हात आपल्या हाती दिला. आपण पाणी सोडताच पिंडास काकस्पर्श झाला. याचे स्मरण ठेवून उदेपुरात जेवत असाल तर हात धुण्यास महेश्वरी यावे. संकटाचा काळ आहे. आपणास सुभेदारीची वस्त्रे देणे आहे. पण त्यासाठी हे राज्य राखणे आवश्यक. रघुनाथरावांच्या मनात पाप आले आहे. ते हे राज गिळंकृत करण्यास येत आहे. आमंत्रण देणारे घरचेच! पत्र देखता सत्वर यावे.

हे पत्र लिहून त्यांनी सांडणीस्वाराबरोबर पाठवले. नंतर सर्व सरदारांना सरंजामदारांना, त्याचप्रमाणे शिंदे, पवार, गायकवाड यांना सत्तावीस पत्रे लिहिली. त्यांनी लिहिले,

कैलासवासी सुभेदारांनी अजोड अखंड तलवारबाजी करून राज्याची वीट वीट जोडली. इमारत उभी केली. तलवारीच्या जोरावर हे राज्य उभे केले.

आमच्यावर एकामागून एक संकटे. आमचे कष्टार्जित दौलतीविषयी पापबुद्धि धरून रघुनाथराव युद्धास उभे ठाकले आहेत. तेव्हा कैलासवासी सुभेदारांच्या मैत्रिकीस जागून तमाम फौज पाठवावी.

श्रीशंकर आज्ञेकरून.

अहिल्याबाईंनी पत्रावर सदैव श्रीशंकर आज्ञेकरून अशी सही केली. हे राज्य ईश्वराचे आहे, आपण चाकर हीच भावना सदैव होती. या कटकारस्थानाचा सुगावा लागताच त्या गरजल्या, ''आमच्या पूर्वजांनी कुणाची खुषमस्करी करून हे राज्य कमावले नाही तर रक्ताचे पाणी केले आहे. मी एक अबला, असहाय्य स्त्री आहे या भ्रमात कोणी राहू नये. मी खांद्यावर भाले घेऊन समोर उभी राहिले तर, सगळे मनसुबे जागच्या जागी विरतील. माझ्या राज्याकडे कुणी डोळा वर करून पाहिले तर, आमचीही तलवार चालेल.'' अशा या तेजस्वी स्त्रीने रघुनाथरावांनाही पत्र लिहिले.

''आपण माझे राज्य हिरावून घेण्याचे कपट रचून आलात. आमचेकडील फितूरास गाठले. मला दुबळी समजलात की खुळी? दु:खात बुडालेल्यास अधिक बुडवावे हा दुष्ट हेतू. आता आपली गाठ रणांगणातच पडेल. माझ्याबरोबर युद्धकलेत पारंगत असणाऱ्या स्त्रियांचीही फौज असेल. मी हरले तरी कीर्ति करून जाईन. पण आपण स्त्रियांकडून हरलात तर आपल्याला तोंड दाखवायला जागा उरणार नाही. अहिल्याबाईंना तिच्या राज्यासकट गट्ट करता येईल या भ्रमात न राहावे. त्यातच आपले हित आहे.'' श्रीशंकर आज्ञेकरून.

इतके झाल्यावर त्यांनी सर्व लोकांना बोलावून सांगितले की या राज्यावर ज्यांनी सत्ता गाजवली त्यांची मी सून आहे, दुसऱ्याची पत्नी आणि तिसऱ्याची आई आहे. या राज्याचे रक्षण हे माझे कर्तव्य. या प्रजेची आई होण्यासाठीच मी सती गेले नाही. अशाप्रकारे या मुत्सद्दी स्त्रीने सर्व व्यूह पूर्ण रचला. दु:ख बाजुला ठेवून ही करारी आणि खंबीर स्त्री कडेकोट तयारी करण्याच्या मागे लागली. तुकोजीच्या अधिकाराखाली सैन्य तयार झाले. स्त्रियांची फौज उभी राहिली. स्वत: सर्व पाहाणी आणि देखरेख करू लागल्या. त्यांचा तो तेजस्वी कर्मठपणा आणि शौर्याचा आवेग बघून सैन्यात अपूर्व उत्साह आला. तोपर्यंत भोसले, गायकवाड यांचेही सैन्य येऊन पोचले. रघुनाथराव उज्जैनपर्यंत पोचले होते. तुकोजीरावही सैन्यासह निघाले. क्षिप्रा नदीच्या अलिकडे तुकोजी पलीकडे रघुनाथराव! तुकोजीने निरोप पाठवला, ''क्षिप्रा ओलांडताच तलवारीला तलवार भिडेल.'' तेवढ्यात अहिल्याबाईंचे पत्रही त्यांना पोचले. समोरचा सेनासागर दिसला. अहिल्याबाईंची ही सर्व योजना म्हणजे तेजस्वी

बाणेदारपणा, चातुर्य, दूरदर्शीपणा यांचा अत्युत्तम संगम होता. रघुनाथराव पार गडबडून गेले. युद्ध केल्यास पराभव अटळ होता. मागे फिरणे लाजीरवाणे होते. तेव्हा त्यांनी निरोप पाठवला की, ''मी तर आपल्या पुत्राच्या अपमृत्यूची दुःखवार्ता ऐकून आपल्या सांत्वनास येत होतो. आपण चुकीचा ग्रह करून घेतला त्याला काय म्हणावे?'' यावर अहिल्याबाईंनी निरोप पाठवला. ''सांत्वनास येण्याची कृपा केली. पण त्यासाठी ही अफाट फौज कशाला? आपण एकटे या. हे घर आणि इथली फौज आपलीच आहे.''

चेहरा टाकून राघोबा आले. दुखवटयाच्या चार गोष्टी करून खजील होऊन परतले. राघोबा डाव हरले होते. अहिल्याबाईंनी आपल्या उत्तुंग प्रतिभेने राज्यावरचे गंडातर टाळले होते. या प्रसंगामुळे त्यांची कीर्ति दूरवर पसरली. आपल्या अंगच्या अनेक गुणांचं प्रात्यक्षिकच जणु त्यांनी प्रजेला आणि समाजाला दाखवून दिलं. स्त्री शक्तिचा प्रत्यय आणून दिला. १७६७ मध्ये अहिल्यादेवींच्या इच्छेनुसार पेशव्यांनी तुकोजीरावांना माळव्याचा सुभेदार नेमले आणि अहिल्यादेवींनी राज्याची सर्व सूत्रे आपल्या हातात घेतली. पेशवे अहिल्याबाईंना मातोश्री अहिल्यादेवी म्हणू लागले. अहिल्याबाईंच्या मनात नर्मदा नदीविषयी अत्यंत श्रद्धा होती. नर्मदाकाठचे महेश्वर हे स्थान त्यांनी राजधानीसाठी निवडले. या नगरीचे जुने नांव महिष्मती असे होते. रामायण, महाभारत, पुराणे, धर्मग्रंथ यात महिष्मती नगरीचा उल्लेख आहे. प्रसिद्ध राजा सहस्त्रार्जुन याची हीच राजधानी होती. लंकापती रावण इथे आला असता त्याने आपल्या शक्तिने नर्मदेचा प्रवाह कोंडून ठेवला. पण तो प्रवाह निसटून हजार धारांनी बाहेर पडला अशी कथा आहे. महेश्वरापासून तीन मैलावर नर्मदेकाठी सहस्त्रधारा हे स्थान आहे ते या कथेतील सहस्त्रधाराच होय!

कवि कुलगुरू कालीदासानेही रघुवंशात महिष्मतीचा उल्लेख केला आहे. श्रीमान शंकराचार्य आणि मंडणमिश्र यांचा सुप्रसिद्ध विवाद याच नगरात झाला होता. इ.स. १७३०च्या सुमारास मल्हारराव होळकरांनी महेश्वर मुसलमानांकडून जिंकून आपल्या राज्यात आणले होते. अहिल्याबाईंना हे स्थान आवडे ते नर्मदेमुळे. नर्मदा अमरकंटकहून निघून भडोच या शहराजवळ अरबी समुद्राला मिळते. तेथपर्यंत नर्मदेच्या दोन्ही काठावर अनेक तीर्थक्षेत्रे आहेत. महेश्वरला नर्मदेचे पात्र खूपच विस्तारलेले आहे. अहिल्यादेवींनी येथे राजधानी स्थापन केली आणि महेश्वरचे भाग्य पुन्हा तरारून आले.

अहिल्यादेवींचे निवासस्थान अगदी साधे एखादे घर असावे तसे होते. राजमहाल वाटावा असे काहीही तिथे नव्हते. कुठलीही सजावट नाही की अवडंबर नाही. घरात एखाद्या मंदिराप्रमाणे वातावरण तेव्हाही असावे आणि आजही आहे.

याच घरात राजदरबार भरत असे ती मोठ्या ओसरीसारखी जागा आहे. घरातील मंदिरात अनेक शिवलिंगे आहेत. सोन्याचा पाळणा आहे. देवाचा जन्मोत्सव त्या पाळण्यात होई.

महेश्वराची 'राजधानी' झाली आणि माणसांचा राबता सुरू झाला. महेश्वर गजबजून गेले. अहिल्यादेवींनी खाजगी पैसा खर्च करून नर्मदेस सुंदर घाट बांधले. कलापूर्ण देवळातून मंत्रजागर होऊ लागला. प्रजेस बसण्यासाठी चिरेबंदी पायऱ्या बांधल्या गेल्या. नव्या पेठा, नव्या हवेल्या. विणकर आले, सोनार आले. नामवंत वैद्यांना आमंत्रणे देऊन क्षय या रोगावर संशोधने सुरू झाली. संस्कृत पाठशाळा उघडली गेली. विद्वानांना, कलावंतांना राजाश्रय मिळू लागला. महेश्वरचे सांस्कृतिक वैभव झपाट्याने वाढले. मुलींची पाठशाळा आणि स्त्रियांना शस्त्रशिक्षण हे काम अहिल्यादेवींनी दोनशे वर्षांपूर्वी सुरू केलेले पाहून मन चकित होते. जिल्हापरिषदा, खेड्यापर्यंत न्याय, कुटिरोद्योग, हुंडाबंदी, दारूबंदी हे सारे कार्यक्रम अहिल्यादेवींनी प्रथम सुरू केले हे कळल्यावर त्यांच्यापुढे साष्टांग दंडवत घालावेसे वाटते. त्यांनी जंगलतोडीस विरोध केला. हुंडा देणाऱ्यास आणि घेणाऱ्यासही शिक्षा ठोठावल्या.

त्याकाळचे शाहीर अनंतफंदी यांनी कवितेत वर्णन केले आहे. त्याचा मतितार्थ असा. ''नर्मदेच्या काठी बांधलेल्या उंच मंदिरांमुळे, घाटांमुळे महेश्वर तीर्थक्षेत्र कैलासासारखे मनोहर वाटते. देशोदेशीचे लोक इथे येतात. अहिल्यादेवींचे कार्य बघून कृतार्थ होतात. इथे गडगंज संपत्ती आहे. बाजार, दुकाने गजबजलेली आहेत. अहिल्यादेवी आपल्या प्रजेचा प्रतिपाळ पोटच्या मुलांप्रमाणे करीत आहेत. प्रजेचे रक्षण आणि त्यांच्या सुखसोयीकडे त्यांचे बारीक लक्ष आहे. अन्नछत्रातून गोरगरीब आनंदाने भोजन करतात.'' अशा या महेश्वरातून त्या काळचे सर्व राजकारण चालले. अनेक महत्त्वाचे निर्णय झाले. सुधारणा झाल्या. प्रजेसाठी रात्रंदिवस राबणारी प्रजेची आई तिथे होती. पेशवे म्हणत की पुण्याचे पुण्यद्वार महेश्वर येथे आहे. यात महेश्वर नगरीचा आणि अहिल्यादेवींचा गौरव पुरेपूर भरलेला आहे.

✡

# चंद्रावतांशी युद्ध

युद्ध ही विनाशकारी प्रथा आहे असे अहिल्यादेवींचे मत होते. त्याची अनेक कारणे त्या देत. पहिले कारण प्रजेची अपरिमित हानी होते आणि ज्या धनामुळे लोकांची प्रगती होण्याची शक्यता असते त्या धनाचा दुरुपयोग युद्धात होतो. पुन्हा समाजाचे, राज्याचे नेतेपण करणाऱ्या प्रमुख व्यक्ति युद्धात गुंतल्यामुळे त्यांचा प्रजेस उपयोग होत नाही. अशा बुद्धिमान व्यक्तिचा युद्धात विनाश होण्याचा संभव असतो. त्यांच्या सुरक्षिततेची काळजी घेण्यात मनुष्यबळ खर्ची पडते. सामान्य माणसे तर किडामुंगीसारखी मरतात. राज्याच्या तिजोरीवर भार पडतो. या शक्तिचा उपयोग राज्याचे नंदनवन करण्यासाठी व्हावा असा त्यांचा दृष्टिकोन होता. या कारणांमुळे युद्धे टाळण्याकडे त्यांचा कल होता. पण चंद्रावतांनी जेव्हा त्यांना आव्हान दिले तेव्हा त्या स्वत: रणात उतरल्या होत्या असे इतिहास सांगतो. जयपूरचे राजे सवाई जयसिंह यांना दोन मुले होती. ईश्वरसिंह आणि माधवसिंह. माधवसिंहाची आई उदयपूरची राजकन्या. तो ईश्वरसिंहापेक्षा वडील होता आणि मामा संग्रामसिंह याचेकडेच राहत होता. मामाने त्याच्या हातखर्चासाठी त्याला रामपुरा गावाची जहागीर दिलेली होती. जयसिंहाच्या मृत्यूनंतर जेष्ठ पुत्र म्हणून माधवसिंहाचा गादीवर अधिकार होता. परंतु त्याच्या गैरहजेरीत धाकटा ईश्वरसिंह गादीवर बसला. माधवसिंहाचा अधिकार डावलला गेला म्हणून उदयपूरचा राजा राणा जगजितसिंह फारच चिडला. तो माधवसिंहाचा मामेभाऊ होता. ईश्वरसिंहाचा पराभव करण्याइतके सैन्य त्याच्याजवळ नव्हते म्हणून त्याने मल्हारराव होळकरांची मदत त्यावेळी मागितली आणि माधवसिंहाची बाजू न्यायाची असल्यामुळे मल्हाररावांनी मदत करण्याचे मान्य केले. ईश्वरसिंगास लेखी कळवले की गादी माधवसिंहास द्यावी. ही कथा मल्हारराव जिवंत होते तेव्हाची आहे. मल्हाररावांना राजे अतिशय घाबरत. मल्हाररावांचं पत्र वाचून ईश्वरसिंह घाबरला आणि त्याने विषप्राशन करून आत्महत्या केली. त्याच्या मृत्यूनंतर माधवसिंग गादीवर बसला. त्याने दिलेल्या वचनानुसार ठरलेली रक्कम मल्हाररावांना दिली. त्यात रामपुरा हे गाव त्यांना दिले. वास्तविक रामपुरा गाव त्याच्या मामाचे होते. माधवसिंग मामाकडे

राहत होता तेवढ्यापुरते त्याच्या हातखर्चाला दिले होते. ते त्यांना न विचारता मल्हाररावांना माधवसिंहाने देणे अन्यायाचे होते. रामपूरचा अधिकारी उदयपूर घराण्याचा होता. त्याचे नाव चंद्रावत होते. मल्हाररावांचे वर्चस्व त्याला खुपत होते; पण तो काही करू शकत नव्हता. मल्हाररावांच्या मृत्यूनंतर, अहिल्यादेवी राज्यकारभार पाहू लागल्या. चंद्रावताने अहिल्याबाईंवर चढाई करण्याची तयारी चालवली. त्यांनी निम्बहेडा, जावद आणि आसपासची गावे बळकवायला सुरुवात केली. अहिल्याबाईंना संताप आला. होळकरांचे सैन्य तुकोजीबरोबर जाटांशी लढाई करण्यात गुंतले होते. अहिल्याबाई विचलित झाल्या. त्यांनी विचार केला की चंद्रावतांची फौज तीस हजारांची. आपल्याजवळ पाच हजारही नाही. उगाच माणसे जायबंद करून हार कशाला घ्यायची? यावेळी गनिमी कावा करून तडजोड करावी. त्या आपल्या सैनिकांना म्हणाल्या, ''आपण सारे मर्द आहात; पण आपण यावेळी संख्याबळाने कमी आहात. आपणास यावेळी तडजोड हिताची. दहापंधरा गावे तुमच्यापेक्षा मला जास्त नव्हेत. वेळ येताच बदला घेऊ.'' असे म्हणत त्यांनी चंद्रावतांना त्यावेळी ३१ गावे देऊन टाकली. पण त्यानंतर १७८३ सालात चंद्रावतांनी पुन्हा उठाव केला. त्यावेळी मात्र अहिल्याबाईंनी स्वत: येऊन युद्धनगारा वाजवला. अर्ध्या तासाच्या आत सैन्य शस्त्रास्त्रासह सज्ज झाले. त्या स्वत: सैन्याबरोबर जावेद येथे गेल्या. तिथून युद्धाची सर्व तजवीज करू लागल्या. शंभर स्वार आले ते रवाना केले, पन्नास आले, पाचशे आले, रवाना केले. ज्वाला तोफ पाठवली. शेवटच्या तुकडीबरोबर स्वत: अहिल्याबाई घोडासवार होऊन निघाल्या. सैन्यास म्हणाल्या, ''रजवाड्यास काय भिता? सगळे पोचट पुरुष. सर्वे मिळून चढाई करा. रजवाडे तुम्हाला भारी नव्हेत. मेवाड होते का नव्हते करून टाका. बोला मार्तंड की जय!'' आणि सैन्याने धडक मारली. मेवाडचा राजा फौजेला मिळाला. चंद्रावतांच्या बीमोड करून रामपुरा घेतला. तोच शरीफभाईच्या हाताला गोळी लागली. अंबाजीपंत कोसळले. पण त्यांनी रजवाडे कापून काढले. ज्वाला तोफ डागताच अलंगतट फोडून गेली. तिथेच सोभागसिंग हाती सापडला. त्याने वाटेत बारूद पसरून ठेवली होती. रजवाड्यांच्याच हाताने त्यावर जळता काकडा पडला. आपल्याच बारुदीने काही जळाले काही पळाले. सोभागसिंहाला धरून अहिल्याबाईंसमोर उभे केले. तो अहिल्याबाईंची विनवणी करत म्हणाला, ''मातोश्री क्षमा करणे हा आपला लौकिक. आजन्म दास होऊन राहीन.'' त्यावेळी अहिल्यादेवींचे बोल गरजले, ''सोभागसिंग, क्षमा पहिल्या दुसऱ्या गुन्ह्याला. तुमच्या शब्दात आता पाणी उरले नाही. शपथांची शंभरी झाली. सतत रामपुऱ्याचे झगडे उकरता. तुम्हास क्षमा अशक्य.'' आणि सोभागसिंगाला अहिल्यादेवींनी तोफेच्या

तोंडी दिले. होळकरांचे निशाण उंच फडकले. अहिल्यादेवींच्या शौर्याला पुणे दरबारी तीन तोफा सलामी दिली गेली. राजदरबारात नाना फडणीस म्हणाले, ''अहिल्यादेवींची शौर्यकथा आणि पराक्रम अजोड आहे.''

रामपुऱ्याच्या चंद्रावतांनी तीन वेळा बंडाचा झेंडा उभारला. तिन्ही वेळेला सुभेदार तुकोजीराव सैन्यासह दूर होते. प्रत्येक वेळी आपल्या चातुर्याने आणि पराक्रमाने, शौर्याने अहिल्यादेवींनी शत्रूला खडे चारले. युद्धाचे संचालन करण्यातले त्यांचे असामान्य कर्तृत्व बघून, राज्याराज्यात त्यांची कीर्तिचर्चा होऊ लागली. चंद्रावतांच्या उठावापासून बीमोडापर्यंतची ही वर्षानुवर्ष चाललेली कथा. मल्हाररावांपासून अहिल्याबाईंपर्यंत. यातील अधोरेखित करण्याचा भाग म्हणजे, अहिल्यादेवींचे युद्धासंबंधीचे विचार. जे या प्रकरणाच्या पहिल्या परिच्छेदात मांडले आहेत-ते विचार आजही, आजच्या घडीतील युद्धालाही लागू होतात. अहिल्यादेवींचे विचार आजही तेवढेच ताजे वाटतात हेच त्यांचे मोठे यश आहे.

✡

# अहिल्यादेवींचे कामकाज

उदंड कीर्ति मिळवणाऱ्या तेजस्वी अहिल्याबाईंचे सांसारिक जीवन म्हणजे केवळ उन्हाळा होता. गौतमाबाई आणि मल्हारराव त्यांना पोरके करून निघून गेले-मालेरावांचा भीषण मृत्यू झाला. खंडेराव तर कधीच निघून गेले. खंडेरावांच्या नऊ सती, मल्हाररावांच्या दोन सती, मालेरावांच्या दोन सती, अशा तेरा स्त्रियांना सती जातांना त्यांनी पाहिलं. मुक्ताबाईला एकच मुलगा नथू. हा एकच नातू पण त्यालाही क्षयरोगाने ग्रासले होते. कधी ताप, कधी खोकला. वैद्याचं संशोधन त्याच्या कामी येत नव्हते. मुक्ताबाई तर जणू मातृसेवेसाठीच जन्मली होती. तिचाच फक्त आधार होता. तिच्यासंगतीने अहिल्याबाईंच्या सांसारिक उन्हाळ्यात थोडा गारवा येत असे.

त्यांचा दिनक्रम आखलेला असे. सकाळी पहाटेच उठत. स्नान वगैरे आटोपून शंकराची पूजा करीत. स्तोत्रे म्हणत. मग दिवसभराच्या कामाची आखणी करीत. नंतर पेलाभर दूध पिऊन, तक्रारीचे कागद वाचून ठेवीत. गुप्त पत्रे लिहीत. फडणीशी कोतवालीतली कामे बघून, भोजन करावे. त्यानंतर न्यायदान, व्यवस्था, हिशोब बघता बघता मध्यरात्रही उलटून जाई.

अहिल्याबाई कुणाचा निष्कारण अनादर करीत नसत. अनादर करणे, अपमान करणे हे पाप आहे, असे त्या मानीत-कोणत्याही अधिकाऱ्यांनी प्रजेचा अपमान करू नये कारण प्रजेसाठी आपण आहोत हे त्या पुन्हा पुन्हा सांगत. प्रजेशी अनुचित व्यवहार आणि असत्य भाषण हीच त्यांच्या संतापाची कारणे होती. त्यांचा प्रजेशी व्यवहार कशा तऱ्हेचा होता त्याचे काही नमुने पाहिले की त्यांच्या बुद्धिची झेप लक्षात येते.

चांदवड येथील मामलेदाराने एका बोहऱ्याचा छळ चालवला होता. ही हकीगत अहिल्यादेवींना कळताच त्यांनी मामलेदारास ठणकावले, की प्रजेची हरप्रकारे इज्जत केली पाहिजे. सन्मान केला पाहिजे. तुमच्याबद्दल पुन्हा कोणत्याही प्रकारची तक्रार आल्यास त्याचा परिणाम चांगला होणार नाही. (होळकर रेकॉर्ड)

तुकोजी होळकरांनासुद्धा त्या हिशोबासाठी वेठीस धरत. हिशोबातले गोंधळ त्यांना एका नजरेत समजत. तुलाराम होळकर यास त्यांनी लिहिलेले पत्र उपलब्ध

आहे.

चिरंजीव तुलाराम होळकर यांस अहिल्याबाईचा आशीर्वाद. तुम्ही शेगाव परगाण्यात लोकांवर मनमानेल तसा जुलूम करून त्यांच्याकडून पैसे वसूल केले आहेत. प्रजेच्या मामल्यासाठी महालच्या अधिकाऱ्यांना तुम्ही तंग केलेत. ह्याचे काय कारण? तुम्हास कळविण्यास येते की, आजपर्यंत तुम्ही मन मानेल त्याप्रमाणे रुपये वसूल केलेत. त्याचा खुलासा सरकारात पेश करावा. यापुढे देण्याघेण्याच्या संबंधात स्वार पाठवून कोणत्याही प्रकारचा अन्याय केलात आणि त्याबद्दल तक्रार आली तर तुमचे ते कार्य अक्षम्य समजले जाईल.''

अशा प्रकारे अधिकाऱ्यांचे जाबजबाब घेत त्यांनी सदैव प्रजेच्या पाठीशी राहून कारभार केला. अप्पाजी जमीनदारांचा मृत्यू झाल्याचे ऐकून, त्यांनी तुकोबास पत्र लिहिले-चि. रा. तुकोबास, अप्पाजीरावांच्या मृत्यूचे वृत्त ऐकून चित्तास अत्यंत खेद झाला आहे. ते येथे आले होते तेव्हा त्यांना दत्तक घेण्यास सांगितले होते. ते प्रथमपासूनच आमचे सेवक आहेत. पुढे संस्थान चालले पाहिजे म्हणून तुम्हास लिहिले जात आहे की, त्यांच्या गोत्राचा लहान, चांगला होतकरू बालक आणून दत्तकविधान करवून घ्यावे. ठिकाण पूर्ववत चालत राहील असा प्रयत्न करावा. (पारनेर दप्तर-२१-६-१७७८)

सिरोजमध्ये खेमदास नावाचा श्रीमंत व्यापारी राहत होता. तो निपुत्रिक मृत्यू पावला. त्याच्या परिवारात त्याच्या विधवा पत्नीवाचून कुणीच नव्हतं. संपत्तीला अधिकारी किंवा वारसही नव्हता. हे पाहून तिथल्या अधिकाऱ्याने त्या विधवेस धमक्या देण्यास प्रारंभ केला. ''तुमची सर्व संपत्ती बेवारस असल्यामुळे सरकारजमा करण्यात येईल.'' ती विधवा घाबरली. ती म्हणाली, ''मी दत्तक घेईन, पण असे करू नका.'' त्या अधिकाऱ्याने त्या विधवेकडे तीन लाख रुपयांची लाच मागितली. 'तीन लाख दिल्यास संपत्ती तुमच्या नावे करून देईन.' ही गोष्ट कुणालाही कळता कामा नये अशी जरबही त्याने दिली. त्या विधवेच्या ओळखीचे एक सद्गृहस्थ होते. त्यांनी त्या विधवेस महेश्वरला जाऊन ही हकीगत अहिल्यादेवींच्या कानावर टाकण्याचा सल्ला दिला. ती स्त्री महेश्वरास गेली आणि अहिल्याबाईंना हे सारे सविस्तर सांगितले. हे ऐकताच अहिल्यादेवींच्या संतापाला पारावार उरला नाही. त्यांनी ताबडतोब त्या अधिकाऱ्यास पदच्युत केले आणि विधवेला दत्तक घेण्याची संमती दिली.

याच वेळी आणखी दोन लक्ष्मीपुत्र असेच विनापत्य मृत्युमुखी पडले होते. त्यांचाही कुणी उत्तराधिकारी नव्हता. आपली सगळी संपत्ती अहिल्यादेवींच्या पायाशी ठेवायची विधवांची इच्छा होती. परंतु अहिल्याबाई सदैव न्यायाच्या बाजूने

उभ्या होत्या. त्यांनी त्या दोन विधवांना बोलावून घेतले. त्यांना पुन्हा पुन्हा सांगितले की, 'हा पैसा तुमच्या पतीचा आहे. तुम्हीच त्याच्या मालक आहात. तुम्ही तुमच्या इच्छेने हा पैसा एखाद्या अन्नछत्राला द्या. पाणपोया उघडा. पोरक्या मुलांचा शिक्षणाचा खर्च करा. धर्मशाळा बांधून घ्या. घाट बांधायला पैसा द्या. विहिरी खोदा. दानाचं सुख घ्या.' प्रजेचा पैसा हडप करणं सहज शक्य असूनही अहिल्याबाईंनी सर्वांना नेक सल्ले दिले. विधवेकडून नजराणा घेणं म्हणजे दरोडा आहे असं त्यांना वाटे. प्रजेशी अहिल्यादेवींचे संबंध असे जिव्हाळ्याचे, प्रेमाचे होते. पक्षपात, भेदभाव, कपटकारस्थान या कशालाही थारा नव्हता. पांढरीशुभ्र साडी, भव्य कपाळ, टपोरे पाणीदार डोळे, सावळासा तेजस्वी रंग अशा अहिल्याबाई बोलू लागल्या की, सिद्ध योग्याच्या मंत्रासारखे त्यांचे शब्द येत. तेज, माधुर्य अन् शांती यांचा मिलाफ त्यांच्या नजरेत होता.

१७६७ ला अहिल्यादेवींचा राज्यकारभार सुरू झाला. चारपाच वर्षे झाली तरी पैशांची घडी बसत नव्हती. मालेरावाने केलेली उधळण भरून येत नव्हती. तशातच तुकोजीचा हिशोबाचा व्यवहार चोख नव्हता. मिळालेल्या लुटीची हिस्सेवारी जमा करणे, फौजेचा खर्च, इंदोरचा खजिना ही सर्व शिस्त, तुकोजीला लावायची हीच वेळ होती. तोच पुण्याहून दु:खद वार्ता आली. श्रीमंत माधवराव पेशवे याचा मृत्यू झाला होता आणि रमाबाईसाहेब सती गेल्या होत्या. तो धक्का अजून संपलाही नाही तोवर नारायणराव पेशव्यांचा खून झाला. पुणे येथे बारभाईचा कारभार सुरू झाला. अनर्थावर अनर्थ घडू लागले. रघुनाथरावांनी त्यांना स्वत:ला पाठिंबा द्यावा अशी गुप्त पत्रे सगळीकडे पाठवल्याचे कळताच या तेजस्वी स्त्रीने सर्वांस ताकीद दिली की, द्रव्यमोहाने दादासाहेबांना उर्फ रघुनाथरावांस कुणी आसरा दिल्यास गादीशी द्रोह समजून कडक शासन केले जाईल. मागून सफाई चालणार नाही याची फौजबंद सरदारांनी पक्की जाण ठेवावी. घरभेद्यास ठेचून टाकले जाईल. त्या कामी ढिलाई होणार नाही हे समजून असावे.' त्या स्वत: डोळ्यात तेल घालून गुप्तहेरांच्या बातम्याकडे लक्ष देऊ लागल्या आणि रघुनाथरावास कळवले की, 'आपली बदनियत आम्ही कधीच जाणली. आता तर खूनखराब्यापर्यंत मजल गेली. श्रीमंत नारायणरावास राखू शकला नाहीत. आपण धनीपण गमावले आहे. आलात तसे माघारी जावे. नर्मदा ओलांडल्यास खणाखणी होईल.' या तेजस्वी स्त्रीने त्यांना नर्मदा उतरू दिली नाही.

पुणे येथे आलेल्या आरिष्टात इंदोर येथील हिशोबाचे गुंते वाढतच होते. अहिल्यादेवी रात्रीचे प्रहरच्या प्रहर बसून ते मार्गी लावण्याचा प्रयत्न करीत.

सुभेदारांना पैसा पुरत नव्हता. फौजेला खर्च पुरत नाही अशी तक्रार! एकदा

अहिल्यादेवींनी तुकोजीस उपदेश केला. म्हणाल्या, ''चिरंजीव, मोहिमेत मिळालेली लूट आजकाल भरणा होत नाही. साठलेले पाणी पुरत नसते. आम्हास थोरल्या सुभेदारांनी आणाशपथा घालून, हिशोब लिहायला शिकवले. फौज किती बाळगली, वसूल किती आला, चाकरी किती घडली याचा खर्चवेच लिहावा. आपले आणि शिंद्यांचे महालराज्य सारखेच असून आपला वसूल इतका कमी कसा, हा प्रश्न पुणे दरबाराने विचारला आहे-आपण श्रीमंतांचे चाकर हे मनी सदैव असू द्यावे. जबाब देणे आहे. रात्रीपर्यंत वह्या हजर करा.'

अहिल्याबाई मृदु होत्या तितक्याच वेळप्रसंगी अत्यंत कठोर होत. पुणे दरबारातून हरिपंत आले होते ते अहिल्याबाईंचा पाठिंबा बारभाईला मिळवण्यासाठी. ते अहिल्याबाईंना म्हणाले, ''मातोश्री, रघुनाथरावांनी वैर मांडले आहे. त्यामुळे आपला पाठिंबा बारभाईस शपथपूर्वक द्यावा.'' त्यावर उसळून देवी म्हणाल्या, ''कैलासवासी सुभेदारांपासून आमची निष्ठा कैलासवासी बाजीरावांचे गादीशी. त्या गादीशी जे असतील ते आमचे मार्तंड. रघुनाथरावास नर्मदा उतरू दिली नाही. आम्हालाही शपथक्रिया करावी लागते असं आपण मानता, हेच आश्चर्य. मनीच्या एकनिष्ठेने आम्ही कधीच बेलभांडार उचलला आहे. बेल म्हणजे आमच्या लेखी भाजीपाला नव्हे. आपले बोलणेच अप्रशस्त!'' असा स्वभावाला पीळ होता. हरीपंतांनी जाणले की, अहिल्यादेवी अत्यंत हुशार, मुत्सद्दी, बोलण्यात धीट आणि फटकळ, व्यवहारात चोख! त्यांनी महेश्वरचा डौल पाहिला, बाजारपेठा, संशोधन केंद्रे, पाठशाळा, किल्ल्याची शिबंदी, युद्धभांडार, चिलखते, भालाबरच्या, जंबुरेतोफा! थक्क झाले. त्यांनी अहिल्यादेवींचे दरबारी कामकाज पाहण्याची इच्छा व्यक्त केली. मात्र गुप्तपणे मला बघायचे आहे की त्या न्यायदान कसे करतात. मी फार प्रशंसा ऐकून आहे.

हरिपंत एका शेतकऱ्याच्या वेशात येऊन बसले. दरबारात एक कवि आला. आपले कवन त्याने वाचायला सुरुवात केली.

देवि अहिल्ये शुद्धमति तू सर्वांची माता ।
ईश्वर आला तुझ्या स्वरुपे होऊनिया त्राता ॥
तव पायाशी तीर्थे सगळी, देवदेवळे ती ।
स्वर्गामध्ये नारद तुंबर तव लीला गाती ॥

या चार ओळी ऐकताच अहिल्यादेवी म्हणाल्या, ''कविराज, तुमची माझ्याविषयी श्रद्धा मी जाणते. त्याचा आदरही करते. पण मजसारखीचे हे अतिशयोक्त मला ऐकवत नाही. हे असंभव मला ऐकवत नाही. ईश्वराने माझ्यारुपे अवतार घेणे अशक्य, नारद तुंबर स्वर्गात माझी लीला गाणे अशक्य. देवांना आणि

देवळांनाही तुम्ही मज अभागिनीच्या पायाशी आणून ठेवले. हा तर कविराज अक्षम्य अपराध आहे. कशासाठी तुम्ही हे असे अतिशयोक्त गाता? आपणास दैवे काव्यगुण मिळाले. ते चार पैशासाठी सत्ताधाऱ्यांची कौतुके गाण्यात का दवडता? अहो, समाजाची दु:खे मांडा, शौर्याची पोवाडे गा, ईश्वराची लीला रचा, मग सोन्याचे कडेही देईन. परंतु आज ती चोपडी इकडे द्या. नर्मदेत बुडवते! या तुम्ही!'' हरीपंत ऐकत राहिले. पाहत राहिले. थक्क झाले. यातर देवाहूनही थोर! देवालाही स्तुती आवडते पण अहिल्यादेवींनी ते स्तोत्र नर्मदेत फेकले. असे तेज पाहिले नाही! अहिल्यादेवींच्या वाचेत अशी जबरदस्त शक्ति होती.

अहिल्याबाईंच्या नावे अशी कितीतरी प्रकरणे आहेत. आणि काळाच्या ओघात दोनशे वर्षांचा काळ म्हणजे जास्ती नाही! त्यामुळे या कहाण्या ऐतिहासिक स्वरुपाच्या खऱ्या गोष्टी आहेत. त्यांच्या अंगच्या गुणांचे सामर्थ्य अधोरेखित करणाऱ्या आहेत. अहिल्याबाईंनी काशी येथे ब्रह्मपुरीची स्थापना केली हे ऐतिहासिक सत्य आहे. एकदा काशीचे ब्राह्मण अहिल्याबाईंकडे आले. तिथे मुसलमानांचा उच्छेद फार झाला होता. वेदाभ्यास करण्यास निश्चित जागा नव्हती. मुसलमान हल्ला करीत तेव्हा शिष्यगण भीतिने सैरावैरा पळून जाई. आश्रमास कोणी जागा देत नव्हते- अहिल्याबाईंनी त्यांच्याबरोबर विसाजी देशपांडे यांना पाठवले. ते तिथल्या अंमलदाराशी बोलणे करून, आश्रमासाठी जागा, परिसर देतील, असे त्या ब्राह्मणांना सांगितले. ब्राह्मण अतिशय आनंदित होऊन धन्यवाद देऊ लागताच त्या म्हणाल्या, ''थांबा, माझे पुढील बोलणे सक्त ध्यानात ठेवा. तिथल्या वास्तूचे नाव ब्रह्मपुरी असेल. दर तीन महिन्यांनी किंवा मनात येईल तेव्हा आमचे गुप्तहेर तिथे येतील. कधी शिष्यरुपे, कधी अतिथीवेशे, तर कधी भिक्षुकवेशे. ब्रह्मपुरीची पाहणी होईल. आपले ज्ञानदान खरोखरीच चालू असेल तर आपणास काडीचाही धोका नाही. परंतु याखेरीज इतर काही असेल तर कपाळी शिक्षा येईल. साखळदंडाने जेरबंद केले जाईल. आमचे वकील तिथे आहेत.'' ब्राह्मण हे सारं ऐकूनही अहिल्याबाईंना आशीर्वाद देत गेले.

विसाजीपंत त्यांची व्यवस्था करून आले. त्या चार ब्राह्मणाची ते कौतुक गात होते. एकपाठी असलेले त्यांचे शिष्य विसाजीपंतांना चकित करून गेले... अहिल्याबाईंना अशा सत्कार्यांचा अतिशय आनंद होत असे. अजून ठाई ठाई विहिरी खोदायच्या होत्या. धर्मशाळा बांधायच्या होत्या. योजना पुष्कळ पण सरकारी तिजोरीत हिशोबाचा राडा होता. फौजेचा खर्चही अहिल्याबाई खाजगी तिजोरीतून करत होत्या. तुकोजी हाताबाहेर चालले होते. अहिल्याबाई आणि तुकोजी होळकरांचे वितुष्ट हा चर्चेचा विषय झाला होता. अखेर महादजी पाटील दोघात

समझोता करावा म्हणून मुद्दाम आले.

अहिल्याबाईंनी महादजीस तुकोजीबद्दल सविस्तर सांगितले. ते मद्याच्या आहारी गेले होते. राधी नावाची त्यांची ठेवलेली बाई होती तिच्या दारी हत्ती झुलत. मद्याचे बुधलेच्या बुधले जात. त्या म्हणाल्या, 'तुकोजींची दुष्कृत्ये त्यांना छळतात. हिशोब तर नाहीच, माझाच पैका ओरबडून खातात. त्यांचेकडून तिजोरीत या बारा वर्षात भर नाही अशाने राज्य राहील का? आपण वाकड्या चालीने चालावे अन् माझ्यावरच कुरघोडी करावी असे चालले आहे. त्यांचे सगळे फंद निमकहरामीचे आहेत. चार महाल घेऊन आम्ही बाजूस व्हावे असे त्यांचे मनी. वीट वीट जोडलेली ही इमारत ढासळताना आम्ही कशी बघणार? डोळ्यासमोर राज्याचा नाश होईल.'' हे सारं ऐकून महादजी म्हणाले, ''मातोश्री, आता अधिकउणे न बोलता जोडून घ्यावे. आम्ही पुरुष आपण केवळ स्त्री आहात. आम्ही आक्रमण करायचे ठरवले तर?'' यावर ताडकन उभे राहत ती तेजाची पुतळी बोलली, ''अवश्य, पाटीलबाबा, तुकोजीसह उभयता फौजबंदीने या. कैलासवासींच्या कृपेने इथेही कोणी बांगड्या भरून बसलेले नाही. श्री मार्तंडेकरून दारुबारूद येथेही सिद्ध आहे. नाही एकेकाला हत्तीच्या साखळदंडाने बांधले तर सुभेदारांचे नाव सांगणार नाही. आमच्याही सैन्याची करामत पाहून जा. आता या गोष्टीस चुकाल तर तुम्हाला मार्तंडाची शपथ आहे!'' अशा जहाल उत्तरावर पाटीलबाबांनी हसण्यावारी गोष्ट नेली. पण या तेजाने ते दिपून गेले होते.

तुकोजीरावाने अहिल्याबाईंच्या कागाळ्या पेशवेदरबारापर्यंत नेल्या तेव्हा मात्र हा गृहकलह उघडा करणे त्यांना भाग पडले. त्यांनी पुणे दरबारी पत्र लिहून सर्व कळवले. त्यांचे राजकारणाचे ज्ञान, कारभारासाठी लागणारी तेज बुद्धि, राज्यावरील निष्ठा आणि पेशव्यांबद्दल असणारी श्रद्धा या साऱ्याचं दर्शन यातून घडतं. त्यांनी दरबारी कळवले की, 'चिरंजीव तुकोजींनी गृहकलहाचा दुर्लौकिक आपणापर्यंत आणला. म्हणून या वयात सुभेदारांच्या सुनेस बेलभांडार करणे भाग पडते आहे. आम्ही श्रीमंतांचे गादीस आणदाणा बांधलेलो आहोत. हे वचनाने कृतीने सिद्ध आहे. ही संकटाची वेळ. इंग्रज वसई घेऊन बसलेला! म्हणून शब्दही न बोलता, फौजेस पैसा पुरवत राहिले. चिरंजीवास सुभेदारी दिल्या. दिवसापासून सात वर्षे मुलुखगिरी, चार वर्षे सरदारी केली. या १२-१३ वर्षात एक पैसा आम्हास दिला नाही. कागदपत्रेही नीट ठेवली नाहीत. खर्चमेळाचा ताळ नाही. येणे किती, देणे किती याचे भान नाही. फौजेच्या खर्चासाठी वेगळे ठेवलेल्या मुलुखावरही वसूलीची कर्जे घेतात. आम्हास शब्द विचारीत नाहीत. आपण तेथेच चौकशी करावी, तर ते न होता, आम्हास विचारले जाते. हे विपरित घडते म्हणून बोलावे लागते. गृहकलह

श्रीमंतांनाही चुकला नाही. तुकोजी एक हिशोब नीट ठेवते, तर आम्ही राज्य डोक्यावर घेतले असते. आमची तशी हिंमत आहे. खार्वदाच्या सेवेत आमरण अंतर पडणार नाही. नाना फडणीसांच्या भरोशावर सोसतो आहोत. तुकोजीच्या अशा बेहिशोबी वागण्यामुळे, मला डोळे फाडून बघावे लागते. नानांनी महेश्वरी पायधूळ झाडावी.

श्री शंकर आज्ञेकरून.

या पत्रात अहिल्याबाईंचे जातिवंत राजकारण्याचे सर्व गुण ओतप्रोत भरलेले आहेत. तुकोजी होळकरांचा मुलगा मल्हार, असाच बेफाम होता. तो आपल्या उर्मट वागण्याचे प्रजेला खूप त्रास देऊ लागला. अहिल्याबाईंनी दोनतीन वर्षे त्याला प्रेमाने समजावण्याचा प्रयत्न केला. अखेर त्यांना मल्हारची तुरुंगात रवानगी करावी लागली. त्याला कैद करून आणण्याचे दिव्य अहिल्याबाईंनी केले.

थोरले सुभेदार मल्हाररावांनी शूर सरदारांना जहांगिरी, वतने दिली होती. त्यामुळे वतनदारांना प्रतिष्ठा लाभे. आपल्या जहागिरीच्या मुलखाची अंतर्गत व्यवस्था ते अत्यंत पोटतिडीकेने पाहत. अहिल्यादेवींनी तीच पद्धत चालू ठेवली. जहागीरदारांना घोडदळ आणि पायदळ सज्ज ठेवावे लागे. वेळ पडल्यास राज्याची सेवा त्यांना करावी लागे. राजकीय आज्ञा, काटेकोरपणे पाळाव्या लागत.

एकदा महदपूरच्या जहागीरदाराने प्रजेकडून अन्यायाने करवसूली केली. त्यांचे अधिकारी कोंबडं, तूप वगैरे वस्तू मागू लागले. याची तक्रार येताच त्या स्वत: महदपूरला गेल्या. चावडीवर थांबून लोकांचे जबाब घेतले. खात्री करून घेतली. तेवढ्यात जहागीरदाराचे कानी अहिल्याबाई आल्याची वार्ता गेली. ते फळफळावळाचे करंडे घेऊन आले. अहिल्यादेवी कशालाही शिवल्या नाहीत. त्यांनी जहागीरदारास समज दिली आणि सांगितले की, ''या तक्रारींची आधी दखल घ्या. फराळ करण्यास तेव्हाच येऊ. आज पाणीसुद्धा पिणार नाही.'' प्रजेचे हित सर्वात जास्त महत्त्वाचे होते. या घटनेमुळे त्या जहागीरदाराची वागणूक कायमची सुधारली. त्याने जास्तीचा कर जनतेस परत दिला. अहिल्याबाई अशी अचानक भेट देत. त्यामुळे अधिकाऱ्यांवर त्यांचा दाब असे. धाक असे. दोषी अधिकाऱ्यांविरुद्ध कारवाई करायला त्या कधीच कचरल्या नाहीत. त्यांना माणसांची उत्तम पारख होती. त्यांनी जोडलेली माणसे आयुष्यभर त्यांची आणि राज्याची सेवा करीत राहिली. नोकर आणि त्यांची कुटुंबे याकडे अहिल्याबाईंचे पूर्ण लक्ष असे. नोकरांशी त्यांची वर्तणूक प्रेमाची, सहानुभूतीची आणि क्षमाशील अशी असे. औषधांची व्यवस्था करून नोकरांच्या आजारी कुटुंबीयांची त्या काळजी घेत.

त्यामुळे त्यांची मातुश्री ही पदवी सार्थ होई. नोकरांच्या आजारी कुटुंबीयास भेटायला जाऊन विचारपूस करणे, धीर देणे हा त्यांचा स्वभाव होता. त्यामुळे प्रत्येकाला अहिल्याबाईंविषयी आदरापेक्षाही वरच्या दर्जाची असलेली भक्ती होती. त्यांना 'देवी'ची पदवी सामान्य जनांकडूनच मिळाली होती. उत्तम कामगिरी करणाऱ्यांना, महावस्त्रे, भूषणे देऊन त्यांचा जाहीर गौरव होई. त्यांना प्रतिष्ठा लाभे. सदैव विवेकाने कार्य करणाऱ्या अहिल्याबाई कुणाच्याही दबावास बळी पडल्या नाहीत. प्रजेचे हित हेच त्यांचे ब्रीदवाक्य होते. आपण प्रजेसाठी आहात हीच ताकीद प्रत्येक अधिकाऱ्यास होती.

सर्व सुरळीत चालले होते. तुकोजी होळकरांचे हिशोब मिळत नव्हते. तेच एक मोठे शल्य होते. तेवढ्यात विंध्याचलाच्या परिसरात राहणाऱ्या भिल्लांनी पुन्हा बंड पुकारले. ते चिरडून टाकणे त्यांना सहज शक्य होते. पण तसे न करता त्यांनी अंमलदाराकरवी त्यांना पत्र पाठवले. पत्रात लिहिले, ''बाबांनो, माझ्या प्रजेला कुठलाही भेदभाव न करता मी सुखी करण्याचा प्रयत्न करते आहे. तुमच्या बंडाचे कारण मला सांगा. तुमचा त्रास, अडचणी मी दूर करते.'' भिल्ल मंडळी आली. आपुलकी आणि प्रेमळपणाने त्यांनी भिल्लांच्या अडचणी दूर केल्या. भिल्ल त्यांचे भक्त झाले.

प्रेम आणि शक्ति या दोन्ही गोष्टींचा वापर करून त्यांनी राज्याची प्रगती साधण्याचा सदैव प्रयत्न केला. त्या प्रजेसाठीच जगत होत्या.

✡

# बाणेदारपणा

मुक्ताबाईंचा मुलगा नथोबा याची प्रकृती साथ देत नव्हती. कदाचित लग्नानंतर प्रकृती सुधारेल म्हणून नथोबाचं लग्न बाळाबाई हिच्याशी मोठ्या थाटात करण्यात आले. घरात बाळाबाईचा वावर सुरू झाला. अहिल्याबाईंना बरं वाटलं. राजकारणात तर अनेक रंग होते. इंग्रजांच्या पलटणी वाढत होत्या. सुरत, भडोच इकडे पलटणी होत्या. रघुनाथरावही इंग्रजांच्या बाजूस झुकले होते. सुजाउद्यौलाच्या मुलाने आईला आणि आजीला कैद केले होते. तुकोजीनेही वसूल महेश्वरी देऊ नये असे सांगून ठेवले होते. त्यामुळे अहिल्याबाई उदिग्न होत्या. गोहदच्या किल्ल्याची भांडणे सुरूच होती. एवढ्यात दोन मुस्लिमांना घेऊन किल्लेदार आले. अहिल्याबाई नेहेमीप्रमाणे घोंगडीवर बसल्या होत्या. एकजण पुढे होऊन मुजरा करत अहिल्याबाईंना सांगू लागला की, बादशहाचा इनायतनामा आहे. तो आपण स्वत: उभे राहून घ्यायला हवा. अहिल्याबाईंनी 'तो वजीरापाशी द्या' म्हणून सांगताच, मुस्लीम दूत म्हणाला, ''आपकोही खडी ताजीम इनायतनामाको देनी पडेगी. ये इनायतनामा खडी ताजीम देके, इज्जतके साथ लेना है, ये अर्जी है!'' आता मात्र अहिल्याबाईंना संताप आला. त्या म्हणाल्या, ''पातशहाची जबाबदारी मराठ्यांवर आहे. त्यांच्या इनायतनाम्याची इतकी मिजास? श्रीमंत पेशव्यांचे पत्र पण आमचे वजीरांचे हाती येते, तर तुमचा इनायतनामा वजीर आणू शकत नाही? ही अट आम्हास मान्य नाही. श्रीमंत पेशव्यांशिवाय आम्ही कोण्या बादशहाकरता उभे राहणार नाही. मुकुंदराव, त्यांनी दिलं तर तो इनायतनामा इकडे आणा आणि देणार नसतील तर त्यांना निरोप द्या!'' मुकुंद हरीजवळ पत्र देऊन मुस्लिम तणतणत गेले.

भाद्रपद लागला की हरतालिका, गणेशचतुर्थीच्या उत्सवास त्यांचं मन रमे. पण पितृपक्षात चार श्राद्धे करताना त्यांना इंदूरचे दिवस आठवत. मालेरावाने खून केलेल्या हिरादासीच्या प्रियकराची पण त्यांनी समाधी बांधली. दानदक्षिणा देऊन त्या मन हलके करण्याचा प्रयत्न करीत. मुस्लिम फकीरांनाही श्रावणात खैराती दिल्या जात. फकीरांना त्या सांगत, ''आम्ही आपल्या दर्ग्यास वर्षासने देतो. मंदिरांचा नाश करणाऱ्या आपल्या भावांना सांगा धर्म वैर करायला शिकवत नाही. ईश्वर-अल्ला

एकच आहे.''

दरम्यान पुणे येथून सदाशिव दिनकर हिशोब बघण्यास आले होते. चार दिवस अहिल्याबाई कागदपत्रे पुरवत माहित देत होत्या. तुकोजीराव वसूल परस्पर इंदूरलाच नेतात हे त्यांच्या लक्षात आले. त्यांना अहिल्याबाईंना बाजूला करून सर्व सत्ता हवी हेही लक्षात आले. अहिल्याबाईंनी सर्व दानधर्म खाजगीतून केला इतकेच नव्हे तर फौजेलाही त्याच पैसा पुरवत आहेत हेसुद्धा कळले. ते अहिल्यादेवींना म्हणाले, ''आपला कारभार तर गंगाजळाप्रमाणे निर्मळ. पण तुकोबास सत्ता हवी. त्यामुळे ते अडवणूक करीत आहेत.'' अहिल्याबाई म्हणाल्या, ''तेवढेही केले असते. पण भरभराटीची आशा नाही. मी बाजूस होण्याचा अवकाश चार वर्षात निशाण खाली येईल. वसुलीच्या पन्हाळी यांच्या भोग विलासात जातात. माझी खाजगी खर्च केली तरी त्याच पन्हाळ्यातून जाणार तेही केले. करोड रुपये ओतले. पण मद्याच्या बुधल्यात गेले. यांच्या रक्षेच्या दारात हत्ती झुलतात. मी मल्हाररावांची सून आहे. दौलतीसाठी रक्त शिंपले आहे. मी राज्याचा विनाश बघू शकत नाही. हिंमत असेल तर तुकोजी होळकरांची खाजगी तपासा. सगळ्याची उत्तरे तिथे मिळतील. हा तपास आधी घ्या आणि मग मला प्रश्न विचारा. हे होत नाही तोवर मी कशांचीही उत्तरे देणार नाही! आम्ही आमच्या पैशांवर तुळशीपत्र ठेवून बसलो आहोत. हे राज्य भस्मचर्चित शंकराचे असे आम्ही मानतो. आमची सही कुठेही नाही. शंकरआज्ञेवरून अशी सही असते. त्याची आज्ञा आहे तोवर कर्म करू!'' पुणे येथील वकील या बुद्धिवादावर काही बोलू शकले नाही.

एकदा सातआठ भिल्ल एका युवकाला घेऊन आले. आले ते अहिल्याबाईंच्या पायावर पडले. म्हणाले, ''आम्ही लई वंगाळपन केलं. आम्हास अद्दल घडवा. उखळात घाला नाईतर चाबूक मारा. यानला आपलं दर्सन घ्यायचं व्हतं पन हे मागून उमजलं. आधी आम्ही त्यांना लुटाया लागलो. मंग हे म्हनाले समदं घ्या पन ही अहिल्यादेवींची शाल राहू द्या. त्यांच्या पायावर वाहायची आहे- अन मंग आमाले लई लाज वाटली. यानला घिऊन आलो. आता आमचं काई बी करा!'' अहिल्याबाईंनी विचारलं. कुठून आलात?.... तो युवक म्हणजे कवि अनंतफंदी होता. संगमनेरचे अनंतफंदी. त्यांनी अहिल्यादेवीना महेश्वर घाटावरचे काव्य ऐकवले. खूप गोड आवाज होता. अहिल्याबाईंना कळले की हे लावण्या गातात. अहिल्याबाई म्हणाल्या, ''आपले कवित्व ईश्वरे दिलेली-रसाळ वाचा, गोड आवाज! पोवाडे गा, भक्तिपर गीते गा. नाशवंत स्त्रीदेहाच्या वर्णनात आपली प्रतिभा का दवडता? भोग भोगायला कुणाला सांगावे लागत नाही. त्यागाचा उपदेश करावा लागतो. तो करा. समाजसुधारणा करणाऱ्या रचना करा.'' अनंतफंदीचा कडेतोडे

देऊन सत्कार करण्यात आला. भिल्लांनाही घोंगड्या दिल्या गेल्या. यानंतर, अनंतफंदींनी फटके लिहिले. ''बिकट वाट वहिवाट नसावी, धोपट मार्ग सोडू नको!'' हा फटका त्यांचाच.

त्याचवेळी सवाई माधवरावांचे लग्न ठरल्याचा लखोटा आला. नाना फडणीसांनी अहिल्याबाईंना, 'लग्नास यावे' अशी इच्छा स्पष्ट सांगितली होती. १७७४ चा जन्म आणि १७८४ त लग्न. आज हसू येईल पण तेव्हा तशीच पद्धत होती. अहिल्याबाई म्हणाल्या, ''धन्य त्या नानांची आणि हरिपंताची! कोसळते छत उभे केले!'' अहिल्याबाईंची श्रीमंतावर अशी थोर निष्ठा होती.

✡

# अहिल्याबाईंची खाजगी तिजोरी

हिशोबांचा हा गोंधळ वाचून वाचकांना प्रश्न पडेल की अहिल्याबाईंना तुकोजी वसूल देत नव्हते तर हे धन आले तरी कुठून? त्यासाठी मागची हकीकत सांगायला हवी. एकदा सुभेदार मल्हाररावांनी श्रीमंत बाजीरावांजवळ इच्छा व्यक्त केली की, राज्यकारभारासाठी त्यांच्याकडे जे इलाखे दिलेत त्यातले काही त्यांना बक्षीसपत्र करून देऊन टाकावे. म्हणजे कुटुंबाच्या उदरनिर्वाहाची काळजी राहणार नाही. आपल्या या शूर सुभेदाराच्या इच्छेला मान देऊन सालीना तीन लाख रुपये उत्पन्नाचा इलाखा पेशव्यांनी गौतमाबाईंच्या नावाने इनाम दिला. त्या उत्पन्नाला खाजगी उत्पन्न म्हणू लागले. त्यात वाढ होत होत ते पंधरा लाखापर्यंत गेले. उत्तम शेती, व्यापार उदीम यामुळे हे उत्पन्न वाढले. त्यानंतर लढाईत जी लूट मिळे तिचा काही हिस्सा खाजगीत, काही पेशवे दरबारी व उरलेला सरकारी तिजोरीत भरणा होई. मल्हाररावांनी अगणित लढाया केल्या. खाजगी, सरकारी आणि पेशवे तिजोरीतही भर टाकली. अहिल्याबाईपण चौथाई सरदेशमुखी वसूल करून सरकारी तिजोरी मजबूत ठेवीत. मल्हाररावांच्या मृत्यूच्या वेळी या खाजगी कोशात पंधरा कोटी रुपये होते. याच कोषातून अहिल्यादेवींनी अनेक सुधारणा केल्या. परंतु त्यांच्या दुर्दैवाने मालेरावासारखा कुपुत्र त्यांच्या दैवी आला. तुकोजी होळकरसारखे पैशांची उधळपट्टी करणारे सुभेदार मिळाले. लायक वारसदार लाभता तर अहिल्यादेवींनी सुवर्णाच्या नगरी उभ्या केल्या असत्या.

सरकारी तिजोरीची भिस्त वेगवेगळ्या करांवर असे. पेशवे दरबारच्या कागदपत्रावरून समजते की माळव्याचा वसूल चौऱ्याहत्तर लाख रुपये होता. अहिल्याबाईंच्या कारभारात तो वाढून एक कोटी साडेपाच लाख झाला होता. अहिल्याबाईंनी खाजगी आणि सरकारी तिजोरीचे हिशोब स्वतंत्र ठेवले होते. खाजगी खर्चाची पैसुद्धा सरकारी तिजोरीवर पडलेली त्यांना सहन होत नसे. दोन्ही कोषावर त्यांचे नियंत्रण होते. अहिल्याबाईंच्या काळात कधी दुष्काळ पडला नाही. त्यांची राहणी अत्यंत साधी असल्यामुळे खर्च जास्त नसे. युद्धे राज्यात फारशी झाली नाहीत. होळकरांचे राज्य श्रीमंत पेशव्यांच्या अधिपत्याखाली होते.

अहिल्याबाईंमध्ये असामान्य नीतिनैपुण्य आणि असामान्य योग्यता होती. त्यांच्या मनी पेशव्यांबद्दल भक्ति होती. त्यांच्या मर्जीविरुद्ध काहीही न करताही अत्यंत अभिमानास्पद रीतीने त्यांची कारकीर्द चालू होती. पेशवे स्वत: अनेक वेळा अहिल्याबाईंचा सल्ला घेत. पुणे येथील राजकारणी सुद्धा-अहिल्याबाईंविषयी आदर बाळगून होते. तुकोजी होळकरांनी पैशांचे घोळ केले तरी अहिल्यादेवीच्या कारभाराला त्यांनी सदैव गंगाजळ निर्मळ असेच म्हटले. महेश्वरी पुणे दरबारचा वकील असे. त्यांनी लिहिलेले या पत्रांचे पुस्तक 'महेश्वर दरबारची बातमीपत्रे' म्हणून प्रसिद्ध आहे. त्यात अहिल्यादेवींच्या रोजच्या कामकाजाची भरपूर माहिती असे. त्यांच्या रोखठोक बोलण्यावर आणि कडक, फटकळ बोलण्यावरसुद्धा त्यांच्या नि:स्पृहपणाची छाप असे. कोणाचेही अन्याय दडपण त्यांनी मानले नाही. प्रत्यक्ष सासरे मल्हाररावांनासुद्धा फटकारण्याची त्यांची हिंमत होती. मल्हाररावांना पुणे येथे कर्जफिड करायला लावणे हा त्याचा एक उत्कृष्ट नमूना आहे. त्या काळी भारतातील राजे, जमीनदार, अधिकारी अहिल्याबाईंबद्दल नितांत श्रद्धा बाळगून होते. त्यांची रीत आणि धोरणे स्वच्छ होती. युद्धाच्या काळातही कोणत्याही राजाने होळकर राज्यावर चढाई केली नाही. टिपू सुलतान आणि निजामही अहिल्यादेवी विरुद्ध कधीही उठले नाहीत. पुणे, ग्वाल्हेर, भरतपूर, जयपूर, उदयपूर, जोधपूर, सातारा आणि इतरही राज्यातले वकील महेश्वरी होते. होळकर राज्याला अतिशय प्रतिष्ठा प्राप्त झाली होती ती अहिल्यादेवींच्या वागण्यामुळेच होय!

अहिल्याबाईंनीसुद्धा अनेक राज्यात आपले चतुर प्रतिनिधी ठेवले होते. हैद्राबाद, लखनौ, भोपाळ, दिल्ली, कलकत्ता येथून त्यांना सर्व कामकाजाची पद्धतशीर माहिती मिळे. गुप्तहेरांकडून बातम्या समजत. त्यांचे हे खाते फारच ताकदीचे होते. सर्व राज्यांची माहिती त्या हुशार स्त्रीला असे. त्या माहितीचा उपयोग त्या आपल्या प्रजेच्या भल्यासाठीच करत.

✡

# मोरोपंत

ठिकठिकाणी अहिल्याबाईंनी बांधलेली देवालये, विहिरी, धर्मशाळा बघून कवि मोरोपंत फार प्रभावित झाले. पानिपताहून आलेले सैन्य पाणी पाणी करत होते म्हणून ठिकठिकाणी विहिरी खोदल्या गेल्या. लढाईच्या वेळी कित्येक निरापराध्यांना केवळ आश्रयस्थाने नसतात म्हणून चिरेबंद धर्मशाळा बांधल्या गेल्या. अहिल्याबाईंचा यामागील दृष्टिकोन विशाल सामाजिक असा होता हे कळल्यावर मोरोपंत चकित झाले. मुस्लिम आपली देवळे पाडतात तो त्यांचा धर्मांधपणा झाला. परंतु ही भग्न देवालये आपण नीट केली नाही तर आपली अस्मिता दुखावते, तिचा अपमान होतो असे त्यांचे मत होते, म्हणून त्यांनी भग्न देवालयांची दुरुस्ती करवली. अनेक ठिकाणी त्यांनी मुस्लिमांना समजावून सांगितले की, बादशहाच्या रक्षणाची जिम्मेदारी मराठ्यांनी घेतली तेव्हा आपण भावाच्या नात्याचे झालो. मी तुम्हास मशीदही बांधून देते; पण, देवळांचा विध्वंस करू नका. मोरोपंतांना अहिल्यादेवींचा हा कर्मयोग समजला आणि त्यांनी एक तेजस्वी कविता लिहिली.

श्री हरिभक्ता देवि अहिल्ये वरा धरा भूषा।
पूषा तुज साधु म्हणे ख्याता तुजसम न बाणतनुभूषा ॥
देवी अहिल्याबाई झालीस जगत्रयात तू धन्या।
न न्याय धर्मनिरता अन्या कलिमाजी ऐकिली कन्या ॥
धमार्थ गोत्रजन्या किंवा झालीस तू धराजन्या।
तुज देवि भेटली जी सत्कीर्ती कधीच हे न राजन्या ॥

महेश्वरला अहिल्याबाईंच्या पायावर डोई ठेवण्यासाठी ते खास आले होते. विसाजीपंतांकडे थांबले. वरील कविता विसाजीपंतांना वाचायला दिली तेव्हा मोरोपंतास समजले की स्वस्तुती त्यांना विषसमान भासते. मागे एका कविची वही नर्मदेत बुडवली होती. तेव्हा मोरोपंतांना वाटले की या तर देवाहून थोर आहेत. ईश्वरासही स्तोत्रे आवडतात. यांना स्वस्तुती त्याज्य वाटत असेल तर या वृत्तीला उपमाच नाही-पुरुषार्थ, दूरदर्शीपणा, सामाजिक जाण, प्रजावात्सल्य यामध्ये त्या अद्वितीय!

मोरोपंतांना सोन्याचे कडे देऊन अहिल्याबाईंनी त्यांचा गौरव केला. मोरोपंतांनी विचारले, ''मातोश्री, आपण अनेक तीर्थस्थानांना गौरव प्राप्त करून दिला. त्यांना वर्षासने तोडून दिली.''

''काय करावे मोरोपंत-आपल्या पराभवाच्या खुणा पुसून शौर्यास आवतण देण्यासाठी सारे करायचे. आणखी काही शंका असल्यास विचारा. आपणास आमचा दृष्टिकोन कळणे अवश्य. आपण हजार जणांना सांगाल.''

''मातोश्री, आपण बांधकामाचा खर्च करून वर वर्षासन तोडून दिलेत तर सरकारी तिजोरीवर भार येण्याचा संभव नाही का?''

''मोरोपंत, आम्ही पुढच्या शंभर वर्षाचे पाहतो. राज्यकर्ते बदलतीलही. प्रत्येक राज्यकर्त्यापुढे यांनी पदर पसरावा का? वर्षासने तोडून दिलीत तरच ही अन्नछत्रे, पाणपोया पुन्हा चालू राहतील. हे सारे आम्ही आमच्या खाजगी पैशांनी करतो. प्रजेच्या सुखासाठी माझ्या तिजोरीवर मी कधीच तुळशीपत्र ठेवलंय. मी जगते ती प्रजेसाठी! आपण सरस्वतीपुत्र! लक्ष्मीपुत्रांची नावे नष्ट होतील पण आपली कीर्ति अमर राहील. ग्रंथ निर्माण करा. आम्ही द्रव्यबळ देऊ. आम्हास तेवढेच येते!''

''आम्हास तेवढेच येते'' असे नम्रपणे बोलणाऱ्या अहिल्यादेवी किती मोठ्या आहेत हे मोरोपंतांना कळले होते. त्यांची पायधूळ माथी घेऊन ते परतले.

# नथोबाचा मृत्यू

गंगाज़ळ निर्मळ कामकाज असणाऱ्या अहिल्यादेवींचं सांसारिक जीवन अत्यंत दु:खमय होतं. नथोबाचं दुखणं विकोपाला गेलं. एकाएकी त्याला खोकल्याची उबळ आली. रक्ताची उलटी झाली आणि अहिल्याबाईंच्या मांडीवरच नथोबाने प्राण सोडला. मुक्ताबाई, यशवंतरावांच्या दु:खास पारावार राहिला नाही. त्यांनी आकांत मांडला. नथोबाच्या महायात्रेची तयारी सुरू झाली. नथोबाच्या दोन बायका होत्या. बाळाबाई आणि गौरी. त्यांना कवटाळून बसल्या अहिल्याबाई. अखेर अहिल्याबाईंना गुंगीचे चाटण दिले गेले आणि नथोबाबरोबर या चिमुरड्या नातसुना सती गेल्या. अहिल्याबाईंनी आतापर्यंत १३ सती पाहिल्या आता १५ झाल्या. अहिल्याबाईंचे मन संसारातून कधीच उडाले. आता तर वाड्यात त्यांना क्षणभर बसवेना.

नथोबाच्या सूतकाचा तिसरा दिवस आणि वाड्यावर दोनशे तीनेशेचा जमाव धडकला. अहिल्याबाईंना शोक आवरत नव्हता. मुक्ताबाईचं रडणं बघवत नव्हतं. तरी त्या जमावाला सामोऱ्या गेल्या. रयतेस मागे फिरवायचे नाही, हे त्यांचे सूत्र होते. रिखबदास जोहरी यांचेकडे सरकारचे कर्ज होते. ते मागूनही देत नव्हते म्हणून अधिकाऱ्यांनी त्याची स्त्री आणि कन्या नजरकैदेत ठेवण्याची धमकी दिली म्हणून हा जमाव येथपर्यंत आला होता. अहिल्याबाईंना अधिकाऱ्यांच्या वागण्याचा राग आला. त्यांनी स्वत:च्या खाजगीतून त्यांच्या कर्जाचा भरणा सरकारी तिजोरीत करण्यास सांगितला आणि पुढे ताकीद दिली की, ''कोणत्याही परिस्थितीत आमच्या राज्यात स्त्रियास कैद वा नजरकैद करण्याचे साहस कोणी करू नये. तसाच प्रसंग असेल तर आमच्या संमतीची गरज लागेल हे लक्षात घ्यावं!'' लोक अहिल्यादेवींचा जयजयकार करत गेले.

केसो भिकाजी नावाचे पेशव्यांचे वकील महेश्वरला होते. त्यांनी अहिल्याबाईंच्या शोकाची हकीगत (महेश्वर दरबारची बातमीपत्रे) पेशव्यांना कळवलेली आहे. त्यात ते म्हणतात, कसेतरी दिवस लोटत आहेत. अहिल्याबाई शोकातून बाहेर येत नाही. पुणे व्यतिरिक्त कामकाजात लक्ष लागत नाही.

नथोबाच्या आणि नातसुनांच्या वस्तू कुरवाळत रडत असतात. इतकी धीरोदत्त स्त्री...विरक्तित बुडाल्या. फडणिशीत जाऊन बसतात.

तुकोजी सातआठ महिन्यानंतर सांत्वनास आले. बोलणी झाल्यावर शिंदे-होळकरांचे पैशांवरून होणारे भांडण पुढे मांडले. अहिल्याबाईंनी तुकोजींना पुन्हा पुन्हा ताकीद देऊन 'शिंदे यांच्याशी भांडणे उकरू नका' म्हणून बजावले. तेच आपले हितकर्ते आहेत. त्यांची पेशवे दरबारी चाकरी होते, आपली होत नाही, याची तुकोजीला जाणीव दिली.

सांत्वनाची पत्रे येतच होती. त्या पत्रातला सारांश एकच होता की, आजपर्यंत नेकीने कारभार केलात, तीच जिद्द कायम ठेवावी. यात्रेस निघून जाऊन हार घेऊ नये. आता किती वर्षे जगायचे आहे? जे तुम्हास तेच आम्हास. ज्या कार्यासाठी इतकी झुंज घेतली ते कार्य करता करताच मरावे. उदास होऊ नये. थोरल्या सुभेदारांनी प्रजेसाठीच आपणास सती जाऊ दिले नाही. ते काम उदास होऊन सोडू नये. करून दाखवणे हेच तर आपले ब्रीद आहे. आम्ही आपल्या पाठीशी आहोत. ईश्वराने फार दुःख दिले. यातून हिंमत बांधणे आपल्यालाच शक्य!'' ....पण अहिल्याबाईंचा ईश्वराने जणु अंतच मांडला होता. नथोबाला जाऊन अडीचतीन वर्षेही झाली नाहीत तोवर जावई यशवंतराव फणसे कॉलऱ्यास बळी पडले. बघता बघता एका रात्रीत त्यांचा प्राण गेला. सर्व प्रयत्न अपयशी ठरले. मुक्ताबाई आणि तिच्या दोन सवती, सतीवस्त्रे नेसून येताच अहिल्याबाईंना ब्रह्मांड आठवले. अहिल्याबाईंनी मुक्तेपुढे पदर पसरून विनंती केली की, 'सती जाऊ नकोस. मला म्हातारीला सोडून जाऊ नकोस.' त्यांचा विलाप हृदय फाडून टाकत होता. मुक्ताबाई आईला म्हणाल्या, ''मातोश्री, नथोबा गेला. माझ्या दोन चिमण्या सुना गेल्या. काळीज पोखरून निघालं. आता स्वामीही गेले. मी कुणासाठी आणि कशी जगू? तुमचे तसे नाही, तुमचे कौतुक जग गाते. तुमची लेकरासारखी प्रजा आहे. आमच्या कुळात सहगमनाची चाल आहे. शोक आवरा, मला निरोप द्या मातोश्री.''

चंदनाच्या चितेवर मुक्ताबाई बसली. ती आणि अहिल्याबाई एकमेकींकडे पाहून घेत होत्या. पाहाता पाहाताच त्या बेशुद्ध पडल्या.

✡

# शिंदे होळकर

शिंदे होळकर यांचे पैशांवरून तंटे होत, त्याचे अहिल्याबाईंना दु:ख असे. मुक्ताबाई गेल्यानंतर त्यांना जगावेसे वाटत नव्हते. परंतु या सर्व संकटांना मोठ्या खंबीरपणे तोंड देत त्यांना प्राप्तकर्तव्य जीव ओतून केले, हे त्यांचे वैशिष्ट्य आहे! शिंद्यांची कीर्ति खूप झाली होती. दिल्लीची बादशाही ताब्यात घेतली. बादशहाकडून पेशव्यांना 'वकील ई मुतालिक' ही पदवी पदरी घेतली. मीरबक्षीगिरीच्या सनदा मिळवल्या. त्यांचा सन्मान पुणे दरबारने खास दरबार भरवून केला. महादजी शिंदे यांना पेशव्यांनी खास किताब दिला. कीर्तिचे ध्वज उंच गेले. पण होळकर घराण्याची अशी कीर्ति होत नाही आणि होळकर पेशव्यांचे कामी येत नाही, वसूल जात नाही ही शल्ये अहिल्याबाईंचे मन पोखरत होती. महादजी शिंदे यांनीही 'होळकरांना उपसर्ग देऊ नये' असे आपल्या माणसांना बजावले होते. म्हणून अहिल्याबाईंनीही ग्वाल्हेरास पत्र लिहून कळवले होते की, महादजींचे हुकुमाप्रमाणे वर्तन करावे. नाहीतर जबाब द्यावे लागतील. आणि त्यांनी महादजीसही कळवले की, आपण अपार लौकिक केलात. आमचे मन अभिमानाने भरून आले. आपले भाऊपण असेच राहू द्यावे. अहिल्याबाईंनी शिंदे-होळकरांची एकी टिकावी म्हणून सतत प्रयत्न केले.

अहिल्याबाईंना आपल्या दूताकडून कळाले की, आपण शिंद्यांशी आणप्राणे सलूख करण्यासाठी धडपडतो पण इंदूरात शिंद्यांशी लढण्यासाठी, पंचवीस तोफांचे गाडे तयार होत आहेत. दहा हजारी फौज उभी राहत आहे. महादजी शिंद्यांचे महाल उध्वस्त करण्याचे मसूदे होत आहेत. अहिल्याबाईंच्या संतापाला पारावार राहिला नाही. त्यांनी तुकोजीस बोलावून त्यांची कानउघडणी केली. त्यांना समजावले, ''शिंदे होळकरांची दुही दौलतीस अपाय करेल. शिंद्यांशी भांडणे काढू नका. आम्ही सलोखा करतो अन् तुम्ही काय करता? आपण चुकीच्या वाटेने जात आहात. लाखेरीत लढाई केली. अपयश घेतले. अपसमज किती करून घ्यायचे? ही शूराची कामे नव्हेत. ही संसारातल्या किड्यांची कामे. कुठे गेले तुमचे शौर्य? कुठे गेला भाऊपणा? महादजींनी राघवगडकरास, गोहदवाल्यास आणि

गुलामकादरास धुळीस मिळवले, त्या महादजींना तुम्हास संपवणे कठीण नव्हते. आज ते श्रीमंतांचे कंठभूषण झाले आहेत. तुम्ही करता केवळ घरच्या लढाया, घरची गाणी, घरची उठाठेव. पुढे निजामाची मोठी मसलत आहे पुणे दरबारची! त्यांचा विचार नाही. घरच्या गुंत्यात पाय घालून शेण करावं अन् त्याच्या गवऱ्या थापाव्या. अहो हे वागणे की काय? एक वेळ तुमची जिद्द केवढी होती, शौर्य केवढे होते? महादजींना तुम्हीच एकदा म्हणाला होता की शिंदे होळकर ज्या रणांगणी तिथे अपयश कुठले? चिरंजीव कुठे गेलेत ते दिवस? तो पराक्रम? ती एकी? अहो, आपला बदनक्षा होतो याची लाज कुणी धरायची चिरंजीव? मरणाचे भय शूराने कुरवाळत बसावे की काय? हे बघणे आम्हास शक्य नाही. आपणास जाणे नसेल तर आम्ही आजच निघतो. रणांगणावर मरेन, पण कर्तव्यापासून मागे फिरणे नाही.'' यावर सुभेदार अहिल्यादेवींच्या धैर्याचे कौतुक करत पुणे मुक्कामी चाकरीसाठी गेले. अशा होत्या अहिल्याबाई! कर्तव्यात कसूर दिसली की त्यांच्या जिभेची तलवार होई. सपासप सपके मारत त्या आपल्या कर्तव्याची जाणीव करून देत. त्यांच्या बोलण्यावर निःस्पृहतेची मुद्रा असे. स्वार्थासाठी त्या कधीच जगल्या नाहीत. किंवा त्यांची जीभ स्वार्थासाठी चालली नाही. देशासाठी, प्रजेसाठी, होळकरांच्या कीर्तीसाठी, श्रीमंत पेशव्यांच्या खुशालीसाठी, त्यांना जय लाभावा म्हणून त्यांची धडपड होती. त्यांचा देवधर्मसुद्धा त्यांच्या पारलौकिक हितासाठी नव्हता तर समाजाच्या सुखासाठी, प्रजेच्या आनंदासाठी, पेशव्यांच्या अभिवृद्धीसाठी होता. अहिल्यादेवी हे आलौकिक रत्न होते.

✡

# खुन्या मुरलीधराची कथा

पुणे येथे दादा गद्रे या ब्राह्मणाने मुरलीधराची मोहक मूर्ती आणली. त्यांचे देऊळ तयार होते. ही मूर्ति देवळात स्थापन करायची होती. नाना फडणीसांनी ती मूर्ति पाहिली आणि त्यांना तिचा मोह झाला. नानांनी तीच मूर्ति गद्रे यांचेपाशी मागताच तो ब्राह्मण घाबरला. पण समर्थापुढे काय बोलणार? त्याने पहाटे पहाटेच मूर्तिची प्रतिष्ठापना करण्याची तयारी केली. ही गोष्ट नानांना कळताच त्यांनी काही अरब शिपाई दारुगोळ्यासह पाठवले. वाटेवरच कुणा रावबहादूराची हवेली होती. त्यांच्या बायकोच्या अंत्ययात्रेची तयारी सुरू होती. फुलांचे करंडे आत जात होते. इतमामासाठी त्यांचे खाजगी सैन्य उभे होते. अरब शिपायास वाटले इथेच मूर्ति आहे. ते आत शिरू लागले. लोकांनी अडवताच गोळीबार काढले. तोवर 'मूर्ति पुढे आहे' असे कळले. अरब गारदी पुढे गेले तर देवळात गद्रे यांनी मूर्तिची प्रतिष्ठापना करून टाकली होती. त्या मुरलीधराच्या मूर्तिमुळे खून पडले म्हणून त्याचं नावच खुन्या मुरलीधर पडलं. ही सर्व हकीगत अहिल्याबाईंना पुणे येथील होळकराच्या वकीलाकडून कळताच त्यांना संताप आला. त्यांनी महेश्वर येथे असणाऱ्या पेशव्यांच्या वकीलास बोलवून पेशव्यांच्या अभिवृद्धीसाठी श्रीचे चरणी प्रार्थना करावी असे सांगितले. आणि म्हणाल्या, ''नानांसारख्या समर्थाला दुसरी मूर्ति आणवून घेणे कठीण नव्हते. प्रजेच्या वस्तूवर डोळा ठेवणे हेच पाप आहे. राज्यकर्त्याच्या भीतीमुळे प्रजेला धर्मकृत्ये चोरासारखी करायला लागावी हेच विचित्र! या प्रकरणात धर्मकार्यात अडथळा आणणाऱ्या नानांची चूक अक्षम्य! निर्बुद्ध सैनिकांचे हाती दारुबारूद देणे म्हणजे सीमा झाली. दारुगोळ्याचा वापर युद्धात; धर्मकार्यात नव्हे. आपल्या अपकृत्याचे शाप श्रीमतांस बाधतील! नानांना कळवा आमचा निरोप! नाना याबद्दल आम्हास दंडही सुनावतील, पण सत्य बोलायला आम्ही भीत नाही. समोर टिपूची मातब्बर मसलत आहे. दारुगोळा त्यासाठी ठेवा, प्रजेसाठी नाही. आम्हास हे कृत्य विषसमान वाटते. बेलाशक लिहा. आम्ही सत्यासाठी मृत्यूसुद्धा पत्करू.''

अहिल्याबाईंच्या मनाची खोली मोजायला माप नव्हतं. धर्मकार्यात असे विघ्न

आणणाऱ्या आणि सशस्त्र सैनिक पाठवणाऱ्या नानांना स्पष्ट शब्दात सांगावा धाडला. कुठेही भाषा मवाळ नाही. सत्ताधाऱ्यांपुढे गुळमुळीत बोलणं नाही. सर्व स्पष्ट आणि खणखणीत होतं. त्याचं कारण हेच की सत्यापुढे त्या मृत्यूलाही भीत नव्हत्या.

वयोमानाप्रमाणे त्या थकत होत्या. सत्तरी उलटून गेली. सगळं आयुष्य राज्यासाठी वेचलं; पण मनात खंत उरली. होळकरांची चाकरी श्रीमंतांच्या पायाशी घडत नाही, त्याचं दु:ख वाटे. परंतु मनात काळजी प्रजेचीच असे. एकदा अशाच दरबारात कागदपत्रे पाहात होत्या तर चार ब्राह्मण येऊन बसले. चेहरे उतरलेले, रडवेले झालेले. अहिल्याबाईंच्या पायाशी वाकत एकजण म्हणाला, ''मातोश्री, आम्ही गरीब ब्राह्मण, जवळ पैसा नाही. मुलींची लग्ने जमणे कठीण झाले आहे. द्रव्याखेरीज हुंडा घेतल्याखेरीज कुणी लग्नास तयार होत नाही. जिथे जावे तिथे हेच. निराश होऊन परत येतो. पदरी दोन-तीन मुली. वये वाढू लागली; पण लग्ने जमत नाहीत.'' अहिल्याबाई म्हणाल्या, ''अहो वधूला देवी म्हणावे, लक्ष्मी म्हणावे आणि तिच्या प्रवेशाचे आदिमायेच्या स्वागताचे पैसे घ्यावे हे कसे? स्त्रीच्या कौतुकाची नुसती सोंगे. नुसता देखावा. खोटा!''

''मातोश्री, म्हणूनच आम्ही आलो आहोत. यातून काही मार्ग काढावा ही विनंती!''

''ठीक आहे. आपण बसा'' असे म्हणून कारभारी मुकुंद हरीस दऊतलेखणी घेऊन बोलावले. सांगू लागल्या, ''श्री शंकर आज्ञेकरून हे जाहीर करण्यात येत आहे की, यापुढे कुठल्याही जातीजमातीत विवाहाचे समयी कन्येच्या पालनकर्त्यांकडून पैसे घेतल्यास तो गुन्हा समजण्यात येईल. द्रव्य घेईल त्याचेकडून दामदुप्पट, जो देईल त्याच्याकडून जितके दिले तितके आणि मध्यस्थाकडून त्यास मिळाले असतील तितके सरकारात भरणा करावे लागतील. अधिक रकमेचा दंड करण्याचा अधिकार सरकारला राहील.'' याच्या नकला करून अहिल्यादेवींनी प्रांतोप्रांती पाठवल्या. हुंडाबंदीची सुरुवात त्यांनी अडीचशे वर्षांपूर्वी केली. सतीबंदी करण्यासाठीही त्या धडपडत होत्या. त्यांच्या घरातल्या १८ स्त्रियांना त्यांनी सती जाताना पाहिलं. त्याची दाहकता त्यांना आयुष्यभर भाजत राहिली. पुढच्या काळात सतीबंदी झाली पण समाजाचे मन सतीबंदीसाठी तयार करण्याचे मोठे कार्य अहिल्यादेवींनी करून ठेवले होते.

अहिल्याबाई म्हणायच्या, ''प्रजेला सुखी करणे हे माझे काम. याची जबाबदारी माझ्यावरच! सामर्थ्य आणि सत्ता याच्या बळावर मी सर्वांचे भलेच करण्याचा प्रयत्न करीन. कारण याचा जाब मला परमेश्वराच्या दरबारात द्यायचा आहे. या भावनेमुळेच त्यांच्या हातून सत्कार्ये झाली. प्रजावत्सलता त्यांच्या प्रत्येक

कृतीत होती. त्यांचा कारभारच मुळी प्रजेसाठी होता. शासन म्हणजे भोग नसून तो महान योग आहे, एक फार मोठी साधना आहे, तपश्चर्या आहे. गंभीर अशा जबाबदाऱ्यांनी भरलेले कर्तव्य आहे.

प्रजेच्या नैतिक आणि अध्यात्मिक उन्नतीकडेही त्यांनी लक्ष दिले. कथा-कीर्तन, भजन हे सोहळे, दानधर्म यातला स्वच्छ आनंद आणि समाधान प्रजेला लाभले. त्यांनी स्वत:चे जीवन पवित्र, त्यागमय, साधे ठेवून जनतेपुढे आदर्श ठेवला होता. प्रजेसाठी नवे नियम त्यांनी केले, तसेच जाचक नियम त्यांनी रद्द करून टाकले. प्रजेला सुरक्षिततेचा अनुभव येत असे. त्यांना कोणापासूनही भीति वाटत नव्हती. कधी कशाची टंचाई भासली नाही, की दुष्काळ पडला नाही. कित्येक ठिकाणी सदावर्ते आणि अन्नछत्रे चालू होती. तेथे कुणालाही भेदभाव वा दुजाभाव दाखविला जात नसे. अहिल्याबाईंनी कुठलाही धाकधपटशा, शक्ति वा दहशत दाखवून राज्य केले नाही तर अत्यंत मायाळूपणे, प्रेमाने त्यांनी राज्य केले. त्यांच्या काळात प्रजेत असंतोष निर्माण झाला नाही किंवा प्रजेने कधीच उपद्रवही दिला नाही. त्यांच्या दरबारात प्रजेला मुक्तद्वार होते. सर्वांचे म्हणणे शांतपणे ऐकून घेणे हे त्यांचे कौशल्य होते. त्या जितक्या मृदू आणि मायाळू होत्या, तितक्याच कर्तव्यकठोर आणि कडक होत्या. त्यांच्या वागण्यात हे दोन्ही रंग प्रभावी आहेत. म्हणूनच त्यांचे चरित्र म्हणजे लोहशक्ति अशा स्त्रीचेही आहे आणि कुसुमकोमल अशा हृदयाचेही आहे. कर्तव्यकठोर निर्णय घेणाऱ्या राज्यकर्तीचे आहे तसेच नम्र अशा प्रजापालनकर्तीचेही आहे. रणचंडिकेचेही आहे आणि वात्सल्यमयीचेही आहे. अहिल्यादेवी म्हणजे सात्विकतेचे, कर्तव्याचे एक अजब रसायन होते.

✡

# निजामाशी लढाई

नबाबाने सतत भांडणाचा पवित्रा घेतला होता. पुणे येथे मारेकरी घातले. त्यांचे कागद, दस्तऐवज पकडले गेले. चकमक झाली. निजामाने फिरंगी लोकास मदतीस बोलावले. चौथाई, सरदेशमुखीची तीन कोटीची बाकी निजामाकडे थकली होती. या सर्वांचा अर्थ एकच की, आता निजामाशी युद्ध ही अटळ गोष्ट आहे. अहिल्याबाईंचा आजार वाढतच होता. त्यांना एकच ध्यास लागला होता की, होळकरांच्या वंशजांनी या लढाईत पराक्रम करावा. तुकोजीचे पुत्र, पुतण्या बापू होळकर यांचं शौर्य कसाला लागावं. शिंदे-होळकरांची एकी व्हावी. श्रीमंतांची चाकरी होळकरांकडून व्हावी. अहिल्याबाईंच्या निष्ठेला उपमा नव्हती. सतत श्रीमंत पेशव्यांचा उत्कर्ष, त्यांचा जय, त्याचं स्वास्थ्य याची चिंता त्यांना असे. त्यांची शक्तिमान इच्छा पेशवे यांच्या पाठीशी असे. राज्ये अशा निष्ठावान माणसांमुळेच चालतात.

खर्डा येथे निजामाची आणि पेशव्यांची धूमसाम लढाई झाली. पेशवे यांचा विजय झाला. तहाची कलमे फार फायद्याची ठरली. निजामाने केलेल्या आगळीकींची किंमत त्याला मोजायला लागली. पाचकोटी रक्कम तीन वर्षात द्यावी. तीस लक्षाचा मुलूख आणि दौलताबादचा किल्ला मिळाला. निजामाने कबजात घेतलेले सर्व इलाखे त्याला परत करावे लागले. यात अहिल्याबाईंना आनंद देणारी गोष्ट म्हणजे, यशवंतराव होळकर आणि बापू होळकर यांनी खूप पराक्रम गाजवला. काशीराव होळकरने तोफखाना सांभाळला. होळकरांच्या पेंढारी फौजांनी नबाबास जेरबंद केले. अहिल्याबाईंना अत्यंत आनंद झाला तो याचा की पेशव्यांनी होळकरांचे निशाण अग्रभागी मिरवले.

अहिल्यादेवींना ध्यास होता तो हाच की, आपली माणसं, आपलं घराणं, आपली गोळाबारूद, आपलं सैन्य पेशव्यांच्या उत्कर्षासाठी त्यांच्या विजयासाठी वापरलं जावं. त्यांची निष्ठा अशी लाखमोलाची होती. यासाठीच त्यांच्या राज्यातील किल्ल्यांवरही सैन्य सज्ज असे. चांदवड, सेंधवा, असिरगड, कुशलगड, गाळणे हिंगलजगड या गडांवर सुसज्ज सैन्य होतं.

मल्हाररावांनी राज्यात अठरा सरंजामी सरदार ठेवले होते. त्यांच्याकडे एक लाख रुपये महसूलाचे क्षेत्र असे. या सरदारांना घोडदळ आणि पायदळ नेहेमी सज्ज ठेवावे लागे. हीच व्यवस्था अहिल्याबाईंनी वाढती ठेवली होती. त्यांचे सर्वांवर नियंत्रण होते. श्रीमंत पेशवे यांच्या मदतीसाठी हे सैन्य वेळप्रसंगी जात असे. अहिल्याबाईंचे धोरण साम्राज्य वाढवण्याचे नव्हते. त्यामुळे कोणाच्याही सीमांवर त्यांनी आक्रमण केले नाही. दुसऱ्यांची राज्ये मिळायचे मनसुबे रचले नाहीत. युद्धामुळे होणाऱ्या अपरिमित हानीची, दूरदर्शी अहिल्याबाईंना पुरेपूर कल्पना होती. युद्धे टाळण्याचा त्या सदैव प्रयत्न करीत. पण युद्ध लादले गेलेच तर मात्र, त्या साक्षात रणचंडिकेचा अवतार धारण करून, युद्धसामान सज्ज करून पाठवीत. त्या रणनिपुण तर होत्याच; पण युद्धव्यवस्था चोख ठेवण्याचे त्यांच्यात सामर्थ्य होतं.

✡

# अखेरचा श्रावण

नर्मदामातेची ओटी भरून आणि हत्तीवरून महेश्वरात साखर वाटत अहिल्याबाईंनी पेशव्यांचा विजय आणि होळकरांची शौर्यकथा साजरी केली. पण दिवसेंदिवस त्यांना अशक्तपणा येऊ लागला. अन्नावरची वासना उडाली. ते काळेभोर तेजस्वी डोळे खोल जात होते. टवटवी संपत होती. श्रावणाचा महिना असून अहिल्यादेवी निजून होत्या. याचा अर्थ प्रजेला समजत होता. वाड्याबाहेर प्रजाजन भेटायला येत. कुणी दारे बंद करून घेत आहेत असं बघताच अहिल्याबाई म्हणत, ''येऊ द्या लोकांना. बघू द्या मला. दृष्टभेट...आता तितकेच!'' प्रजा येई. जाताना रडत जाई. ना कधी जातीपाती पाहिल्या, ना भेदभाव केला. या समृद्ध राजाची महाराणी असून भोग दूर ठेवले. कर्माचा योग! फक्त कर्मयोग! रिद्धीसिद्धी हात जोडून उभ्या होत्या. पण सर्व भोगविलास पतीच्या चितेत टाकले. खऱ्या सती झाल्या. मुल्ला, मौलवी आले. पीर दर्ग्यातून अहिल्याबाईंसाठी प्रार्थना होत होत्या. देवळादेवळातून मृत्यूजंय जप चालू होता. इतक्या आजारातही चित्त प्रजेच्या सुखाकडे. कुणीतरी बातमी आणली की शेजारच्या राज्यात तेल, तूप, गहू, तांदूळ यावर चढे कर आहेत. त्यावर अहिल्याबाईंना कुठून शक्ति आली? एकदम ओरडून म्हणाल्या, ''खामोष, प्रजेला पिळून खाद्यवस्तूवर कर घ्यायचा? असे धाडस....खामोष!'' अन् त्या निपचित पडल्या.

आता त्यांचं एकच मागणं होतं. ईश्वराने संगे राहावं. अलगद उचलून न्यावं. तेवढ्यात कुणीतरी थिटे-केंदूरकर आले. त्याच्याजवळ चाळीस वर्षांपूर्वीचा मल्हाररावांच्या हातचा कागद होता. कर्जाचे दस्तऐवज होते. जुने दप्तर पाहताना नातवांना सापडले होते. मल्हाररावांना घोडे घेण्यासाठी काही रक्कम कर्जाऊ दिल्याची नोंद होती. हे सर्व पाहण्याचे त्राण त्यांना नव्हते. दिवाणजींना कागदाची शहानिशा करायला सांगून भारमलदादा होळकरांना सांगितलं, की कर्ज असेल तर दुपटीने परत करा-आता देणे उरायला नको. आपली पिळाची पगडी आणि निशाण माझ्या गादीवर ठेवा. आता आमचा प्रांत संपत आला.'' त्यांना मरण समोर दिसत होतं. आपल्या सर्व नातेवाईकांसाठी खासगी तिजोरीतून दहा दहा हजाराच्या थैल्या

तयार करवल्या. आपला सेवकवर्ग त्या मुळीच विसरल्या नव्हत्या. त्यांच्यासाठी दहा दहा हजार! चौंडी, तुळजापूर, पंढरपूर इकडे द्रव्य पाठवलं गेलं. मोक्षधेनूचे दान करण्यात आले. ब्रह्मपुरीचे ब्राह्मण मृत्युंजयाचं अनुष्ठान मांडून बसले. भिल्लांचे पेंढारी म्हणाले की, ''आईला भेटू द्या. त्यांच्याखेरीज आम्हाला आई नाही दुसरी!'' आणि बघता बघता एका भिल्लाने स्वत:च्या छातीत जंबिया मारून घेतला. ''माझी वरसे माझ्या आईला दे'' असं म्हणत कोसळून पडला. वाचकहो, या चरित्रात मला हे सारं सांगावं लागणार आहे कारण अशा कथांनी चरित्र घडतं. चरित्र केवळ सनावळ्यानुसार लिहिलं जात असलं तरी अशा कथांनी चरित्रानायिकेचं कर्तृत्व आणि अंतर्मन कळत असतं. आणि या कथा ऐतिहासिक सत्यता असणाऱ्या आहेत. अशातच कृष्णाष्टमी आली अन् गेली. अहिल्याबाईंनी रामकृष्णांच्या जन्मोत्सवासाठी सोन्याचा पाळणा करून घेतला होता. पण त्या दिवसांपासून प्रकृती अधिकच अशक्त झाली. गाईच्या गोठ्यातील त्यांच्या लाडक्या गाईचे पूजन थांबले. त्याच वेळेपासून गायीने चारापाण्यास तोंड लावले नाही. अशातच वद्य चतुर्दशी उजाडली. तेरा ऑगस्ट. आणि त्याच दिवशी श्रीमंतांचा लखोटा आला. भारमलदादा होळकरांनी उघडला. त्यांनी वाचला आणि अहिल्यादेवींनाही वाचून दाखवला. त्यात लिहिले होते.

मातोश्री अहिल्यादेवींना श्रीमंत पेशवे यांचा सादर प्रणिपात,

हे मराठीयांचे राज्य. आपणासारखे पोटतिडिकीचे पाठीराखे आहेत तर आम्हास काय उणे? निजामास हतप्रभ केले. या उत्कर्षास आपला पुण्यआशीर्वाद कारण! यशवंतराव, बापू होळकर यांजकडे विशेष लक्ष दिल्यास मातब्बर कामगिरी करतील. शिंदे यांच्या गादीशी समस्त परिवाराकडून शपथक्रिया करवावी. आपण मनावर घ्याल ते तडीस न्याल. एकमते राहिलो तर वलयांकित पृथ्वीचे राज्य करू. आपण एकनिष्ठे, कृतकर्मे दौलतीचे स्तंभ! यशावह कर्मे केलीत. आपणच साक्षी आणि बहुत दृष्टवंत! किमया सांभाळली. आमच्या या राज्याचे पुण्यशील महाद्वार महेश्वरी आहे हे आम्ही जाणतो. मराठियांचा घंटानाद अखंड घुमावा ऐसा आशीर्वाद द्यावा. आपली प्रकृती हल्ली शैत्यज्वराने ग्रासल्याचे ऐकले. औषधे नीट घ्यावी. लोभ असो द्यावा.

श्री शाहू नरपति हर्षनिधान
माधवराव नारायण मुख्य प्रधान.

अहिल्याबाईंच्या चेहऱ्यावर हास्य पसरलं. ॐ नम: शिवाय शब्द उच्चारला. त्याच क्षणी मोठी घंटा कडी तुटून खालच्या सोन्याच्या पाळण्यावर पडली.

त्याचक्षणी अहिल्यादेवींचे प्राण पंचत्वात विलिन झाले. संताजी होळकरने धावत येऊन अहिल्याबाईंचे मस्तक मांडीवर घेतले. महेश्वरचे पुण्यशील महाद्वार कोसळले होते. त्याच वेळी गोठ्यातून गाईचं हंबरणं ऐकू आलं. तिचा प्राण त्याच क्षणी गेला होता. त्यादिवशी श्रावण वद्य चतुर्दशी होती. तारीख होती १३ ऑगस्ट, १७९५.

सारं महेश्वर हुंदक्यांनी गदगदून गेलं. महेश्वरची सारी फुले वाड्यावर आली. अहिल्याबाईंची पालखी सोन्यामोत्यांच्या माळांनी सजली. नर्मदेला अनावर पूर आला होता. दिशा दिशा रडत होत्या. पिळाची पगडी आणि निशाण सर्वात पुढे निघाले. महेश्वर पोरके झाले. प्रजा पोरकी झाली. पुण्यश्लोक लोकमाता कर्मयोगिनी अहिल्यादेवी होळकर नर्मदामातेच्या मांडीवर चिरनिद्रा घेण्यासाठी अखेरच्या महायात्रेला निघाल्या होत्या. प्रजा स्वयंस्फूर्तीने जयजयकार करीत होती. लोकमाता कर्मयोगिनी अहिल्यादेवी अमर आहेत!

✡

# दानाने धनशुद्धी होते

अहिल्याबाई नेहेमी म्हणत स्नानाने देहशुद्धी, ध्यानाने मनशुद्धी आणि दानाने धनशुद्धी होते. आपल्या संस्कृतीतही त्याग आणि दानधर्म याला फार महत्त्व आहे. आपली संस्कृती भोगापेक्षा त्यागावर उभी आहे. सर्वांमध्ये देवाचा अंश आहे असे मानून प्राणीमात्रांना सुख देणे, सेवा करणे, मदत करणे हाही भक्तिचाच प्रकार मानलेला आहे. अहिल्याबाईंचे सारे जीवन त्याग आणि सेवा यासाठीच होते असे म्हटले तर त्यात काही चूक नाही. त्याग आणि सेवा हा त्या ईश्वरभक्तिचाच प्रकार मानीत असत. त्यांचे कार्यक्षेत्र फक्त त्यांची प्रजा वा राज्य इतकेच नव्हते तर संपूर्ण मानव समाजापर्यंत ते विस्तारले होते. आज आपण सर्वधर्मसमभाव जो म्हणतो तो अहिल्यादेवींनी दोनशे वर्षांपूर्वी कृतीत आणला होता. त्यांच्या प्रेमाला, मायेला, वात्सल्याला आणि दानधर्मालाही जातीधर्माच्या सीमा कधीच नव्हत्या. आपल्या कर्तव्याचे पालन करणे हाच त्यांचा महान कर्मयोग होता. हेच त्यांचे कल्याणाचे मर्म होते.

त्यांनी आपली खाजगी संपत्ती दानधर्मात आणि अनेक देवळे घाट बांधण्यात खर्च केली याचंही कारण त्यांना पारलौकिक सुख हवे होते असे नाही तर प्रजेला सुखी करायचे होते. त्यांनी या दानाचा कधीच गाजावाजा केला नाही की समारंभ करून कौतुक करून घेतले नाही. त्यांनी कुठे कुठे आणि किती दानधर्म केला याची संपूर्ण नोंदही कुठे मिळत नाही. राज्याच्या दप्तरातही मिळणे कठीणच, कारण त्यासाठी सरकारी पैसा त्यांनी वापरला नव्हता. अनेक ठिकाणी केलेल्या पाहणीवरून आणि कुठे कुठे सापडलेल्या नोंदींवरून खूप परिश्रमपूर्वक जी माहिती गोळा झाली ती वाचकांपुढे ठेवीत आहे. यात बऱ्याच त्रुटी असतील. पण तरीही बरेच सापडेल. आतापर्यंत मिळालेली माहिती पुढे देत आहे-

१) त्र्यंबकेश्वर : नाशिक या शहरापासून १८ मैलांवर हे बारा ज्योतिर्लिंगापैकी एक आहे. इथे कुशावर्त नावाचे कुंड आहे. अतिशय सुंदर असे दगडी मंदिर आहे. इथे अहिल्याबाईंनी विहिर, धर्मशाळा बांधली.

२) नंदुरबार : इथे विहिर खोदली. ती आजही अहिल्याबाई विहिर म्हणून ओळखतात.

३) नासिक : येथे श्रीराम मंदिर बांधले आहे. त्यांचे बांधकाम मजबूत आहे.

४) अयोध्या : येथे एक राममंदिर बांधले आहे.

५) उज्जयिनी : येथे चिंतामणी गणपती मंदिर बांधले आणि महाकालेश्वराच्या पूजेची व्यवस्था करून ठेवली.

६) ओंकार : अहिल्याबाईंच्या सासूबाई गौतमाबाई यांनी बांधकाम सुरू केले होते. ते गौरी सोमनाथ मंदिर अहिल्याबाईंनी पूर्ण केले. अंमलेश्वर मंदिर बांधले. एक बाग करून त्यात छत्री उभारली.

७) कर्नाटक : गरीब लोकांच्या सहाय्यासाठी काही रक्कम उभारून ठेवली.

८) काशी : सुप्रसिद्ध मनकर्णिका घाट ऑक्टोबर १७८५ मध्ये बांधला. त्या कामासाठी २५००० रुपये खर्च आला होता. त्याच वर्षी तेथे दशाश्वमेध घाट बांधला. काशी विश्वेश्वर मंदिराचा जीर्णोद्धार करवला. गौतमेश्वर आणि अहिल्योद्धारकेश्वर ही विशाल मंदिरे उभारली.

९) कुरुक्षेत्र : घाट आणि मंदिर बांधले.

१०) केदारनाथ : एक धर्मशाळा बांधली. जमिनीपासून सुमारे तीनशे फूट उंचीवर पाण्याचे एक सुंदर कुंड बांधले. त्यामुळे यात्रेकरूंची खूप सोय झाली.

११) कोल्हापूर : अंबाबाईच्या पूजेसाठी व्यवस्था करून ठेवली.

१२) गंगोत्री : येथे विश्वनाथ, केदारनाथ, भैरव, अन्नपूर्णा अशी चार मंदिरे बांधली. यात्रेकरूंसाठी सहा चिरेबंद धर्मशाळा बांधल्या. शिवाय पर्वतावर उंच ठिकाणी विश्रामस्थाने बांधली.

१३) अमरकंटक : इथे अहिल्याबाईंनी धर्मशाळा बांधली आहे.

१४) आनंद कानन : येथील विश्वेश्वर ज्योतिर्लिंग मंदिराचा जीर्णोद्धार केला.

१५) आलमपूर : इथे मल्हाररावांचा देहांत झाला होता. तेथे हरिहरेश्वराचे मंदिर बांधले. मल्हाररावांच्या स्मृतिप्रित्यर्थ सुंदर छत्री उभारून, छत्रीसमोर खंडेराव मार्तंडाचे मंदिर उभारले. एक सदावर्त चालू केले.

१६) गया : विष्णूमंदिराचा जीर्णोद्धार केला.

१७) चिखलदरा : नर्मदेची परिक्रमा करणाऱ्यांसाठी एक अन्नछत्र ठेवले होते.

१८) चौंडी चापडगाव : येथे महादेवाचे मंदिर आणि एक घाट बांधला. मंदिराचे नाव अहिल्येश्वर आहे. त्याच्या खर्चासाठी वार्षिक आठशे रुपये इंदूर राज्यातून दिले जातात. हे अहिल्यादेवींचे जन्मगाव!'

१९) जगन्नाथपुरी : मुख्य मंदिरातील पूजेसाठी मंदिरास काही गावे धर्मादाय देऊन टाकली.

२०) जांब गाव : रामदास स्वामींच्या मठास मदत केली.

२१) जामघाट : एक सुंदर महाद्वार बांधले.

२२) चांदवड : येथे सुंदर महाल बांधला असून तिथे त्यांची टांकसाळ होती.

२३) जेजुरी : मार्तंडाचे मंदिर बांधले.

२४) तराना : येथे तिळभांडेश्वराचे मंदिर बांधले.

२५) देवप्रयाग : हे स्थान हिमालयात गंगोत्रीच्या वाटेवर आहे. येथे अलकनंदा नावाची नदी गंगेला मिळाली आहे. तिथे अहिल्यादेवींचे एक सदावर्त आहे.

२६) द्वारका : पूजाअर्चा करण्यासाठी काही गावे दान दिली आहेत.

२७) दारुकवन : नागेश्वरातील देवतेच्या पूजेची कायम व्यवस्था केलेली आहे.

२८) नाथद्वारा : एक धर्मशाळा बांधली आहे.

२९) निफाड : निफाड ते दिंडोशी रस्त्यावर पाण्याचे कुंड तयार करविले.

३०) नीलकंठ महादेव : याच नावाचे सुंदर मंदिर बांधले. एक गोमुख तयार केले आहे.

३१) परळी : येथील परळी वैजनाथ देवळाचा जीर्णोद्धार केला.

३२) पंढरपूर : श्रीराम मंदिर बांधले. होळकरवाडा आणि घाट बांधला.

३३) प्रयाग : मोठा विशाल घाट बांधला.

३४) पुष्कर : एक मंदिर आणि धर्मशाळा बांधली.

३५) पैठण : येथे यात्रेकरूंसाठी अन्नछत्र सुरू केले.

३६) पुणतांबे : एक वाडा बांधला. एक घाट आहे.

३७) बद्रीनारायण : श्रीहरीचे मंदिर बांधले. धर्मशाळा बांधून अनेक कुंडे तयार केली. देवीच्या नावाने एक सदावर्त चालू केले.

३८) बिठूर : ब्रह्माघाट बनवला.

३९) मंडलेश्वर : खरगोण जिल्ह्यात नर्मदाकाठी हे नगर आहे. येथे देवींनी एक घाट आणि मंदिर बांधले.

४०) मथुरा : येथे चिराबंद धर्मशाळा बांधल्या.

४१) महेश्वर : ही अहिल्यादेवींची राजधानी होती. इथे अप्रतिम घाट आहेत. डौलदार मंदिरे आहेत. सदावर्ते आहेत- हातमाग आहेत. तिथे अजूनही कामे चालू आहेत. अहिल्यादेवींचा वाडा, देवघर, त्यांची दरबाराची जागा सर्व पाहता येते.

४२) रामेश्वर : एक धर्मशाळा असून अन्नछत्र आहे.

४३) रावेर : येथे पाण्याचे कुंड आहे.

४४) वृंदावन : अन्नछत्र स्थापन केले. लाल दगडांची एक विहिर बांधली.

४५) वेरूळ : गौतमाबाईंनी बांधलेल्या घृष्णेश्वर मंदिराचा जीर्णोद्धार केला. पाण्यासाठी एक कुंड तयार केले.

४६) श्री शैल : मल्लिकार्जुन शिवमंदिर बांधले.

४७) संगमनेर : येथे राममंदिर बांधून घेतले.

४८) सातारा : विहिर बांधली.

४९) सप्तशृंगगड : एक धर्मशाळा बांधलेली आहे.

५०) सुलपेश्वर : अन्नछत्र स्थापन केले. या ठिकाणी प्रवाशास एक घोंगडी आणि तांब्या दिला जात असे.

५१) सोमनाथ : सोमनाथचे महादेव मंदिर इतिहास प्रसिद्ध आहे. १०२४ मध्ये महंमद गझनीने स्वारी करून याची मोडतोड केली होती. अहिल्यादेवींनी या मंदिराचा जीर्णोद्धार केला आणि शिवलिंगाची प्रतिष्ठापना केली.

५२) हरिद्वार : या ठिकाणी पश्चिमोत्तर दिशेला कुशावर्त, हरकी पेडीच्या दक्षिणेस गंगेकाठी घाट आहे. या घाटावर अहिल्यादेवींनी विशाल धर्मशाळा बांधली.

५३) हंदिया : इथे अहिल्यादेवींनी एक धर्मशाळा बांधली. अन्नछत्र कायमचे सुरू केले.

६०-७० फुटांचे सिद्धनाथ मंदिर बांधले. विशाल घाट बांधला.

याशिवाय कित्येक ठिकाणी विहिरी, धर्मशाळा बांधल्या. अन्नछत्रे उभी केली. देवालयांचे जीर्णोद्धार केले. ही नुसती यादी वाचली तरी त्यांचा चौफेर प्रवास आणि मनुष्यमात्रांविषयीचा वात्सल्यभाव लक्षात येतो. अन्नछत्रे, विहिरी, धर्मशाळा बांधण्यामागे त्यांचा सामाजिक दृष्टिकोन होता. अन्न, पाणी आणि निवारा या माणसांच्या प्रमुख गरजा पुरविण्यासाठी त्यांनी केलेली ही प्रचंड धडपड होती. माणसातलं माणूसपण सदैव वाढतं राहावं यासाठी मंदिरे, पूजा अर्चा याचीही गरज त्यांनी ओळखली होती. सदाचार संपन्न प्रजा निर्माण करणे आणि त्यांना वत्सलतेने सांभाळणे यासाठी सर्व आयुष्य त्यांनी वेचले. खाजगी पैशांवर तुळशीपत्र ठेवूनच त्यांनी ही प्रचंड बांधकामे केली. इतकेच नव्हे तर ही कामे कायमस्वरुपी चालण्यासाठी सालीना ठराविक अर्थव्यवस्था करून ठेवली. आज दोनशे वर्षे उलटून गेली तरी ही कामे चालू आहेत. दूरदर्शीपणाचे हे महान उदाहरण आहे. त्या संयमाची मूर्ती आणि दयेची प्रतिमा होत्या.

प्रत्येक कार्यासाठी स्वतंत्र अर्थव्यवस्था असल्यामुळे पुढे राज्यकर्ते बदलले तरी कुणालाही पदर पसरत मदत मागायला यावे लागले नाही. व्यवस्था सुरळित चालत राहिली. त्यांची नि:स्वार्थ सेवा मानवतेला वाहिलेली होती. जातिधर्मांच्या सीमा ओलांडून जाणारी होती.

कला आणि साहित्य याकडे सुद्धा त्यांचे लक्ष होते. त्यांनी उभ्या केलेल्या वास्तू, घाट अत्यंत कलात्मक आहेत.

✡

# समकालीनांच्या दृष्टिकोनातून अहिल्यादेवी

माणसाच्या मृत्यूनंतर जे लिहिले जाते त्यात अतिशयोक्ति येण्याचा फार संभव असतो. परंतु समकालीनांकडून जे लिहिले, सांगितले जाते त्यातील खरेपणा वादातीत असतो. माणूस जिवंत असतानाही त्याच्याविषयी गौरवोद्‌गार निघणे ही गोष्ट पूर्वीच्या काळी क्वचित होई. आजच्या काळाविषयी मी बोलत नाही. आज तर स्तुतीची पारायणे चालू असतात. सत्ताधाऱ्यांचे वाढदिवस म्हणजे कौतुकाचा समुद्र असतो. परंतु पूर्वीच्या काळी जिवंतपणी स्तुती क्वचित एखाद्यालाच लाभे आणि त्यासाठी प्रचंड कर्तृत्व असावे लागे. अहिल्यादेवींना स्तुती विषसमान वाटे. एका कवीच्या वह्या त्यांनी नर्मदेत बुडवल्याची हकीगत येऊन गेलीच आहे. अशा स्त्रीसमोर जेव्हा स्कॉटलंडमधील कवयित्री जोना बेली लिहितात तेव्हा आश्चर्य वाटते. सुप्रसिद्ध इतिहासकार आणि त्याकाळचे राजकीय दूत सर जॉन मालकम लिहितात तेव्हा आज आपण चकित होतो. मोरोपंत, अनंतफंदी यांनी तर लिहिले आहेच पण हे परदेशी लेखक परक्या भाषेत अहिल्यादेवींचे गुण गातात तेव्हा ते शंभर टक्के खरेच असते.

स्कॉटलंडमध्ये कवयित्री जोना बेली यांनी अहिल्यादेवींवर एक दीर्घ काव्य लिहिले आहे. त्यात अहिल्याबाईंच्या अंगभूत गुणांचे यथायोग्य वर्णन केले आहे.

For thirty years her reign of peace,
The land in blessings did increase!
And she was blessed by every thongue...
By stern and gentle, old and young!

याचे भाषांतर श्री हिरालाल शर्मा यांच्या पुस्तकात केलेलं आहे. ते पुढीलप्रमाणे-

तीस वरुषे प्रशांत सत्ता त्यांनी गाजविली ।
वैभव, धन, ऐश्वर्य संपदा, सदैव वाढविली ॥
सुष्ट, दुष्ट अन् सान थोर त्या साऱ्या पौरजनांनी ।
मुक्त रवाने सती अहिल्या सदैव वानियली ॥

सुप्रसिद्ध इतिहासकार आणि त्या काळचे पोलिटिकल एजंट सर जॉन मालकम लिहितात, 'अहिल्याबाई ही एक असामान्य स्त्री आहे. दुराभिमानाचा त्यांना स्पर्शही नाही. धर्मपरायणही असलेली ही स्त्री कमालीची सहनशील आहे. त्यांचे मन रुढीप्रिय असले तरी, रुढींचा उपयोग जनकल्याणासाठी करून घ्यायची त्यांची हातोटी विलक्षण आहे. प्रत्येक क्षणाला सद्सद विवेक बुद्धीने कर्तव्य करणारे, ते उच्च प्रतिचे जीवन आहे. त्यांच्या चारित्र्याचा विकास केवळ अद्वितीय असाच आहे.

त्यावेळचे व्हॉईसरॉय लॉर्ड एलनबरो यांनी एका पत्रात म्हटले आहे की, ''अहिल्याबाई एक सर्वश्रेष्ठ मुत्सद्दी आणि आदर्श राज्यकर्त्या आहेत. अन्य धर्मियांचा द्वेष त्यांच्या ध्यानीमनीसुद्धा नाही. एका महाराज्याच्या स्वामिनी असूनही त्या तपस्विनीप्रमाणे अगदी साध्या राहतात. शुभ्रवस्त्राखेरीज अन्य वस्त्रे त्यांना त्याज्य आहेत.''

शाहीर प्रभाकर आपल्या कवनात म्हणतात,

सति धन्य धन्य कलियुगी अहिल्याबाई ।
गेली कीर्ति करुनिया भूमंडळाचे ठाई ॥
महाराज अहिल्याबाई पुण्यप्राणी ।
संपूर्ण स्त्रियांमधि श्रेष्ठ रत्नखाणी ॥

कवि मोरोपंतांनी ज्या आर्या लिहिल्या त्याचा अर्थ पुढे देत आहे.

१) हे देवी अहिल्ये तू हरिहराची परमभक्त आहेस, तुझ्या भक्तिमुळे तू पृथ्वीचे श्रेष्ठ भूषण झाली आहेस. सूर्य तुझी प्रशंसा करतो.

२) तुम्ही तिन्ही लोकात धन्य झालात. कलियुगात तुझ्यासारखी न्यायी आणि धर्मपरायण दुसरी झाली नाही.

३) धर्मकार्य करण्यासाठी तुझा जन्म झाला आहे. तू सीतेचा अवतार आहेस. तुला जितकी कीर्ति लाभली तितकी अन्य कोणत्याही राजाला लाभली नाही.

४) जो धर्मकार्य करीत नाही त्याचे कोण पंडित स्तवन करील? या कलियुगात तुझ्याइतकी न्यायधर्म निरत असलेली अन्य कोणीही स्त्री ऐकिवात नाही.

५) हे देवी, तू नर्मदेला सोडून राहत नाहीस. कारण ती तुला अतिशय प्रिय आहे. आपण दोघीही पवित्र गंगेच्या सख्या आहात. कारण दोघींच्याही मनात सत्कार्य करण्याची इच्छा आहे.

६) हे विष्णुपद, अहिल्यादेवी ही तुझी परमभक्त आहे. सारे लोक तिची प्रशंसा करतात. हे ऐकून तुलाही आनंद वाटेल. सारे विश्व जिची स्तुती करते आहे, मग मोरोपंतांनी तिची स्तुती का करू नये?

दक्षिण भारतातील प्रसिद्ध विद्वान इतिहास तज्ज्ञ रावबहादूर चिंतामणी विनायक वैद्य यांनी अहिल्याबाईंच्या संबंधी विविधज्ञान विस्तार या प्रसिद्ध अशा वर्तमानपत्रात लेख लिहिला होता. त्यात ते लिहितात, ''ही लोकोत्तर स्त्री आपल्या अनेक सद्‌गुणांनी महाराष्ट्रासच नव्हे तर, अखिल मानवजातीस भूषण झाली आहे. तिची बुद्धिमत्ता इतकी व्यापक होती की, त्या प्रत्येक कार्यात हुशार आणि जाणकार ठरत असत. त्यांची धर्मशीलता इतकी उदात्त होती की, धर्माच्या आणि नीतिच्या प्रत्येक बाबतीत, त्यांनी आपले नाव अजरामर करून ठेवले. त्यांचा दानधर्म इतका प्रचंड की, तसा दानधर्म आजवर भारतात कुणी केला नाही. आपल्या राज्याखेरीज इतर राज्यातही प्रचंड वास्तू उभारणाऱ्या अहिल्याबाई याच एकमेव आहेत. त्यांचा न्याय इतका चोख असे की, उभय बाजू त्यांचं कौतुक गात असत. त्यांची लीनता इतकी विलक्षण होती की, त्या कोणासही आपली प्रशंसा, स्तुती करू देत नसत. त्यांची जरबही इतकी दांडगी होती की, त्यांच्या हुकुमाशिवाय कुणासही काही करण्याची हिंमत नव्हती. आपल्या समान दर्जाच्या सरदारांविषयी त्यांनी कधीच चढाओढ केली नाही. निर्मत्सर प्रेम केले. त्यांचे नेहेमी चांगलेच चिंतिले.

संस्कृत कवि खुशालीराम यांनी संस्कृतमध्ये अहिल्यादेवींविषयी लिहून ठेवले आहे. त्याचे हे मराठी भाषांतर इथे देत आहे. ते लिहितात, 'मल्हाररावांची ही पुत्रवधु विचारशीलता धर्मात्मा अहिल्याबाई खंडेरावांची धर्मपत्नी होती. त्या बहुत गुणवती होत्या. त्या नित्य धार्मिक कामात मग्न असत. त्या नेहेमी देवब्राह्मण आणि पुजाऱ्यांना दान देत. धर्मकार्यपरायण राहून कालक्रमणा करीत. त्यांनी कुरुक्षेत्रात सुवर्ण आणि चांदीचे तुलादानही केले. गुण, ज्ञान आणि शील यांनी संपन्न असणाऱ्या ब्राह्मणांना दाने दिली. त्यांनी देशोदेशी अनेक प्रकारे अन्नदान केले. याचकांच्या याचना पूर्ण केल्या. शरणागतांच्या इच्छा पूर्ण केल्या. हे सारे विचार खुशालीराम यांनी संस्कृतमध्ये लिहिलेले आहे. त्यांनी या काव्यात त्यांच्या धार्मिकतेबद्दल लिहिले आहे. परंतु त्यांची राजकीय आणि सामाजिक जाणही खूप मजबूत होती. किंबहुना त्यांची धार्मिकता सुद्धा समाजकारणाशीच जोडलेली होती. ही त्यांची विशेषता होती.

कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनी अहिल्यादेवींच्या चरित्रात लिहिले आहे. ''त्यांच्या चरित्रात परस्परविरोधी म्हणून म्हणता येतील असे सर्व गुण होते. एक स्त्री असूनही छानछोकीने राहणे त्यांना कधी आवडले नाही. स्वधर्मावर अतिशय प्रेम असूनही, परधर्मी लोकांचा त्यांनी कधी अनादर, राग केला नाही. इतकेच नव्हे तर त्यांच्यावर कृपाच केली. भर तारुण्यात वैधव्य आले असतानाही, त्यांनी

पातिव्रत्याचे पूर्णपणे पालन केले. अफाट संपत्तीची स्वामिनी असूनही एखाद्या तपस्विनीप्रमाणे अत्यंत साधेपणाने त्यांनी जीवन कंठिले. अमर्याद विशाल राज्याची स्वामिनी असूनही त्याचे संचालन अतुलनीय चातुर्याने करत. त्यांच्या मनाला अहंकार कधी चुकूनही शिवला नाही. त्या देवभीरू होत्या. त्या स्वत: अत्यंत निर्मळ, शुद्ध अंत:करणाच्या होत्या. अहिल्याबाईंनी इतरांच्या दोषांबद्दल त्यांची घृणा वा तिरस्कार केला नाही उलट त्यांना सुधारण्याचाच प्रयत्न केला. म्हणूनच अहिल्याबाई म्हणजे मनुष्यरुप धारण केलेली देवताच होती असे म्हणणे भाग आहे.

कवि, लेखक, मुत्सद्दी, राजकारणी या सर्वांचाच दृष्टीकोन यात आला आहे. त्याच्यात इतके गुणविशेष होते की, त्याचं वर्णन करताना माणसे अहिल्यामय होऊन जात आणि त्यांच्यापुढे नतमस्तक होत!

✡

# अहिल्या ते लोकमाता

एका सामान्य कुळात जन्माला आलेल्या अहिल्येला लोकमातेची पदवी दिली ती प्रजेने! अहिल्या, अहिल्याबाई, अहिल्यादेवी, मातोश्री अहिल्यादेवी, लोकमाता हा त्यांचा जीवनाचा प्रवास आश्चर्यकारक होता. स्त्री असल्यामुळे त्यांच्यावर स्त्रीत्वाची बंधने होती. बंधने असूनही त्यांनी आपले जीवन कर्तव्यपूर्तीनी सफल करून टाकले.

अधिकार संपन्न आणि श्रीमंत असूनही, निर्मोही, त्यागशील, व्रतस्थ राहणे हे दिव्य अहिल्यादेवींनी जन्मभर केले. सती न जाताही त्या सती ठरल्या, ते त्यांच्या निराभिमानी वागण्यामुळेच!

त्यांच्यासमोर अनेक प्रलोभने होती. मोह होते. तिजोरी पैशांनी भरलेली होती. अनेक ऐषआरामी राज्ये त्यांच्यासमोर होती. आजुबाजुच्या राज्यात वाढते कर लादून प्रजेला पिळणारे राजे त्या पाहात होत्या. पण तरीही त्या कधीही प्रलोभनांना बळी पडल्या नाहीत. उलट त्याचे वागणे इतके चोख ठेवले की त्यांचा आदर्श इतरांनी पुढे ठेवावा. आपल्या तत्त्वांवर त्यांची अढळ अशी निष्ठा होती. आपल्या तेजस्वी कर्मठ, आणि व्रातस्थ जीवनामुळे त्यांनी अक्षय कीर्ति प्राप्त केली.

त्यांच्या अंगी जितके सद्‌गुण होते तितके सर्वच्या सर्व एकाच व्यक्तिच्या ठाई असणे हा ईश्वराने केलेला एक चमत्कार होता. नाहीतर जिथे धर्मपरायणता आणि परमार्थभावना असते तिथे राजकारणी मुत्सद्देगिरीचा अंशही नसतो. आणि जिथे राजकारणी मुत्सद्दीपण असते तिथे धार्मिक सहिष्णुता आढळत नाही. त्याचप्रमाणे धैर्य, शौर्य, पराक्रम असतो तिथे नम्रता किंवा परदु:खकातरता नसते. शक्ति आणि वैभवाला चरित्रसंपन्नतेची साथ लाभत नाही हे जगात आपल्याला सर्वत्र दिसते. परंतु अहिल्याबाईंच्या जीवनात सगळ्या चांगल्या शकुनकारक, आनंददायक गोष्टी एकत्र आल्या होत्या. सर्व सद्‌गुण जणु बहरास आले होते. जेवढ्या धार्मिक तेवढ्याच मुत्सद्दी अशा अहिल्याबाईंचे जीवन भारतीय स्त्रीधर्माचे एक ज्वलंत उदाहरण होते.

धवलशुभ्र असे प्रशासन आणि काळाकुट्ट संसार अशा दोन ताण्याबाण्यावर

त्यांचे जीवनवस्त्र विणलेले आहे. त्यांचा संसार संघर्षमय होता. दु:खाने भरलेला होता. प्रत्यक्ष व्यसनी पति आणि खोडकर नशेबाज अशा पुत्राने त्यांना भरपूर मनस्ताप दिला. लांबच्या नातेवाईकांनी आणि ज्याला पुढे त्यांनी सुभेदार केले त्या तुकोजी होळकरांनी पण अहिल्यादेवींना कष्ट दिले. एकाहून एक भयंकर असे दु:खाचे आघात त्यांना सोसावे लागले. अशा दारुण मन:स्थितीतसुद्धा त्यांचे कर्तव्याचे भान कधीच सुरले नाही. प्रत्येक संकटाला त्या सर्व शक्ति पणाला लावून बाणेदारपणे तोंड देत राहिल्या. खंबीरपणे सामना देत राहिल्या. संकटापुढे त्यांनी कधीच मान टाकली नाही की, त्यांचे पाय लटपटले नाहीत. अवती भवती घनदाट अंधार पसरलेला असताना सुद्धा, आपल्या अलौकिक जीवनाचा दीप त्यांनी प्रज्वलित ठेवला. दैवाला शिव्याशाप न देता, दैवावर मात केली. निर्मळ सुखाचे शाश्वत दीप लावून त्यांनी सभोवती प्रकाश दिला.

दु:खसंकटे समर्पणाचे धडे शिकवतात, किंबहुना दु:ख म्हणजे प्रभूचे आशीर्वादच विपरित वेश घेऊन येतात असे त्या समजत असत. म्हणूनच ही प्रचंड दु:खे त्यांनी धीराने स्वीकारली आणि शौर्याने त्यांच्याशी सामना दिला. प्रत्येक आघात आणि विपत्तीचे घाव सोसताना त्या जीवनाचा जयघोषच करीत राहिल्या. ईश्वराने जे दिले त्याबद्दल त्या जगन्नियंत्याची भक्ति करीत राहिल्या. कुठेही राग नाही, संताप नाही, आक्रस्ताळेपणा नाही. अविचलपणे त्या सोसत राहिल्या आणि त्यांचे व्यक्तिमत्व उंचावत गेले. संकटांना छोटे करत त्या मोठ्या होत गेल्या. ही किमया सहज घडणारी नव्हती. अनेक गुणांचा समुच्चय असणाऱ्या अहिल्यादेवींनाच ते शक्य झाले. एखादी स्त्री कधीच तुटून पडली असती, मोडून गेली असती.

लोकरुढीप्रमाणे त्या सती जायला निघाल्या तेव्हा मल्हाररावांने त्यांच्यापुढे पदर पसरून त्यांना जाऊ दिले नाही. त्यावेळी ते म्हणाले जीव द्यायचाच तर या प्रजेसाठी दे. खंडूबरोबर सती जाणाऱ्या नऊजणी आहेत पण या प्रजेसाठी फक्त तूच आहेस. त्या खरंच प्रजेची आई झाल्या. मातोश्री झाल्या. आपल्या वागणुकीने देवतास्वरुप झाल्या आणि लोकमाताही झाल्या. अहिल्यापासून लोकमातेपर्यंतचा त्यांच्या चरित्राचा विकास अद्वितीय आहे.

✡

# राज्यशासक

''अस्सल कागदोपत्रानिशी असे सिद्ध करता येते की अहिल्यादेवी या अव्वल दर्जाच्या मुत्सद्दी होत्या. म्हणूनच त्यांनी इतक्या हिरिरीने महादजी शिंद्यांचा पाठपुरावा केला. त्यांच्या सहकार्याशिवाय महादजींना औत्तरीय राजकारणातले श्रेष्ठत्व मुळीच लाभले नसते. त्यांच्याविषयीचा माझा आदर अमर्याद वाढला आहे.'' ही वाक्ये आहेत कै. जदुनाथ सरकार यांनी रियासतकारांना लिहिलेल्या पत्रातील!

त्यांच्या कालखंडातील चार पत्रे देत आहे. त्यावरून त्यांची योग्यता किती थोर होती हे लक्षात येईल. हे पहिलं पत्र मल्हाररावांनी अहिल्याबाईंना लिहिलं आहे.

चिरंजीव अहिल्याबाईंना मल्हाररावांचा आशीर्वाद. येथे कुशल आहे. आपला हाल लिहावा. सेंधवाच्या किल्ल्याच्या कारखानदाराला खर्चाची सर्व व्यवस्था करून दिली होती. जे रुपये पाठविण्यात आले होते. ते सर्व खर्च झाले आहेत. त्याचा हिशोबही आला आहे. तो तुमच्याकडे पाठविण्यात येत आहे. पुढील खर्चासाठी व्यवस्था करून दिली पाहिजे. तुम्ही माळवा प्रांतात गेला आहात म्हणून तुम्हाला हे पत्र लिहिले आहे. किल्ल्याच्या कारखानदाराला खर्चासाठी सर्व मदत पाठवून यथायोग्य प्रबंध करावा वारंवार त्याची तक्रार येणार नाही याकडे लक्ष द्यावे. इंदूरला पोचल्यावर कधी कधी तिथून माणूस पाठवून सेंधवाच्या किल्ल्याची देखरेख करून घ्यावी. ज्यामुळे काम लवकर संपेल. किल्ल्याच्या बुरुजाचे काम पूर्ण झाल्यावर त्याच्या आजुबाजूच्या खंदकाचे काम सुरु करावे. येथून चिरंजीव संताजी होळकरास पत्र लिहिले आहे. त्याच्याकडे खर्च लवकर पाठवावा. त्याच्याशिवाय काम थांबून राहू नये याचे ध्यान ठेवावे.

६-२१ रमजान, अधिक काय लिहावे? आशीर्वाद (मोर्तबखुद)

एकदा अहिल्याबाईंनी तीर्थयात्रेला जायचा मनसुबा बोलून दाखवताच मल्हारराव म्हणाले होते की ही तीर्थयात्रेची वेळ नव्हे, राजकारण काय, मसलत काय, मनसुबे काय येवढे आपणास कळू नये? आमच्या छावणीस पैसा, बारूद पुरवायचे काम सोडून तीर्थयात्रेस? इंदोर, ग्वाल्हेर येथून आम्हास कुमक

पाठवण्याचे प्राप्तकर्तव्य सोडून यात्रा? हे आमच्या कामास येणार नाही. आमच्या मर्जीचा प्रकार तुम्हास विदित आहेच. फौज लवकर तयार राखा.''

मल्हाररावांना अहिल्याबाईंचा खूप मोठा आधार होता. त्यांच्यावाचून मल्हारराव युद्धे करू शकले नसते. अहिल्याबाईंच्या कर्तृत्वावर त्यांचा दांडगा विश्वास होता. त्यांनी राजकारणाचे अनेक पदर, अहिल्याबाईंना शिकवले होते. इतिहासात मल्हाररावांनी काही चुका केल्याही आहेत, परंतु अहिल्याबाईंना सती जाण्यापासून त्यांनी रोखले, हे फार मोठे श्रेय त्यांच्याकडे आहे. अहिल्याबाईंनी तीस वर्षे राज्य तर सांभाळलेच पण अनेक राज्यात सुंदर वास्तू उभारून देशाचे सौंदर्य वाढवले आणि जनतेच्या हिताची कामे करून फार मोठे जनहित साधले. इतर राजांना स्फूर्ती दिली. त्यांचा आदर्श पुढे ठेवून अनेक सत्ताधारी दानाला महत्त्व देऊ लागले. त्यांनी सत्ताधाऱ्यांपुढे एक आदर्श ठेवला.

पुढील पत्र अहिल्याबाईंच्या मोडी लिपीतील पत्राचे देवनागरीत रुपांतर आहे.

राव सीवलाल कोतवाल कसबे इंदूर यासी अहिल्याबाई होळकर सुमासित सवेनम या व अलफ दुलेराव मंडलोई प॥ मजकूर याचे दुकान आहे. ते तुम्ही जबरदस्तीने घेतलेत म्हणोन मशारनिलेने हुजूर येऊन विदित केले. एसी यासी तुम्ही दुसऱ्याचे दुकान जबरदस्तीने घेतले याचे कारण काय? त्यावरून हे पत्र सादर केले असे. तरी मशारनिलेचे दुकान जबरदस्तीने घेतले असेल त्याचे त्यास माघार देणे. ये विषयीची फिरून बोभाट आलिया उपेगी पडणार नाही. दक्ष समजून वर्तणूक करणे जाणीजे.

छ २६ रबिलावल

मोर्तब खुद्द- (श्री. नि. छ. जमींदार यांच्या संग्रहातून)

यावरून राज्यशासक म्हणूनही त्यांनी केवढे कर्तृत्व मिळवले होते ते लक्षात येईल. दुकान बळकावण्यासारख्या अगदी किरकोळ गोष्टींसाठी सुद्धा त्या स्वतः तडजोडी घडवून आणण्यात पुढाकार घेत. त्यांची न्यायबुद्धी अत्यंत कार्यक्षम होती. आणि राज्यशासक म्हणून त्यांची फार आवश्यकता असते. त्यांना उत्कृष्ठ राज्यशासक म्हणून कीर्ति लाभली त्यात त्यांच्या विलक्षण अशा न्यायनिर्णय शक्तिचा फार मोठा भाग आहे. एका विशाल राज्याचे कुशल संचलन करून त्यांनी इतरही अनेक अनन्यसाधारण कामे करून दाखवली. त्यांचे जीवन म्हणजे एक प्रेरणादायी ग्रंथच आहे. त्या ग्रंथाच्या पानापानावर सुखशांतीचा, कर्तव्याचा, शौर्याचा, खंबीरपणाचा, न्यायप्रियतेचा, औदार्याचा धार्मिकतेचा अपूर्व असा संदेश लिहिलेला आहे. त्याचं वाचन आणि मनन करून आपल्याही मनावर अत्यंत शुभ

असे परिणाम होतात. त्यांचे राज्य हे खऱ्या अर्थाने रामराज्य होते. राज्यकारभाराची आदर्श अशी व्यवस्था होती. त्यांची राज्यव्यवस्थेची, भोवतालीच्या राजकीय परिस्थितीची जाण तीक्ष्ण होती. त्यांचे एखादे पत्र सुद्धा याची साक्ष देईल. त्या एका पत्रात लिहितात, ''चारही बाजूंनी आपला प्रसार करण्याची योजना फिरंग्यांनी आखली आहे. कुठे दोन तर कुठे तीन पलटणी उभ्या करून फिरंगी डोके वर काढतो आहे. अशा वेळी फौजा पाठवून त्याला त्या त्या ठिकाणीच गारद केले पाहिजे म्हणजे त्यालाही चांगली जरब बसेल आणि पुढे पाय पसरण्याची त्याला हिंमत होणार नाही. नबाब, भोसले सर्वांनी मिळून फिरंग्याला पराभूत केले पाहिजे.'' त्या विदेशी शक्तिच्या प्रभावामुळे अत्यंत चिंतित होत्या. त्यांना राजे सरदारांची स्वस्थता अनुचित वाटत होती. 'एकमुठ्ठीने फ्रेंच फिरंगी गारद करावा' हेच वाक्य, हाच संदेश त्यांच्या मुखात होता.

एक राज्यशासक या नात्याने त्यांनी सुरु केलेले अनेक प्रकल्प आपण आजही राबवतो आहोत हे केवढे आश्चर्य? जिल्हापरिषदांच्या पद्धतीने खेड्यापर्यंत न्याय ही त्यांचीच कल्पना! मुलींना शिक्षण, स्त्रियांना सैनिकी शिक्षण, हुंडाबंदी, दारुबंदी, झाडे तोडण्यास बंदी, कुटीरोद्योग या योजना आजही त्यांच्या बुद्धीवैभवाची साक्ष देत आहेत.

अहिल्याबाईंच्या ठाई देशवासियांनी अगाध श्रद्धा बाळगली. आजही ती श्रद्धा अधिकाधिक गडद होत आहे. या श्रद्धेमुळे त्यांना देवत्व लाभले. गयेच्या विष्णुमंदिरात आणि महेश्वरमध्ये त्यांची मूर्ती स्थापण्यात आली असून तिची पूजा भक्तिभावाने केली जाते. अशी ही त्यांची स्फूर्तिदायक गाथा प्रत्येकाने मनन केली पाहिजे.

✡

# अहिल्याबाईंच्या कारकीर्दीचा आढावा

## खाजगी कोष आणि सरकारी कोष

श्रीमंत बाजीराव पेशवे यांनी गौतमाबाईंच्या नावे दिलेल्या जहागिरीपासूनच खाजगी कोशाची सुरुवात झाली. ते पत्र खालीलप्रमाणे -

| | | |
|---|---|---|
| राजा शाहू नरपति<br>हर्षानिधान बाजीराव<br>बल्लाळ पंतप्रधान | श्रीराम | मि. पौष व॥ १२<br>ता॥ रविवार शके १६५५<br>२० जानेवारी इ. स. १७३४ |

राजश्री मल्हारजी होळकर गोसावी यांस अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य स्नो। बाजीराव बल्लाल पेशवे पंतप्रधान अनेक आशिरवाद, सु॥ स अरबा सलासीन मयाव आलफ. मालवे प्रांती वाटण्या होलकर २, सिंदे ३, पवार १, असे पाच हिशांनी प्रगणेनिहाय सनद सन गु॥ साली दिल्ही गेली. त्याजवर तुम्ही परगणे निहाय खाजगीचा हिस्सा काढून सरंजामीतून वजा करून आपल्या कुटुंबास इनाम लावून देणे. विर्शी चिमणाजी बल्लाळ पेशवे यांचे नावे पत्र लिहिले. त्यास दफाते पत्राचे पोटी सरंजामीतून वजा करून इनाम परवलाशीची याद पेश झालेवर, तुम्हास लि॥ येते की तुमचे ताब्यात खाजगी व दौलत दोन्ही प्रथक प्रथक कायम करून, तुमचे कुटुंब सौ. गौतमाबाईंचे नावे इनाम घेऊन, सनद व कपडे पाठवले आहेत. तरी खाजगीकडे इनामी तालुके निरंतर चालविणे-तपशील येणे प्रो

| | |
|---|---|
| २६३०००- | प्रो महेश्वर चोली व प्रो इंदूर,<br>हरसोल सावेर, बरलोई तालुका, प्रो देपाळपूर<br>प्रो (पैकी) तालुके हतोद, प्रो महतपूर, प्रो<br>जगोटी, करंजमा कडोन वगैरे बर हु॥। (हुकूम) यादी<br>मखलासीची. |
| ३६०९०- | दक्षिण प्रांतां चांदवड पो. गावे व |
| २९९०१०- | अबाड प्रो, कोरेगाव वगैरे मोगलाईकडील वरहु॥. याद |

एकूण इनाम कुलबाब, कुलकानू, दरोबस्त खाजगीकडील नेमून दिल्हे आहे. तरी निरंतर उपभोग घेऊन नविन सनदेचा आक्षेप न घेणे जाणिणे- छ.२५ साबान. बहुत काय लिहिणे लेखन सीमा- (डॉ. रघुवीरसिंग- मालवा मे युगांतर-पान ३११-अहिल्या स्मरणिका १९७३-१९७४)

या कोषात पुढे खूप भर पडत गेली. मल्हाररावांनी असीम शौर्य गाजवले. लढाईत जी लूट मिळे त्याचा काही भाग पुणे दरबारी, काही सरकारी तिजोरीत व काही खाजगी तिजोरीत जाई. मल्हाररावांच्या मृत्यूच्या वेळी पंधरा कोट रुपये खाजगीत जमा होते.

सरकारी कोषाचे विवरण (डॉ. उदयभानू शर्मा यांच्या पुस्तकाचा (कै.) कुमार कोठावळे यांनी अनुवाद केला आहे.) पुण्येश्लोक लोकमाता अहिल्यादेवी या पुस्तकातील परिशिष्ट ८ मध्ये पान ६० वर आलेले आहे. अभ्यासूंनी मूळ पुस्तक पाहावे. खाली थोडक्यात घेतले)

दक्षिण विभाग, खानदेश, नेमाड जिल्हा, मध्यविभाग, उत्तर विभाग, रजपूत आणि अन्य लोकांकडून असे एकूण १२६ ठिकाणाहून लक्षावारी वसूल येत असे. अनेक कोटींच्या घरात वसूल जात असे. अर्थात वसूलीसाठी अहिल्याबाईंनी चोख व्यवस्था केलेली होती. तरीही वसूलीसाठी सतत पत्रे पाठवून मानपाठ एक करावी लागे. पुढे जालिमसिंह झाला यांच्याकडील पैशांसाठी अहिल्याबाईंनी लिहिलेली पत्रे नमूना म्हणून देत आहे. (ही पत्रे १९७२ च्या अहिल्या स्मरणिकेत आलेली आहेत) (खाजगी देवी अहिल्याबाई होलकर चॅरिटीज ट्रस्ट इन्दौर द्वारा प्रकाशित)

मात्र ही पत्रे बरीच मोठी आहेत. त्यातला काही मजकूर कुशलवार्ता विचारण्यात पद्धतीप्रमाणे खर्ची पडला आहे. विस्तारभयास्तव तो मजकूर गाळून फक्त अहिल्यादेवींचे वसूलीचे कडक धोरण दाखविण्यापुरताच मजकूर घेतला आहे. सामान्य वाचकाच्या दृष्टिने हे चरित्र लिहिले असल्यामुळे ते विचकट आणि कंटाळवाणे होऊ नये म्हणून असे करावे लागले. जिज्ञासूंना मूळ पत्रे स्मरणिकेत पाहता येतील. ही पत्रे जालीमसिंह झाला यांना अहिल्यादेवींनी लिहिलेली आहेत. पहिले पत्र २४ एप्रिल १७९५ मधील आहे. त्यानंतर तीन महिन्यात पाचसहा पत्रे लिहिले. त्याच वर्षाच्या ऑगस्टमध्ये त्या कालवश झाल्या. मृत्यूपर्यंत त्यांची अखंड धडपड सुरू होती.

संवत १८८२ वैशाख शु. ६

श्री म्हाळसाकांत २४ एप्रिल १७९५

राजश्री राज जालमासिंह झाले गोसावी यांसी अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य स्नो। अहिल्याबाई होळकर विनंती हा असाच मायना सर्व पत्रांचा आहे.

या पाचही पत्रातले मुख्य मुद्दे त्यांच्याच शब्दात पुढे देत आहे.

पत्र नं. १ : संस्थान कोटे येथील सरकारचे मामलतीचा ऐवज येणे त्याचे जाबसालाविषयी तुमचे तर्फेने राजश्री बापुजी आनंदराव बोलले. त्याची उत्तर रवानगी केली असता अद्याप जाबसाल निर्गमास येत नाही. तरी तुमी दिवसगत न लावता, मामलतीचे ऐवजाचा निर्गम सत्वर करून देणे. लांबणीवर टाकिल्यावर तुम्हासच भारी पडेल, याचा पुरता विचार करून लांबणीवर न टाकता जल्द निकाल होय ते करणे.

पत्र नं.२ : मामलतीचा ऐवज बहुत येणे. आजचे उद्यावर टाकून दिवस काढता हे चांगले नाही. चिरंजीव राजश्री तुकोजीची पत्रे ऐवजाविषयी निकडीची येतात. सचोटीस जपत गेल्याने तुम्हासच बरे पडेल.

पत्र नं. ३ : राजश्री आत्माराम महिपतराव याजला तुम्ही रुपये देविले होते ते पावले नाहीत म्हणून ऐकिले. हे अपूर्व आहे. ऐवज देविला असेल त्याला ताकीद करून ऐवज पावता होईल ते करणे.

पत्र नं. ४ : पेशजी येक दोन पत्री कामविसदारांनी लिहिले की, तुम्हाकडोन कारभारी समागमे घेऊन येत असो. त्यास काय अद्याप येतच आहे? तरी तुमचा कारभारी कामविसदारामागे देऊन रवाना करावे. हुजूर आलिया सर्वार्थ ध्यानात आणून बंदोबस्त करून देणे तो देविला जाईल.

पत्र नं. ५ : राजश्री व्रजा नंद भट तुमच्याकडून संस्थान कोटे येथील मामलतीच्या कामासाठी इथे आले होते. मामलतीचा ठराव करून गोड गोष्टी बोलून गेले. त्याप्रमाणे अद्याप संस्थानचे ऐवजाचा निकाल राजश्री नरहर मुरार यांचेकडे करून देत नाहीत, म्हणोन हुजूर विदित झाले. येसियासी भटजी नाराजी येथून गेल्यास महिने होत आले परंतु ऐवजाचा निकाल नाही. ही गोष्ट उपयोगी नसे. कराराप्रमाणे ऐवज पावता करणे. आणखी कितेक तपसील राजश्री शंकरजी मुरार याजला सांगितला आहे. ते तुम्हास लिहितील.

पत्र नं.६ : संस्थान मार कडून पहिल्या हप्त्याचा ऐवज येणे. त्याची निशा शंकरजी मुरार यांनी करून दिली. या उपरी दुसरे हाप्तियाचा ऐवज येणे, याकरिता पंत मशारनिलेस येथून पाठवले. त्याजला जाऊन चारपाच महिने लोटले. अद्याप ऐवजाची तोड पडत नाही तर, हे गोष्ट उपयोगी नसे. पत्रदेखनी दुसरे हाप्तियाचा ऐवज झाडियानसी मारनिलेकडे पावता करणे. जर तुम्ही हाताचे पायावर घातलीयाने, फौजा त्या प्रांती आल्यावर तुम्हास जड पडेल. आसे समाजोन संस्थानच ऐवज झाडियानिशी मारनिलेकडे देऊन सत्वर रवाना करून हुजूर येऊन पोहोचणे ते करावे.

ही पत्रे त्यांच्या मृत्यूपूर्वीच्या काही महिन्यातील आहेत. शेवटपर्यंत त्या राज्याच्या पैशासाठी जागृत होत्या. पहिल्या पत्रात त्या स्पष्टच लिहितात की लांबणीवर टाकल्यास तुम्हाला जड जाईल आणि सहाव्या पत्रात तर तुमच्या प्रांतात फौजा आल्यास तुम्हास जड पडेल अशी धमकीच देतात. राज्यकारभार मोठ्या नेकीने, सचोटीने, निस्वार्थपणे केल्यामुळे त्यांच्या जिभेला तलवारीचे रुप आले होते. त्याची वाचा परखड, स्पष्टवक्ती, निर्भिड अशी होती. त्याच्या नि:स्पृहतेची मोहर त्याच्या वाचेवर उठून दिसे. त्या धार्मिकही होत्या आणि राजकारणी मुत्सद्दी होत्या. एकदा हरिपंततात्या पुण्याहून आले होते. त्यांना अहिल्याबाईंचा बारभाईना पाठिंबा मिळवण्यासाठी त्यांची शपथक्रिया हवी होती. तेव्हा कृष्णाजी मुरारांनी त्यांना स्पष्ट सांगितले की, ''अशा गोष्टी बाईसाहेबांशी बोलण्या इतके कोणाचेही पुण्य नाही. मातुश्रीच्या स्वभावात पीळ! उदास वृत्ती म्हणून गवताची पेंढी किंवा पावशेर तेल आज्ञेशिवाय देण्याची कोणास मुखत्यारी नाही.'' अहिल्याबाईंचा कारभार किती पिळाचा आणि चोख होता हे या उद्‌गारातून लक्षात येते. आणि हरिपंतांनी जेव्हा 'आपला पाठिंबा बालपेशव्यास हवा'' अशी प्रस्तावना करून शपथक्रियेची मागणी केली. तेव्हाचे अहिल्याबाईंचे तेजस्वी भाषण ऐकून हरिपंत थक्क झाले. त्या म्हणाल्या, ''तात्या, ईश्वरेच्छेकरून मजवर सर्वतोपरी गहजब. कैलासवासी सुभेदारांची, आमची निष्ठा गादीशी. बाजीरावांचे गादीवर जे ते आमचे मार्तंड. रघुनाथरावास नर्मदा उतरू दिली नाही. जेरबंद करण्याची ताकीद दिली हे आपण जाणता. तरीही आम्ही शपथक्रिया करावी असे तुमच्या मनी? आपण या रीती आमचेजवळ बोलता हेच अप्रशस्त! बेल म्हणजे आमचे लेखी भाजीपाला नव्हे!''

अहिल्याबाईंवर प्रसंगच असे आले की त्यांना जिभेची तलवार चालवावी लागली. मल्हारराव म्हणजे चालते बोलते राजकारणाचे विद्यापीठ होते. त्यांनी अहिल्यादेवींना राजकारणाचे धडे खूप दिले. वर दिलेल्या पत्रात त्या वसूल पाठवायची पुन्हा पुन्हा विनंती करतात. धमक्या देतात. याहून कडक कारवाई करणे त्यांना शक्य होते. परंतु माणसाला सुधारण्याची संधी देणे हे त्यांचे सूत्र होते. मल्हारराव नेहेमी म्हणत, ''माणूस उभा करण्यास, त्याला माणूस करण्यात कंपेश कोटी खर्च होतो. गणनीय मरातबास आणण्यात बुद्धी शिकवावी लागते. चार कामे सुधारतात, एखादे बिघडते. त्याच वक्ती त्याची आबरू घ्यावी ही कुठली गोष्ट? एखादा अपराध पोटी घालायला लागतो. माणूस तयार करणे सोपे नव्हे!'' अहिल्याबाई म्हणूनच क्षमाशीलही होत्या. पहिल्या दुसऱ्या गुन्ह्यास त्या क्षमा करीत. मल्हाररावांच्या अनेक पत्रातून त्यांना असलेला अहिल्याबाईंवरचा विश्वास त्यांनी

प्रकट केलेला आहे. ''तुम्ही इंदूरला आहात तर आम्ही असल्यासारखेच आहे.'' इतक्या त्या राजकारणात तयार झाल्या होत्या. वेळप्रसंगी अहिल्याबाईंना कठीण भाषणेही करीत असत. दिनांक ३-२-१७६५ रोजी अहिल्याबाईंना लिहिलेल्या पत्रात ते म्हणतात, ''जाते समयी तुम्हास सांगितले की मथुरेसी अगर आग्र्यासी काही मुकाम न करता, भारी भारी मजला करून ग्वाल्हेरीपर्यंत जाणे! तसे असता तुम्ही मथुरेसी दोन तीन मुक्काम करणार असे ऐकले. जाते समयी आज्ञा केली असता, त्या गोष्टी सर्व एकीकडे ठेवून मथुरेसी मुक्काम केला हे उत्तम नसे! आम्ही सांगितले ते न करावे, आणि आपल्याच चित्तात असेल तसे करणे असेल तरी सुखरुप तीर्थे करून असणे. पाणी पिण्यासी सुद्धा मथुरेत न थांबता ग्वाल्हेरीस जाणे. वरचेवर लिहू त्याप्रमाणे वर्तणूक करणे.'' आपल्या कर्तृत्वान सुनेस ''माझे ऐकायचे नसेल तर तीर्थास जाऊन रहा'' अशी सरळ दटावणी या पत्रात आहे. अशा कडक शिस्तीत वाढलेल्या अहिल्याबाई उत्कृष्ट शासक झाल्या. मल्हाररावांनी दिलेले धडे त्यांनी श्रद्धेने गिरवले. उदंड कीर्ति केली.

त्यांच्यावर आलेली संकटे पाहिली तर आपण थक्क होतो. कौटुंबिक आपत्ती तर होत्याच पण राजकीय आपत्तीही त्यांनी खूप सोसल्या. मल्हाररावांच्या मृत्यूनंतरचा काळ त्यांची परिक्षा पाहणारा ठरला. रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग अशी त्यांची स्थिती होती. मालेराव एकुलता एक मुलगा पण राज्यकारभार न शिकता केवळ उनाडक्या करीत राहिला. अहिल्याबाईंची सर्वात मोठी श्रद्धा ही होती की, खाजगी खर्चासाठी सरकारी तिजोरीतला पै पैसाही वापरायचा नाही. ही श्रद्धाच मालेरावने पायदळी तुडवली. वाटेल तसा पैसा उधळला. सरकारी तिजोरीतून, खाजगी खर्च केला. थोरांशी उद्धट वर्तन केले. मनुष्यहत्या केली. अहिल्याबाईंच्या संयमाची परिक्षाच चालवली होत मालेरावने. त्याच्या मृत्यूनेच ते काळे पर्व संपले पण आजपर्यंत चोख हिशोब असणाऱ्या अहिल्याबाईंच्या खतावण्या अस्तव्यस्त झाल्या. मालेरावाच्या मृत्यूचा शोक संपता संपत नव्हता. आयुष्यालाच जखम झाली होती. अन् नेमकी हीच संधी साधून महासंकट त्यांच्यापुढे आले. गंगाबोतात्यांनी फितूरी करून रघुनाथराव पेशव्यांना पत्र पाठवले की, ''अहिल्याबाई शोकात आहेत. होळकरांचे राज्य बेवारस झाले आहे. तुम्हा आक्रमण करा, मी आतून साथ देतो.'' आता जगण्या मरण्याचाच प्रश्न समोर आला. सत्तावीस सरदारांकडे मदतीसाठी पत्रे पाठवून त्यांनी तुकोजी होळकरांना सुभेदार नेमले. रघुनाथरावांना पत्र लिहिले, की मी स्त्रियांची फौज घेऊन रणात उतरेन आपली गाठ आता रणांगणावरच! मी हरले तरी कीर्ति करून जाईन पण तुम्ही स्त्रियांकडून हरलात तर तुम्हास तोंड दाखवायला जागा राहणार नाही!'' आपल्या सर्व कारभाऱ्यांना बोलावून त्या म्हणाल्या, ''कुणीतरी फितूरी केली. बंडाई

केली. आक्रमण करण्यासाठी आमंत्रणे गेली आहेत. मी बाईमाणूस, दौलत बेवारशी म्हणून? पण मेले हो, मी खांद्यावर बांसडा टाकून उभी राहीन, तेव्हा रघुनाथरावास अवघड पडेल. पूर्वजांनी भांडभवाई करून राज्य मिळवले नाही, तर तलवार गाजवली आहे. आमच्या राज्याची अभिलाषा धराल तर आमचीही तलवार चालेल.'' अहिल्याबाईंची जीभ तिखट होती त्याचे कारणच असे आहे की, फार मोठ्या संकटांना त्यांना सामोरे जावे लागले. हिशोबाच्या गोंधळांना तोंड द्यावे लागले. एकदा नारो शंकर तरातरा अहिल्याबाईंना म्हणाले, ''सैनिकांनी राडा मांडला. जो उठतो तो तोंडचा रुपया मागतो. युद्धाचा प्रसंग तर हमेशा. पैसा किती ओतावा?'' यावर अहिल्याबाई सैन्यापुढे गेल्या म्हणाल्या, ''आपण बहुत करामत केली. चार वर्से इथेतिथे राज्य राखिले. आपल्या कुटुंबाचा योगक्षेम सराकारातून चालू होता हे आपण जाणता का? तो पैसा आपल्याच खात्यात पडला ना? अन्नदात्याशी बखेडा हे महापाप! पैशांचा ताण जाणला पाहिजे. नवीन घडी बसते आहे. आम्हास अवघड करू नये! लेकराप्रमाणे वर्तन करावे.'' फौज मुजरे करून गेली. मग नारो गणेशास म्हणाल्या, ''हे ताणाबाणाचे काम संयमाने घ्यावे. रागसंताप आवरून सलोखा ठेवावा. फौजेशिवाय मसलत होईल का?'' अहिल्यादेवींची जीभ वेळप्रसंगी अशी मऊसूत होई.

पण अहिल्याबाईंचं दैवच सरळ नव्हतं. हेच नारो गणेश आणि सुभेदार तुकोजी होळकर संगनमताने पैसा खाऊ लागले. त्याचे पुरावे अहिल्याबाईंना मिळाले. नारो गणेशला पुणे येथे पाठवून अहिल्याबाईंनी दादाजी गंधाधरांना दिवाण नेमून हिशोब तपासायला बसवताच हे सगळे बाहेर आले. नारो गणेश येताच म्हणाल्या, ''मेले हो, किती दिवस फसवाल? मार्तंडे तुमचे शतकृत्य दादाजींच्या हस्ते फडणिशीत मांडून ठेवले आहे. ते बघा तोंड खापरागत होईल!'' पुढे तर हे नारो गणेश तुकोजी होळकरांच्या रखमाबाई नावाच्या बायकोत गुंतले असे म्हणतात. लुटीतले दागिने रखमाबाईकडे, वसूल परस्पर रखमाबाईकडे, तुकोजीची रक्षा राधा हिच्या घरी मद्याचे बुधले, दाराशी हत्ती. द्रव्य द्रव्य द्रव्य....येते ते इकडे जाई. अहिल्याबाईंना या दोघांनी पैशांसाठी त्रस्त केले. फौजेला खर्च पण अहिल्याबाईंना खाजगीतून द्यावा लागे. अहिल्याबाईंच्या दानधर्माचा बोभाटा श्रीमंत पेशव्यांपर्यंत गेला. तरी ही खंबीर स्त्री डगमगली नाही. त्यातच हरिपंतानी शपथक्रियेविषयी बोलणे केले. बेल म्हणजे आम्हा लेखी भाजीपाला नव्हे असं स्पष्ट सांगितलं. त्यानंतर महादजी शिंदे समेटासाठी आले. त्यावेळी वसई इंग्रजांनी घेतल्याचे कळताच चिडून म्हणाल्या, ''तुमच्या शंभर ओढी असतील पण एक वसई असती तर चिंता नव्हती. आता तुमची बोलणी व्यर्थ!'' पुढे समेटाचे बोलणे निघताच महादजींनी त्यांच्या जिभेला दोष दिला. बोलण्याचे सपकारे तुकोजींना

असह्य होतात, त्यांना कापरे भरते असे म्हणाले. तेव्हा अहिल्याबाई स्पष्ट म्हणाल्या, ''की त्यांची दुष्कृत्ये त्यांना छळतात. करोडोचे हिशोब नाहीत. पाटीलबाबा, थोरल्या सुभेदारांचे वेळी तुमचे हिशेब आमच्याकडे येत. तुकोजीने निमकहरामीचे फंद करावे. पाण्यासारखे मद्य प्यावे. रक्षेच्या दारी हत्ती ठेवावे, वसूल परस्पर घ्यावा, फौजेसाठी मला ओरबाडावे, पैसा ओरपावा, लूट पळवावी तरी तुम्ही म्हणता मी जोडून घ्यावे जोडून घ्यावे म्हणजे काय करावे? मी बाजूस व्हावे असे यांच्या मनात. म्हणून छळतात. पण राज्याचा नाश बघणे मला शक्य नाही!'' यावर महादजी शिंदे म्हणाले आम्ही पुरुष आक्रमण केले तर?'' त्या ताडकन उभे राहत म्हणाल्या, ''अवश्य! आमच्याही सैन्याची करामत पाहून जा. नाही एकेकाला हत्तीच्या साखळदंडाने बांधले तर सुभेदाराच्या सुनेचे नाव सांगणार नाही.'' अनेक संकटांनी अहिल्याबाईंना छळले. चुका सांभाळून घेण्याचीही त्यांनी हद्द केली. सैनिकांची निष्ठा अहिल्याबाईवरच होती.

अशातच अहिल्याबाईंच्या पुणे येथील वकिलांनी अहिल्याबाईंना कळवले की, ''आम्ही आपले मीठ खाल्ले आहे. म्हणून कळवल्यावाचून राहवत नाही. इथे तुकोजी होळकर यांनी मातोश्री अहिल्याबाईंना खर्चापुरते सालीना उत्पन्न देऊन सर्व अखत्यारी त्यांना म्हणजे तुकोजींना मिळावी अशी मसलत चालवली आहे. आपण मला पोसले. हे कळवता आले हे पुण्य पदरात. सावध असावे!'' एखादी स्त्री इतक्या आघाताने जमीनदोस्त झाली असती. कौटुंबिक आणि राजकीय आघात असह्य असेच! पण अहिल्याबाई म्हणाल्या, ''अवघी घालमेल, पैशांचा चुराडा, हिशोबाचे घोळ, असत्य भाषणे, लबाडी लांडे...आहो मी सुद्धा हात बांधून बसणार नाही. माझेच खा अन् माझी राखण करा असे बोलणार नाही. माझी पण करामत बघा. मी मल्हाररावांची सून आहे. जीव असेपर्यंत राज्यनाश होऊ देणार नाही.'' अहिल्याबाईंच्याच बाजूला सैन्याचा पाठिंबा होता. सैन्य त्यांच्याशी मातेसमान वागे.

अखेरपर्यंत अहिल्याबाईंनी झुंज घेतली. सर्वांचा पाठिंबा मिळवला. तुकोजीचे अपराध सर्वांपर्यंत पोचवून त्याच्या पदरात घातले. नेकीने कार्य केले. अनेक ठिकाणी सुंदर वास्तू बांधल्या. अफाट मनोधैर्य दाखले. दैवाचे आघात सोसले. राजकारणाचे घाव पचवले, 'करून दाखवीन' हेच ब्रीदवाक्य ठेवले. अहिल्यादेवी म्हणजे इतिहासातलं सोनेरी पान. अहिल्यादेवी म्हणजे लखलखीत, पराक्रमाची शौर्याची गाथा. अहिल्याबाई म्हणजे एका अंतर्बाह्य युद्धाशी पुरुषार्थाने घेतलेली झुंज. अहिल्याबाई म्हणजे मूर्तिमंत दया आणि क्षमा. अहिल्याबाई म्हणजे मातीवर अलोट प्रेम करणारी जगन्माता. अहिल्याबाई म्हणजे पुणे दरबाराचे पुण्यद्वार.

✡

# अहिल्याबाई आणि रुढीपरंपरा

जन्म हा आपल्या हाती नसतो. परंतु मिळालेल्या आयुष्याचं अहिल्यादेवी सारखं सार्थक करायचं की मालेरावं सारखं उधळून द्यायचं हे आपल्या हाती असतं. म्हणूनच अशा चरित्राचं महत्त्व आहे. ती योग्य वेळी हातात पडली पाहिजेत, वाचनात आली पाहिजेत तर आयुष्याला वाट दाखवायचं सामर्थ्य त्यातून लाभतं. अहिल्याबाईंना इतकी जीवतोड करण्याची काहीच गरज नव्हती. पंधरा कोट रुपये घेऊन त्या आराम करू शकल्या असत्या. पण आयुष्य दु:खपीडीतांसाठी वेचायचं की, आराम करण्यात घालवायचं, हा प्रत्येकाच्या वृत्तीचा भाग असतो. अहिल्याबाईंनी आपल्या आयुष्याचा क्षण आणि क्षण आपल्या प्रजेसाठी, त्यांच्या सुखासाठी वेचला. पेशवे यांच्या गादीची चाकरी करण्यासाठी वेचला. प्रजेचे अपत्यवत पालन करण्यासाठी त्या जगल्या. पंधरा कोट रुपयांतून त्यांनी अनेक लोकोपयोगी कामे केली. अन्नछत्रे घातली. पाणपोया घातल्या. सदावर्ते उघडली. लोकांसाठी घाट बांधले. जीर्णोद्धार केले. आयुष्याचं सार्थक झालं. औदार्यात त्यांनी खरं म्हणजे कर्णालाही मागे टाकले आहे. असं औदार्य आजपर्यंत झालं नाही. तुम्ही भारतात अष्टदिशांना जा, अहिल्याबाईंनी केलेलं कार्य, कोणत्यातरी रुपात तुम्हाला दिसेलच! आणि हे सारं त्यांनी केलं, अनेक आपत्ती सोसून, संकटे झेलून, न डगमगता खंबीरपणे केलं!

तो काळ अडीचशे वर्षांपूर्वीचा. स्त्रीवर अनेक बंधने होती. तिला शिक्षण तर नव्हतंच, पण मोकळेपणाने वावरणं, हसंण, बोलणं पण तिच्या दैवात नसायचं. अनेक रुढी, अनेक परंपरांनी तिला जखडून टाकलं होतं. सतीची दुष्ट आणि अन्याय्य रुढी पातिव्रत्याचा पुरावा मानली जात असे. पतिच्या मृत्यूबरोबरच जी आयुष्य संपवेल, तीच सती असा दंडक झाला होता. पातिव्रत्याचे देव्हारे माजवले जात. पत्नी मेली तर पुरुष लगेच दुसरा विवाह करू शकत असे, परंतु पतिचा मृत्यू पत्नीचंही आयुष्य संपवून जाई. त्यामुळे सौभाग्यव्रते करून पतीला आयुष्य मागणे हा इतकाच इलाज बाईच्या हाती होता.

खंडेरावांचा मृत्यू झाला तेव्हा, अहिल्याबाई २९ वर्षांच्या, मालेराव नऊ

वर्षांचा आणि मुक्ताबाई सहा वर्षांची होती. हे सारे पाश सोडून, तोडून अहिल्याबाईसुद्धा सती जाण्यास निघाल्या होत्या. त्या धीरोदत्त स्त्रीस ते कठीण नव्हतं. परंतु मल्हाररावांनी आकांत मांडला. पदर पसरला. पायाशी डोई घासली, ''बाई ग प्रजेसाठी फक्त तूच आहेस, जीव द्यायचा तर प्रजेसाठी दे...प्रजेची आई हो!'' आणि त्या सती गेल्या नाही. उर्वरित आयुष्यात त्यांनी महान कर्तृत्व केलं आणि सतीची चाल किती घातक आहे याचा पुरावा दिला. त्यांनी पुढच्या आयुष्यात ९ सवती आणि अधिक आणखी नऊ अशा अठरा सती पाहिल्या. आपल्या दोन सुना, दोन नातसुना आणि कन्या मुक्ता आणि तिच्या दोन सवती यांच्या सती जाण्यास त्यांनी कडकडून विरोध केला. पण जनतेच्या रेट्यापुढे त्या हतबल होत्या. सतीविरोधी जनमत तयार करण्यात मात्र त्यांचा भरपूर वाटा आहे. आपण सतीची चाल बंद करू शकत नाही याची त्यांना पुरेपूर खंत वाटे. त्या धार्मिक होत्या पण रुढी परंपरा पारखून, बुद्धीवर घासून विचार करून स्वीकारण्याचा त्यांचा प्रघात होता. म्हणूनच त्यांनी बऱ्याच वेळा रुढीविरुद्ध मनास पटले ते केले आहे.

ज्या काळात 'अष्टवर्षात भवेत कन्या'.... मुलगी आठ वर्षांची झाली की तिचं लग्न केलं जाई. मालेराव या पुत्राचाही विवाह अकराव्या वर्षी केला गेला. त्याला मैना आणि पिरता अशा दोन बायका. एक आठाची एक अशीच आठनऊची! मालेरावाच्या मृत्यूनंतर या इवल्या इवल्याशा पोरींना सतीवस्त्रे नेसवली गेली तेव्हा अहिल्याबाईंनी खूप अडवलं. त्या व्याह्यांना म्हणाल्या, ''व्याही, मंगळसूत्राने यांचा केवळ गळा आवळला. प्रेमाचा वा सुखाचा शब्द नाही मिळाला पतीकडून. का सती जायचं यांनी?'' यावर उसासा टाकत व्याही म्हणाले, ''ज्याचं त्याचं प्राक्तन. आमची कुळकन्या सतीचं वाण घेऊनच जन्माला येते. आमचं घराणं सतीचं आहे. आमच्या घरी विधवा नाहीत!''

''हे देव्हारे तुम्ही पुरुष माजवता. अहो, तुमचा जीव तुटत कसा नाही?''

''आपण इतक्या धार्मिक असून आपण हे धर्मविरोधी कृत्य कसे करता?'' व्याही म्हणाले. त्यावर अहिल्याबाई उसळून बोलल्या, ''कोण म्हणतो हा धर्म? ही तर केवळ स्वार्थी कुटुंबांनी लादलेली उजेडाकडून अंधाराकडे नेणारी एक अंध रुढी! अंधश्रद्धा म्हणजे धर्म नव्हे! म्हणे बेचाळीस पिढ्यांचा उद्धार...स्वर्ग... घंटानाद... कुणी पाहिला स्वर्ग, कुणी ऐकल्या घंटा? अवघे कपोलकल्पीत... काय हे बाईचं जिणं? केवळ मरण! यांच्या जळण्याचा ना खेद ना दुःख! बाई जर मेली तर एक पुरुष जाणार नाही सती. पंधराव्या दिवशी बोहोल्यावर चढेल'' वाचक हो, अहिल्याबाईंच्या नावे असलेले संवाद आम्ही लहानपणापासून ऐकतो आहे. या कथा माळव्यात सांगितल्या जातात. अखेर अहिल्याबाईंना भूल दिली गेली. त्यांच्या

मनाविरुद्ध सुनांना सती दिलं गेलं. हाच प्रकार नातू नथोबाच्या बाळाबाई आणि गौरी यांच्यावेळी झाला. नथोबाच्या मृत्यूनंतर या दोघी सती गेल्या. मुक्ता आणि तिच्या दोन्ही सवतीही पतिनिधनानंतर सती गेल्या. प्रत्येक वेळी नातेवाईकांचा रेटा जबरदस्त ठरला. ''तुम्ही सती न जाऊन धर्मविरोधी कृत्य केलं आता यांना तरी अडवू नका.'' असे वाचेचे फटके त्यांना खावे लागले. आता मुक्ताचं लग्न या भागाकडे जरा वळू या!

परंपरावादी वातावरणात मुक्ताच्या लग्नाचा पण लावणे ही किती धारिष्ट्याची गोष्ट होती. ''जो भिल्लांचा बंदोबस्त करील त्याच्याशी कन्या मुक्ता हिचं लग्न होईल.'' या 'पणा' मध्ये कितीतरी धोके होते. 'पण' जिंकणारा रोहिला, म्लेच्छ, वगैरे जातीचा असू शकत होता. 'पण' केला तेव्हा आठ वर्षाची असणारी मुक्ता, तिचा पती पंचविशीच्या पुढचा असण्याचा धोका होता. तो कुळहीन, दरिद्री असणे पण शक्य होते. मुक्तेची पसंती त्यास लाभेलच असेही खात्रीपूर्वक कसे सांगणार? पण तरीही अहिल्यादेवींनी हा 'पण' लावला. तो प्रजेच्या सुरक्षिततेसाठी. यात्रेकरू, प्रवासी यांची लूट होत असे. प्रवासात दगाफटका होई. चोऱ्या होत. हे सारं भिल्ल करीत. सरदारांनाही थोडा वाटा देऊन, भिल्लांनी निर्वेधपणे लुटारुपणा चालवला होता. म्हणून हे सारे धोके पत्करून अहिल्याबाईंनी मुक्तेच्या लग्नाचा 'पण' लावला. काळाच्या कितीतरी वर्षे पुढचा हा निर्णय होता. प्रजावत्सल अहिल्यादेवींनी प्रजेसाठी आपल्या मुलीच्या सुखाचा विचारही केला नाही. आणि ज्या काळात आठव्या वर्षी मुलीचं लग्न केलं जाई, त्या काळात मुक्ता अठरा वर्षांची झाली. लोकांची दूषणे, टीकाटिपण्या सहन करीत अहिल्याबाई वाट पाहत होत्या. अखेर यशवंतराव फणसे या शूराने हा पण पूर्ण केला आणि अठराव्या वर्षी मुक्ताचं लग्न झालं. जनरुढीला प्रचंड धक्का देण्याचं साहस त्यांनी दाखवलं ते प्रजेच्या सुखासाठी. म्हणूनच त्या प्रजेची लोकमाता झाल्या.

अहिल्याबाई म्हणत, ''ज्या रुढी अंधाराकडून उजेडाकडे नेतात त्या रुढी आम्हाला मान्य आहेत. उजेडाकडून अंधाराकडे नेणाऱ्या रुढींना आम्ही अंधश्रद्धा म्हणतो. तशा रुढी पाळताना प्रत्येकाने विचार करावा.''मुक्ताचं लग्न रुढी मोडून ठरलं आणि रुढी मोडूनच झालं. याच पद्धतीने अहिल्यादेवींना हुंडा पद्धतीचा संताप होता. त्या म्हणत स्त्रीच्या कौतुकाची नुसती ढोंगे. तिला देवी म्हणावं, देवता म्हणावं, आदिशक्ति म्हणावं, आणि तिच्या गृहप्रवेशाचे पैसे घ्यावे, सोनेवस्तू घ्यावा, मानपान करून घ्यावा, पैसा ओरपावा हे कुठले खेळ? म्हणूनच त्यांनी राज्यात हुंडाबंदी जारी केली. हुंडा देणारा, घेणारा आणि मधस्त या सर्वांना दंड ठोठावण्याची तरतूद या कायद्यात होती. प्रजेला सुख लागावे म्हणून ही स्त्री दक्ष

राहिली. अशा स्वार्थी रुढी तोडणे फार कठीण असते. पण ते काम अहिल्यादेवींनी केली. 'ऐसी कळवळ्याची जाती । लाभावीण करी प्रीती ॥'- लाभावाचून प्रेम करणाऱ्या अहिल्याबाई एका राज्याच्या सत्ताधीश होत्या. आपल्या सत्तेचा उपयोग त्यांनी प्रजेसाठीच केला हा त्यांच्या चरित्राचा विशेष आहे. आपले वैयक्तिक दु:खाचे गाठोडे बाजूला ठेवून त्या प्रजेसाठीच राबल्या.

सतीच्या रुढीची चीड, हुंड्याचा संताप आणि मुक्तेच्या लग्नाचा पण लावण्याचं धारिष्ठ्य आपण पाहिलं. अंधरुढी तोडणाऱ्या आणखी काही घटनांचा उल्लेख करणे आवश्यक आहे. मुक्तेचं लग्न झालं तेव्हा खंडेराव नव्हते. मालेराव हा पुत्र अत्यंत दुर्गुणी होता. त्याची अहिल्याबाईंनाच खात्री नव्हती. अशावेळी मुक्तेचे कन्यादान स्वत: अहिल्यादेवींनीच केले असे म्हटलेले आहे. वास्तविक तुकोजी होळकर, भारमलदादा होळकर हे होळकरांचे दासीपुत्र होते. सपत्निक आलेले होते. परंतु कन्यादान रुढीला मान्य नसतानाही अहिल्याबाई नावाच्या 'स्त्री'ने केले. यासाठी धैर्य आणि धाडस त्यांच्याजवळ होते.

भाद्रपद महिन्यातल्या पितृपक्षात अहिल्याबाईंकडे पूर्वजांची श्राद्धे होत. स्वत: अहिल्यादेवी श्राद्धाचे पाणी सोडीत. अंबादास गुरुजींना त्या म्हणत, ''मजला स्त्री ही ईश्वरेच केले, मला विधवाही त्यानेच केले. मी जशी आहे तशी करतेय...!'' लोकनिंदा सहन करणे फार कठीण आहे. पण ती सहन करूनही अहिल्याबाईंनी आंधळ्या रुढींवर प्रहार केले.

श्रावणात आणि इतर वेळीही मुस्लीम फकीर आले तर अहिल्याबाई त्यांनाही चादरीसाठी खैराती देत असत. म्हणायच्या 'आम्ही अल्लास वेगळा समजत नाही. म्हणूनच बादशाहीच्या रक्षणास धावतो.'' सर्वधर्मसमभाव हा शब्दही जेव्हा वापरात नव्हता त्यावेळी अहिल्यादेवींची सर्वांशी वर्तणूक सर्वधर्मसहभावाची होती. त्यांनी तो कृतीत आणला होता. म्हणूनच दर्गे, मशिदीसही त्यांनी पैसे दिले.

अहिल्याबाईंची निष्ठा जाज्वल्य होती. त्यांना पैशांचा मोह कधीच नव्हता. पेशवे कर्जबाजारी झाले आहेत हे जेव्हा अहिल्याबाईंना कळलं तेव्हा या निर्भय सुनेने सासरे मल्हाररावांवर जे ताशेरे झाडले आहेत, त्याचा विचार आज प्रत्येक नागरिकाने प्रत्येक सत्ताधाऱ्याने, प्रत्येक राजकारण्याने करायला हवा. त्यांची ही कथा माळव्यात प्रसिद्ध आहे. त्या म्हणाल्या, ''मामंजी, श्रीमंत पेशव्यांना कर्ज होते आणि त्यांचे सरदार करोडोपती होतात हे घडतेच कसे? धन्यास पदर पसरावा लागत असेल तर रुपयांची नदी सरदारांच्या तिजोरीत जिरते हे स्पष्ट आहे. मामंजी, आपण पेशव्यांचे सुभेदार, पेंढारी नव्हेत. मामंजी, अपकीर्तिपरीस मरण पत्करावे, फुकटची तनसडी नको हे आपणच शिकवले. आज आपण पेशव्यांची हिस्सेवारी

बुडवत आहात. राज्याच्या, श्रीमंताच्या राज्यापेक्षा व्यक्तिगत स्वार्थ अधिक आहे काय, असा आमचा स्पष्ट सवाल आहे! व्यक्तिगत स्वार्थापेक्षा राज्य अधिक राज्यापेक्षा हा देश, श्रीमंत पेशव्यांचे राज्य अधिक, हे आपलेच बोल. पुणे येथे जाऊन कर्जाची पै पै पावती करून यावी. जय वा पराजय यावर आम्ही यश मोजत नाही. आमचे खरे माप राज्यासाठी निष्ठा आणि सत्य शुद्ध हिशोब!'' या तडफदार सुनेचा सल्ला मानून मल्हारराव पुणे मुक्कामी जाऊन पेशव्यांच्या कर्जाचा काही भाग फेडून आले ही सत्य ऐतिहासिक घटना आहे. हे घडवणाऱ्या अहिल्यादेवीच होत्या. एक जागृत राज्यशासक, निष्ठावान राज्यकर्ती!

सत्यासाठी त्या कुणालाही भीत नसत. त्यांनी नाना फडणीसांना महेश्वर येथील वकीलाकडून जे पत्र टाकले होतं, त्यात स्पष्ट लिहायला सांगितले होते की दारुगोळ्याचा वापर धर्मकार्यात करणे योग्य नव्हे. धर्मकार्यात विघ्ने येऊन माणसे जाया करणे ही कुठली रीत? यात चूक ज्यांनी बुद्धीहीनांच्या हाती दारुबारुद दिली त्यांची! आपणास माझा क्रोध येईल. कदाचित शासनही कराल. पण सत्यासाठी आम्ही मृत्यूसही भीत नाही.''

✡

# मूळ तत्त्वे

वरील 'आढावा' या प्रकरणात अहिल्यादेवींच्या एकंदर चरित्राचा आढावा घेतला. तो घेताना त्यांच्यासंबंधी माळव्यात प्रचलित असलेल्या काही कथांचा आधार घेतला. त्यांचा स्वभाव चहुबाजूंनी समजून घेण्यासाठी ते आवश्यकच होय! आढावा म्हणजे त्यांच्या चरित्राचं सार आहे, अर्क आहे असं म्हटलं तर वावगे ठरणार नाही. या प्रकरणात मी अहिल्याबाईंची राज्यकारभाराची मूळ तत्त्वे किंवा आधारभूत घटक यांचा मागोवा घेणार आहे.

१) खाजगी खर्चासाठी सरकारी तिजोरीतील पै सुद्धा खर्च करणे त्या गुन्हा मानत. त्याचं हिशोबतपासनीसांना आव्हान होतं की मी खाजगी खर्चासाठी सरकारी एक पै जरी वापरली असेल तरी मी पाचपट परत देईन. दुर्दैवाने त्यांचे वारस या प्रकारचे निघाले नाहीत.

२) स्त्रियांचा सन्मान हा माळव्याचा महालौकिक झाला पाहिजे. विधवेकडून नजराणा घेणे म्हणजे शुद्ध दरोडा आहे. म्हणूनच त्यांनी विधवांना दत्तक घ्यायची परवानगी दिली होती.

३) नियतशाबूती हा तर राज्यकर्त्यांचा प्राण! नियत संपली तर उरते ते प्रेत

४) देवळांचा जीर्णोद्धार करणे म्हणजे अपयशाच्या खुणा धुवून टाकणे.

५) रयतेला चिरेबंद आश्रयस्थाने हवीत म्हणून ठिकठिकाणी धर्मशाळा बांधल्या पाहिजेत.

६) 'करून दाखवीन' ही जिद्द पिळापिळात असावी.

७) लहान लहान खेड्यापर्यंत त्वरित न्यायनिवाड्यासाठी ग्रामपंचायत योग्य आहे.

८) शेतकऱ्यास प्रधान मानायला हवे. त्याला सुविधा द्यायला हव्या.

९) जमीनमळ्यात ऐवज पिकला तरच चढी पट्टी मिळणार म्हणून शेतकरी प्रधान समजावा.

१०) धार्मिक असावं पण धर्मांध नसावे.

११) आग लागण्यापूर्वीच काष्टे उचलून फेकावी. समेटाने, सलुखाने प्रजेला सुख! युद्ध म्हणजे मनुष्यसंहार.

१२) माणसाला माणसापासून दूर नेणाऱ्या रूढी त्याज्य समजाव्या.

१३) तरते बुडते पाहत कुंपणावर बसलेल्यांशी स्नेह करू नये. त्यांचा भरोसा धरू नये.

१४) अविवेकाच्या हाती सत्ता देणे म्हणजे सर्वनाश. (हे मालेरावांच्या संबंधात आहे.)

१५) कायद्याने सतीच्या रुढीस बंदी घालायला हवी (या रुढीने आयुष्यभर त्यांना छळले)

१६) फौजेस पैसा उणा पडू नये म्हणून फौजखर्चाचे परगाणे आणि महाल वेगळे ठेवले.

१७) जे सुभेदारी भोगतात त्यांची मनगटे रयतेसाठीच असतात.

१८) जो प्रजेस छळेल त्याचा नायनाट हे त्यांचे स्पष्ट धोरण. लांचखोरास शिक्षा-

१९) धर्म म्हणजे सन्मार्गावर ठेवणारे एक सूत्र! धर्म वैर करायला शिकवत नाही. बंधुभाव सांगतो.

२०) हे राज्य शंकराच्या आज्ञेने चालवते अशी त्यांची श्रद्धा होती म्हणून त्या सही करत शंकर आज्ञेवरून.

२१) राज्यकर्त्यांने आपल्या नातलगांची वर्तणूक स्वच्छ ठेवावी. त्यांचे गुन्हे पोटात घालणे म्हणजे महापाप. (म्हणूनच आपल्या पतिची झडती घेऊन सर्व लूट सरकारजमा केली. त्यांचा तनखा दोन महिन्यात संपला तरी अधिक उचल दिली नाही. सासरे मल्हाररावावर स्पष्ट ताशेरे ओढून त्यांच्याकडून पेशवे यांना झालेल्या कर्जाची फेड केली)

२२) माणूस तयार करणे सोपे नव्हे. चार कामे सुधारतात, एखादे बिघडते. एखादा अपराध पोटातही घालता आला पाहिजे.

२३) युद्ध टाळण्याच्या प्रयत्न हा भेकडपणा नसून मुत्सद्देगिरी आहे. युद्ध म्हणजे सर्वनाश शांति म्हणजे प्रजेचं सुख, उत्कर्ष!

२४) नजरबाज आणि राज्याराज्यातले प्रतिनिधी हे राज्यकर्त्यांचे डोळे असतात.

या सूत्रानुसार अहिल्यादेवींनी राज्यकारभार केला. अंधाधुंदीच्या भयानक काळात त्यांच्या हाती राज्यकारभार आला. आपल्या उत्कृष्ट शासनाच्या बळावर त्यांनी युद्ध टाळून राज्यात शांति राखली. प्रजेचे वैभवसुख वाढवले. पथभ्रष्टांना त्यांच्या जागा दाखवल्या. लांचखोरांना कडक शिक्षा केल्या. राजनीतिनिपुण अशा या साध्वीने प्रजेत विश्वास निर्माण केला. त्यांचे पवित्र चारित्र्य आणि प्रजावात्सल्य यामुळे त्यांना लोकमातेची उच्च पदवी मिळाली; जी आजपर्यंत इतर कुणालाही लाभली नाही.

(कै.) विनोबाजी भावे म्हणतात, ''आम्ही जिथे जिथे गेलो तिथे तिथे अन्य प्रांतियांकडून आम्ही अहिल्याबाईंची स्तुतीच ऐकली. शस्त्रबलाने दुनियेला जिंकणारे अनेक आहेत, परंतु प्रेमाने, धर्मशक्तिने, भारतातील सर्व प्रांतांना जिंकणारी अहिल्यादेवी ही एकमेव होय!

''आढावा'' आणि ''मूळ तत्त्वे'' ही दोन प्रकरणे वाचकांना चरित्र सूत्ररुपाने सांगण्याकरता, अहिल्यादेवी चरित्राचा बोध चटकन ध्यानी येण्याकरता मुद्दाम घातली आहेत. अहिल्याबाई आणि रुढीपरंपरा हे प्रकरण त्यांचा डोळस दृष्टिकोन मांडतो.

यापुढे सुरू होणारे कुटनीतीज्ञ अहिल्यादेवी हे प्रकरणही त्यांची कूटनीती सरळपणे कळावी म्हणून मुद्दाम टाकले आहे. आढावा, मूळतत्त्वे, अहिल्यादेवी आणि रुढीपरंपरा आणि कुटनीतीज्ञ अहिल्याबाई ही चारही प्रकरणे अहिल्यादेवींचा व्यक्तिमत्व विकास, त्यांची दूरदृष्टी, खंबीरता स्पष्ट करतात. तेजस्विनी अहिल्याबाई आपल्या समोर उभ्या राहतात. हे चरित्र आपल्या हाती देताना समाधानाची भावना आहे. या तेजस्विनी लोकमातेला त्रिवार वंदन!

✡

# कूटनीतीज्ञ अहिल्यादेवी

(कंसात दिलेल्या आकड्यांचे विवरण शेवटी बघावे.)

मल्हाररावांनी अहिल्यादेवींना सती जाऊ दिलं नाही, हे त्यांच्यावरच नव्हे तर भारतवर्षावर उपकार झाले. पुढील आयुष्यात अनेक ठिकाणी वास्तू बांधून त्यांनी हा देश सुंदर करून टाकला. त्यांना फक्त 'धार्मिक' इतकीच उपाधि देणे म्हणजे त्यांच्या अनेक सद्गुणांची उपेक्षा करणे होय! मल्हाररावांच्या मार्गदर्शनाखाली त्या कारभारात इतक्या प्रवीण झाल्या की भल्यांभल्यांनी त्यांच्या बुद्धिवैभवाचे कौतुक केले. त्यांच्या कूटनीतिची काही उदाहरणे इथे एकत्रितपणे दिल्यास वाचकांना ते आनंददायी आणि मार्गदर्शक होईल.

(२०-५-१७६६) सुभेदार मल्हारराव मृत्यू पावले. अहिल्यापुत्र केवळ अकरा महिन्यांनीच मनोरुग्ण होऊन कालवश झाला. १७६७च्या मार्चमध्ये ही घटना घडली. होळकर वंश बेवारस झाला. त्यावेळी अहिल्यादेवींनी स्वत: राज्य चालवण्याचा विचार पेशव्यांपुढे मांडला. पेशव्यांना तो मान्य झाला नाही. अहिल्याबाईंचे कारभारी गंगाधर चंद्रचूड यांनी अहिल्याबाईंनी दत्तक घ्यावा असा सल्ला दिला. अहिल्याबाई दूरदर्शी होत्या. त्यांनी नकार दिला. त्यांनी तुकोजी होळकरास सुभेदारी आणि प्रशासन अधिकार अहिल्याबाईंकडे अशी सनद पेशवे यांचेकडून आणवली. इंग्रजी राज्याच्या कितीतरी आधी हा द्वितंत्री प्रयोग अहिल्याबाईंनी सुरू केला. तुकोजी होळकर यांचेकडे फौजेचे, वसूलीचे अधिकार (De Juse) आणि अहिल्याबाई राज्याच्या प्रशासक (De Facto) असा कारभार त्यांच्या मृत्यूपर्यंत चालला. (१) त्यांची प्रशासकीय क्षमता प्रचंड होती. त्यात त्यांच्या कूटनीतिचा वाटा खूप होता. राजकीय चाल कुठल्या हेतूने केली आहे ते त्या ओळखत.

गंगाधर चंद्रचूडांनी रघुनाथरावांच्या मदतीने अहिल्याबाईवर आक्रमण करून राज्य गिळंकृत करण्याची योजना आखली. त्याचा अहिल्याबाईंनी कसा खरपूस समाचार घेतला त्याची सविस्तर हकीगत यात लिहिली आहेच. हा विजय अहिल्यादेवींच्या कूटनीतिचा विजय होता.

(२) अहिल्याबाईंचा प्रभाव कमी करण्यासाठी हितशत्रूंनी एक षड्यंत्र रचले. त्यांचे खाजगीतले कारभारी नारो गणेश यांना तुकोजीचा कारभारी नेमले आणि अहिल्याबाईंचे विश्वासपात्र कारभारी शिवाजी गोपाळ यांची नियुक्ती पेशवे दरबारात करवून घेतली. या सर्व बदल्यांसाठी पेशव्यांना एक लाख रुपयांचा नजराणा देण्यात आला. हे सर्व अहिल्याबाईंना कळताच यामागील षड्यंत्र त्यांच्या त्वरित लक्षात आले. त्यांनी आपली इंदूर येथील राजधानी त्वरित महेश्वरला हलवली आणि आपल्या विश्वासातले कारभारी नेमले.

आपल्या शेजारी राज्यांना, आपले मित्रराज्य करून ठेवणे हे अहिल्यादेवींचे तत्त्व होते. शेजारी राज्यात काही आपत्ती आल्यास, त्यांचा उपाय शोधायला त्या सदैव तयार असत. ते आपले कर्तव्य आहे असे त्या मानीत. एकदा बडवानीच्या राजाने पेशवे दरबारात होळकरांविरुद्ध तक्रार नेली. (३) अहिल्याबाईंना त्यांचा दृष्टिकोन बिलकूल मान्य नव्हता. त्यांनी राजाला सल्ला दिला की ''बडवानीची स्थिती सुधारण्यासाठी आपल्या आईशी चर्चा करा.'' यामुळे बडवानीच्या राणीच्या मनात अहिल्यादेवींविषयी विश्वास निर्माण झाला. आणि ते राज्य सदैव अहिल्यादेवींचा सल्ला घेऊ लागले.

धार राज्यातले सुभेदार पवार यांच्याशी झगडा उकरून तुकोजी होळकरांची पत्नी रखमाबाई यांनी काही सामान जप्त करवले. हे अहिल्यादेवींना समजताच त्यांनी रखमाबाईंना खूप फटकारले. पवार आणि होळकर यांच्यातील मैत्रीपूर्ण संबंधांची त्यांना आठवण करून दिली. सर्व वस्तू पवारांना परत द्यावयास लावल्या आणि भविष्यात असं घडायला नको अशी ताकीद दिली. (४)

(५) हैद्राबाद राज्याशीही त्यांचे मैत्रीपूर्ण संबंध होते. मुस्लीमांविषयी त्यांना दृष्टिकोन मानवतापूर्ण आणि उदार होता. त्यांच्या सहिष्णुता वृत्तिमुळे त्यांना मुस्लीम राज्यातही लोकप्रियता लाभली होती. हैद्राबादचे राजे सदैव अहिल्याबाईंचे कुशल मंगल चिंतीत. एकदा हैद्राबाद येथील अहिल्यादेवींचे वकील श्री. महादेव लक्ष्मण यांनी, वाद्यांचा गजर करण्यासाठी काही पैसे मागवले. होळकरांचे कुलदैवत मार्तंड होते. त्या मंदिरात वाद्ये वाजवण्यासाठी, पैसे मागितल्याचे अहिल्यादेवींच्या लक्षात आले. तेव्हा अहिल्याबाईंनी कळवले की, मुस्लीम लोकांना वाद्यगजर पसंत नसतो. त्यांच्या भावना दुखवू नयेत. आपण ही मागणी पुन्हा करू नका फक्त मंजूळ वाजंत्री लावा. (६ ते ९) तुकोजी होळकर दक्षिण भारतात व्यस्त होते. त्यावेळी महादजी शिंदे यांनी राजपुतान्यामधे, आपले बस्तान बसवले. त्यांनी आपले प्रभावक्षेत्र इतके वाढवले की, अखेर सगळे राजपूत त्यांच्याविरुद्ध एकत्र आले, आणि पेशवे दरबारी कळवले की, महादजी शिंदे यांना राजपुतान्यात ठेवू नये.

महादजीला आता होळकरांची मदत मागण्यावाचून गत्यंतर नव्हते. पेशवे आणि तुकोजी त्यावेळी टिपू सुलतानच्या युद्धात गुंतले होते. म्हणून त्यांनी अहिल्याबाईंना पत्र लिहिले. पत्रात महादजींनी होळकर शिंदे यांच्या दृढ मैत्रीची आणि त्यांच्या स्वामीभक्तिची, आठवण करून दिली होती आणि त्वरित फौज पाठवण्याची विनंति केली होती. आता अहिल्याबाईंना महादजींवर कूटनीतिक प्रहार करण्याची संधी आली. त्यांनी महादजींना जे उत्तर दिले आहे ते पत्र म्हणजे त्यांच्या कूटनितिचा उत्तम नमूना आहे. त्यांनी लिहिले,

''आपली मैत्री आणि बंधुभाव हा आजही अगदी ताजा आहे. त्यात कुठलेही परिवर्तन आलेले नाही. आपण फक्त हजार सैनिक मागवले, मी दहा हजार पाठवायला तयार आहे. परंतु या व्यवहारातही आपल्या जुन्या देवाणघेवाण पद्धती पाळायला हव्या.'' जुनी व्यवहारपद्धत म्हणजे विजयानंतर होळकरांना शिंदे यांनी २५% ते ३७॥% टक्के हिस्सा द्यायला हवा. अहिल्याबाईंनी तुकोजीकडूनही फौज मागवून ठेवली आणि स्वत:ची फौजही तयार ठेवली. महादजींना पुन्हा पत्र लिहिलं, ''मी मजबूत सेना उभी केली आहे. आपले पत्र मिळताच आवश्यक पाऊल उचलले जाईल. आपण लिहिता की राजपूत, इंग्रज आणि रांगडे सगळे आपल्याविरूद्ध गेले आहेत, याचे कारण आपण मला सांगू शकाल का?'' महादजी शिंदे हे स्वत: उच्च प्रतिचे कूटनीतीज्ञ होते. त्यांच्यावर अहिल्याबाईंनी या पत्राने मात केली. 'सौ सोनारकी और ए लोहारकी' या म्हणीप्रमाणे अहिल्याबाई चातुर्य आणि विद्वत्तेच्या जोरावर आपली कूटनीति राबवीत. विरोधी पक्षाच्याच शस्त्राने त्या विरोधकांना धडा शिकवीत. हिशोबाची हिस्सेवारी होळकरांना मिळायला हवी ही मागणी त्यांनी ठासून केली होती. कारण खुपवेळा ही हिस्सेवारी बुडवली जाई.

इंग्रजांकडून आपल्या राज्यास धोका आहे, अशी सूचना अहिल्याबाईंनी वेळोवेळी दिलेली होती. पेशवे, शिंदे, तुकोजी यांना लिहिलेल्या पत्रातून, अहिल्याबाई हे सांगत होत्या. पेशव्यांनी याकडे लक्ष देऊन, आपली सेना वाढवावी असे त्यांना वाटत होते. इंग्रजांनी कोकणात हातपाय पसरायला सुरवात केल्यामुळे, त्या चिंतीत होत्या. आपल्या तेथील वकीलांकडून त्या सतत माहिती घेत. इंग्रज बारघाटावर येताच त्यांच्या-विरुध्द कारवाई करण्याचा त्यांचा सल्ला होता. त्यासाठी नबाब, भोसले आणि 'सर्व मराठा सरदारांनी, संयुक्त मोर्चे लावावे' अशी त्यांनी योजना सांगितली होती. वसईच्या वेढ्यांच्या वेळी फ्रेंच कमांडरांची मदत घेऊन, त्यांचे युद्धकौशल्य बघून घ्यावे, असा सल्ला अहिल्याबाईंनी दिला होता. इतके सर्व पुन्हा पुन्हा सांगूनही कोणीच इंग्रजाविरुद्ध पुढाकार घेतला नाही, हे देशांचे दुर्दैव.

अहिल्याबाईंसारख्या दुरदर्शी राज्यकर्तीला जे समजले, ते आपल्या क्षुद्र स्वार्थात लडबडलेल्या पुरुष शासकांना समजले नाही.

(१३-१४) सुभेदार मल्हाररावांचे आर्थिक धोरण सदैव जनतेच्या हिताचे होते. राज्याची तिजोरी मजबूत राखण्याकडे होते. राज्याला समृद्धशाली करण्याकडे होते. आर्थिक दृष्टीने राज्यावर भार पडेल, असे ते काही करत नसत. तेच धोरण अहिल्याबाईंनी आत्मसात केले होते. परंतु तुकोजीकडे मात्र हा दृष्टिकोनच नव्हता. त्यांच्या सैनिकी कारवाया, अत्यंत उधळ्या होत्या. त्यामुळे सरकारी तिजोरीवर भार पडे. शिंदे होळकरांना त्यांच्या हिश्याचे पैसे द्यायची टाळाटाळ करत. होळकरांची मदत घ्यायची पण त्यांना हिस्सा द्यायचा नाही. अशा स्थितीत अहिल्याबाईंनाच पुढाकार घेऊन महादजींना हिश्याची आठवण करून द्यायचे कटू कर्म करावे लागे. त्या अत्यंत चातुर्याने ते करत. पेशव्यांनीही दक्षिणेकडच्या युद्धानंतर ६५ लाख रुपये आणि इलाखे स्वत:कडे घेतले आणि खर्च होळकरांवर टाकला. यामुळे अहिल्याबाईंना शिंदे आणि पेशवे यांनाही स्पष्ट सांगावे लागले. तरी या असामान्य बुद्धिवतीने कुठेही संबंधावर याचे सावट पडू दिले नाही. यासाठी लागणारी खंबीरता त्यांच्याजवळ होती.

(१५-१६) तुकोजी होळकर मद्यपी होते. त्यांचा खूप पैसा व्यसनात खर्च होई. म्हणूनच त्यांचा लगाम अहिल्यादेवींनी हाती ठेवला होता. राज्याचा एक पैसाही अहिल्याबाईंनी घेतला नाही. त्यांचे खाजगी उत्पन्नाचे इलाखे पूर्ण वेगळे होते. त्यातूनही कित्येक करोडो रुपये अहिल्याबाईंनी तुकोजीला दिले. युद्धाला पैसा कधी कमी पडू दिला नाही. 'नीतीने व्यवहार करा' असे त्या पुन्हा पुन्हा, तुकोजीला सांगत. पुढे पुढे हे गुंते इतके वाढले की, तुकोजींनी अहिल्याबाईंची तक्रार पेशव्यांपर्यंत नेली. तेव्हा पेशवे यांनी अहिल्याबाईंना कळवले की, 'राज्याचा येणारा सर्व निधी कुठल्याही सावकार वा मामलेदाराला न देता, पुणे दरबारी पाठवावा.' यावर अहिल्याबाईंनी दिलेले उत्तर म्हणजे त्यांच्या कूटनीतीतज्ज्ञतेचे एक उत्तम उदाहरण आहे. त्यांनी कळवले की "आपले आर्थिक धोरण जर हेच असेल तर, राज्याचा वसूल एकत्र करणारे मामलतदार आणि कर्ज देणारे सावकार पुणे येथे उपस्थित आहेत. त्यांनाच आपण हा निर्देश दिला तर उत्तम होईल." हे करारी उत्तर देतांना, पेशव्यांची राज्यातली ही ढवळाढवळ अहिल्याबाईंना अमान्य होती, हेच त्यांनी या पद्धतीने दाखवून दिले. त्यांना माहित होते की, पेशवे आपल्याला असा निर्देश देवू शकत नाहीत. कारण राज्यातला कर तुकोजीने आगावूच घेतलेला होता. यात एक कूटनीती अशी होती की, अहिल्याबाई सर्व कर पुणे दरबारी पाठवू लागल्या की, सावकारांची देणी अहिल्याबाईंना त्यांच्या खाजगी तिजोरीतून द्यावी


लागतील. त्यांची ही कूटनीतीची चाल ओळखणाऱ्या अहिल्याबाई अधिक कूटनीती जाणत होत्या. परंतु पेशव्यांच्या या निर्देशामुळे तुकोजी आणि अहिल्याबाई यांच्यामधे अधिक मतभेद निर्माण झाले. तुकोजीचे वर्तन राज्यहिताला बाधा पोचवणारे आहे, राज्यहिताच्या विरुद्ध आहे हे अखेर शाबीत झाले. त्याबद्दल १७८८ नंतर तुकोजींनी क्षमा मागितली आहे. (१७)

(१८) पेशवे यांचे महेश्वरमधील वकील, केसो भिकाजी दातार यांनी एका पत्रात पेशवे यांना कळवले की, ''अहिल्याबाई या स्वतंत्र दृष्टिकोनाच्या बुद्धिशाली महिला आहेत. आपल्यातर्फे त्यांचे क्षेमकुशल विचारले तरी त्या आनंदी होत नाहीत. माझी भेटही त्यांना कष्टदायक वाटते. पेशव्यांची ढवळाढवळ आणि विपरित निर्देश यामुळे ती तेजास्विनी व्यथित झाली. दुखावली गेली होती.

मुक्ताबाईचे लग्न, रघुनाथरावांची फजिती, महादजी शिंदे यांच्याशी वाटाघाटी हरिपंत फडके यांनी शपथविधी करायला सांगताच त्यांना दिलेले उत्तर, मल्हाररावांना पुणे दरबारी कर्जनिवारणासाठी पाठवणे, चंद्रावतांचा बीमोड, तुकोजीस वठणीवर आणणे अशा कितीतरी गोष्टी अहिल्याबाईंच्या दूरदृष्टीच्या शहाणपणावर, त्याच्या कूटनीतीच्या अपूर्व जाणीवेवर त्यांनी पार पाडल्या.

म्हणूनच अहिल्यादेवींचे हे चरित्र म्हणजे दूरदृष्टीने मिळवलेल्या यशाची यशोगाथा आहे. पुरुषार्थाने दिलेल्या झुंजीची रोमहर्षक कहाणी आहे.

✡



कुंभेरी (डीग) में अहिल्याबाई के पति खण्डेराव होलकर
की छत्री (एक दुर्लभ रेखाचित्र)




उपरोक्त चित्र लोकमाता अहिल्या की स्मृति में भारत सरकार द्वारा प्रकाशित 250 वें जन्मोत्सव पर महेश्वर छत्री के डाक टिकिट का है। अब सन् 1995 में 200 वीं अहिल्याबाई की पुण्यतिथि वर्ष में उनके चित्र के डाक टिकिट की मांग सम्पूर्ण देश की जनता कर रही है।



सन् 1793 ई. में लाखेरी युद्ध के बाद लोकमाता महारानी अहिल्याबाई होलकर के दरबार में उनका
अभिवादन करते हुए होलकर सेना प्रमुख डुड्रेनेक (फ्रांसीसी) तथा जे.पी. बॉयड (अमरीकी)

अहिल्या स्मारिका १९९५ खासगी ट्रस्ट, इन्दौर द्वारा प्रकाशित




अहिल्याबाई होलकर के सिक्के

तुकोजीराव ( द्वितीय ) के सिक्के


1
2
3
4
5
6
7
8
9
10
11
12
13
अहिल्याबाई होलकर द्वारा प्रसारित सिक्के
क्र. 1 से 5 चाँदी व 6 से 13 ताम्र
यशवंतराव होलकर (प्रथम) द्वारा प्रसारित सिक्के
क्र. 1 से 4 चाँदी व क्र. 5 से 6 ताम्र
1
2
3
4
5
6



क्रमांक १ से ३
अहिल्याबाई होलकर की ताम्रमुद्राएँ

क्रमांक ४
शिवाजीराव होलकर का कुलीश सिक्का

क्रमांक ५ यशवंतराव होलकर (प्रथम) की सील

## कालानुक्रम

अहिल्यादेवींच्या चरित्रातील घटनांची कालसूची. काही ठिकाणी स्थळकाळासंबंधी मतभेद आढळतात. मालेरावास सुभेदारीची वस्त्रे ३ जून १७६६ ला दिली असे श्री. म. श्री. दीक्षित म्हणतात. श्री. हिरालाल शर्मा यांच्या मते २३ ऑगस्ट १७६६ ला दिली. याची कृपया नोंद घ्यावी.

| | |
|---|---|
| मल्हारराव होळकर यांचा जन्म | १६-३-१६९३ |
| मल्हाररावांचा गौतमा बारगळ यांचेशी विवाह | १७२१ |
| अहिल्यादेवींचा जन्म चौंडी या गावी | १७२४-२५ सुमारास |
| गौतमाबाई होळकर यांना तीन लक्षाचा मुलूख | २०-१-१७३४ |
| अहिल्याबाईंचे खंडेराव होळकरांशी लग्न | १७३३ |
| पुत्र मालेराव यांचा जन्म | १७४५ देपाळपूर येथे |
| कन्या मुक्ताबाईचा जन्म | १७४८ |
| बादशहा मराठे करार | १७५२ |
| कुंभेरीची लढाई, खंडेरावांचा मृत्यू वैधव्यदशा | १७-३-१७५४ |
| अहिल्याबाईंचा पुत्र मालेराव याचा विवाह | अंदाजे १७५६ |
| पानिपतचा भीषण रणसंग्राम | १४-१-१७६१ |
| नानासाहेब पेशवे यांचा पुणे येथे मृत्यू | २३-६-१७६१ |
| गौतमाबाईचा मृत्यू | २९-९-१७६१ |
| सासरे मल्हारराव यांचा आलमपूर येथे मृत्यू | २०-५-१७६६ |
| मालेरावास सुभेदारीची वस्त्रे | ३-६-१७६६ |
| मुक्ताबाईचे लग्न यशवंतराव फणसे यांचेबरोबर | १७६६ |
| मालेरावाचा मृत्यू | २७-३-१७६७ |
| राघोबाची अहिल्यादेवींकडून फजिती | १७६७ |
| तुकोजी होळकर यांना सुभेदारी | जून १७६७ |
| मुक्ताबाईस पुत्रप्राप्ती | १७६७ |
| माधवराव पेशवे यांचा मृत्यू, रमाबाईंचे सहगमन | १८-११-१७७२ |
| नारायणराव पेशवे यांचा खून | ३०-८-१७७३ |
| गंगाबाईंच्या नांवे द्वाही बारभाई कारभार | १८-१-१७७४ |
| सवाई माधवरावांचा जन्म | १८-४-१७७४ |
| अहिल्याबाईंना नातू नथोबा याचे लग्न | १७८० |
| महादजी शिंदे आणि अहिल्याबाई यांची भेट | १७८० अखेर |

| | |
|---|---|
| चंद्रावतांचा बीमोड - सोभागसिंहास तोफेच्या तोंडी | १७८३ |
| राजपुतांचा बीमोड - विजय | १७८७ |
| नथोबाचा अपमृत्यू - नातसुना सती. | १५ सप्टेंबर १७८७ |
| जावई फणसे यांचा मृत्यू, मुक्तेचे तिच्या दोन सवतींसह सहगमन | ३-११-१७९१ |
| होळकर आणि शिंदे यांच्यात लाखेरीस लढाई - पराभव | १७९२ |
| महादजी शिंदे यांचा मृत्यू | १२-२-१७९४ |
| खर्डा येथील लढाई श्रीमंत पेशवे यांचा विजय | मार्च १७९५ |
| पुण्यश्लोक कर्मयोगिनी लोकमाता अहिल्यादेवींचे महानिर्वाण | १३-८-१७९५ |

आणि नेमके साल, महिना, दिवस माहित नसणाऱ्या अनेक सुधारणा, अनेक बांधकामे, विहिरी, धर्मशाळा! रोजचीच तारीख... काहीतरी सत्कर्म त्या दिनावर रेखलेले आहेत. किती लिहावे? किती सांगावे?

✡

## अहिल्याबाईंच्या जीवनात आलेल्या प्रमुख व्यक्ति - नातेवाईक

| | |
|---|---|
| सुभेदार मल्हारराव होळकर | - सासरे |
| गौतमाबाई उर्फ बाईजी | - सासूबाई |
| द्वारकाआई, बनाआई | - गौतमाबाईंच्या सवती, अहिल्याबाईंच्या सावत्र सासू |
| हरकुँवर उर्फ हरकूआई | - मल्हाररावांच्या तलवारीशी लग्न करून आलेली स्त्री. तिला खांडाराणी म्हणत. अहिल्याबाईंचे नाते हरकुँवर आईशी सासूचे. पण त्या अहिल्याबाईंपेक्षा फक्त चार वर्षांनी मोठ्या होत्या. |
| खंडेराव होळकर | - अहिल्याबाईंचे पति. मल्हाररावांचे कुळपुत्र |
| उदाबाई, सीताबाई | - अहिल्याबाईंच्या नणंदा. मल्हाररावांच्या मुली |
| मालेराव होळकर | - अहिल्याबाई आणि खंडेराव यांचा एकमेव कुळपुत्र |
| मुक्ता | - अहिल्याबाई आणि खंडेराव यांचा एकमेव कन्या |
| यशवंतराव फणसे | - मुक्ताचे पति - अहिल्याबाईंचे जावई |
| नथोबा फणसे | - मुक्तेचा पुत्र, अहिल्याबाईंचा नातू |
| मैना आणि पिरता | - मालेराव होळकरच्या बायका, अहिल्याबाईंच्या सुना |
| बाळाबाई आणि गौरी | - नातू नथोबाच्या बायका, अहिल्याबाईंच्या नातसुना |
| तुकोजी होळकर | - हे मल्हाररावांचे दासीपुत्र. अहिल्याबाई त्यांना 'चिरंजीव' असे संबोधित. परंतु दत्तकविधान झाल्याचा पुरावा नाही. पुत्र मालेरावाच्या मृत्यूनंतर बेवारस झालेली सुभेदारी, अहिल्यादेवींनी तुकोजी होळकरांना तत्परतेने देऊन चालू ठेवली. |
| संताजी होळकर | - तुकोजीचे बंधू |
| भरमलदादा होळकर | - मल्हाररावांचे दासीपुत्र |
| काशीराव आणि मल्हार | - तुकोजीरावांचे कुळपुत्र |
| यशवंतराव होळकर | - तुकोजी होळकरांचा दासीपुत्र |
| बापू होळकर | - तुकोजी होळकरांचा पुतण्या. |

✡

## कारभारी

१. गंगाधर चंद्रचूड उर्फ गंगोबा तात्या- यांनी रघुनाथरावांना पत्र लिहून इंदौरवर युद्ध करायला प्रवृत्त केले. मालेरावांच्या मृत्यूनंतर राज बेवारस झाले त्यावेळी हे पत्र लिहून देवींशी फितूरी केली.

२. अन्याबा पळशीकर
३. मुकुंद हरी
४. रामजी यादव
५. गणेश विठ्ठल
६. शरीफभाई
७. अन्याबा पळशीकर
८. अप्पाजी जगदेव
९. राजाराम रणछोड
१०. रावजी महादेव
११. विसाजी शामराज
१२. केसो भिकाजी
१३. गोविंदपंत
१४. नारो गणेश

## अहिल्याबाईंच्या कारकिर्दीत झालेले पेशवे

१. बाजीराव पेशवे
२. नानासाहेब पेशवे
३. माधवराव पेशवे
४. नारायणराव पेशवे
५. गंगाबाईंच्या नांवाने द्वाही बारभाईंचा कारभार
६. सवाई माधवराव पेशवे - सवाई माधवरावांची कारकीर्द संपायच्या आतच अहिल्याबाईचे देहावसान झाले.
७. रघुनाथराव पेशवे - हे नानासाहेब पेशव्यांचे बंधू - माधवराव पेशव्यांचे काका - यांचा आणि माधवरावांचा गृहकलह विकोपास गेला होता.

✡

# ग्रंथसूची

*खालील ग्रंथांचे मला बहुमोल सहाय्य झाले. त्या ग्रंथकर्त्यांची मी मनापासून ऋणी आहे.*


१. पुण्यश्लोक अहिल्या........................ श्री. म. श्री. दीक्षित
२. अहिल्याबाई ................................श्री. हिरालाल शर्मा
३. अहिल्याबाई चरित्र.......................... श्री. पुरुषोत्तम
४. होळकरांची कैफियत .........................श्री. यशवंत नरसिंह केळकर
५. होळकरशाहीच्या इतिहासाची साधने ........संपादक, अनंत ना. भागवत
६. पेशवेकालीन महाराष्ट्र......................... श्री. वासुदेव कृष्ण भावे
७. महेश्वर दरबारची बातमीपत्रे .....................श्री. द. बा. पारसनीस
८. भाऊसाहेबांची बखर........................ श्री. भालचंद्र सोहोनी
९. अहिल्याबाई चरित्र.......................... श्री. मुकुंद वामन बर्वे
१०. पुणे शहराचे वर्णन.......................... श्री. ना. वि. जोशी, (या पुस्तकावरून)
११. होळकरांची थैली............................ श्री. बाळ सामंत यांनी लिहिलेला लेख. लोकसत्ता - ३०-९-९०)
१२. थोरले मल्हारराव यांचे चरित्र ..................नांव नाही. पाने फाटली होती.
१३. मराठी रियासतीचे भाग ...................... श्री. गो. स. सरदेसाई
१४. पेशवाईतील रत्ने ............................ श्री. म. श्री. दीक्षित
१५. कर्मयोगिनी...................................सौ. विजया जहागीरदार
१६. लोकमाता ......................................सौ. विजया जहागीरदार
१७. पुण्यश्लोक लोकमाता अहिल्यादेवी ......... डॉ. उदयभानू शर्मा यांच्या पुस्तकाचा अनुवाद कै. कुमार कोठावळे
१८. कूटनीतीज्ञ अहिल्यादेवी हा लेख प्रा. डॉ. शशिकान्त भट्ट, संशोधक तथा जर्नल ऑफ मालवा इतिहास परिषद यांच्या लेखावर आधारित असून कंसात दिलेल्या आकड्याचे विवरण पुढे केलेले आहे.
   १) वही - लेखांक १३ - पान १६३
   २) वही - पान १३
   ३) होळकरांच्या इतिहासाची साधने - भाग १ - पान १८३

४) वही - लेखांक ११५ - पान २२८

५) वही - लेखांक १४८ - पान २५०

६ ते ९) वही - पान १४० - पान १३८ - पान १३९ - पान १४०

१० ते १२) महेश्वर दरबारची बातमीपत्रे पान १६ ते २१, ३३, ३४, वही - पान ६७

१३-१४) महेश्वर दरबारची बातमीपत्रे - भाग २, लेख ६ - पान ७ Life and Life Works

१५-१६) होळकरांचा इतिहास भाग १ - पान २०२-२०३

होळकरांच्या इतिहासाची साधने भाग १ - २४६, २४७, २२६, २८६

१७) वही - पान २९४, २८६, ३३९, ३६६-३९०

१८) महेश्वर दरबारची बातमीपत्रे - भाग २

मी लेखकाची आभारी आहे

श्री. डॉ. गणेश शंकर मतकर - यांनी देवी अहिल्याबाई होळकर चॅरिटीज् ट्रस्टतर्फे प्रकाशिक होणारे 'अहिल्या स्मरणिका'चे अंक मला दिले त्यातील माहितीचा मला खूप उपयोग झाला मी त्यांची मन:पूर्वक आभारी आहे.

या चरित्रात अहिल्यादेवींचे काही संवाद आणि मते त्यांनी लिहिलेल्या वेगवेगळ्या पत्रव्यवहारात आलेली आहेत. चरित्राचे वाचन करणाऱ्या वाचकांच्या सुविधेसाठी मी त्यांचा संवादात उपयोग केला आहे. इतकी पत्रे देणे आणि वाचणे शक्य नव्हते पत्रे - ही एकूण २६ पत्रे मराठीत असून 'अहिल्या स्मरणिके' च्या १९७५ या अंकात प्रसिद्ध झाली आहेत. ही पत्रे खालील ग्रंथातून घेतली आहेत

१) महेश्वर दरबारची बातमीपत्रे भाग १

२) चंद्रचूड दप्तर

३) चंद्रचूड दप्तरापैकी निवडक उतारे

लेखक - श्री. रामसेवक गर्ग

मी लेखकाची मन:पूर्वक आभारी आहे.

✡



## लेखिकेविषयी थोडेसे-

- दहा कादंबऱ्या, तीन लेखसंग्रह, सात कथासंग्रह, दोन कथाचरित्रे, दोन रंजक विज्ञानाची पुस्तके, सहा काव्यसंग्रह, चौदा बालसाहित्याची पुस्तके. एकूण ४४ पुस्तके प्रसिद्ध.
- पुरस्कार- महाराष्ट्र शासनाचे उत्कृष्ट वाङ्मयाचे पुरस्कार -
१) भिरभिरं, २) हिरकण्या, ३) लपाछपी भाग-१, ४) लपाछपी भाग-२.
- मध्यप्रदेश साहित्य अॅकॅडमीचा सात हजाराचा भा. रा. तांबे पुरस्कार. पाच वर्षातले उत्कृष्ट पुस्तक असा हा पुरस्कार कर्मयोगिनी. (अहिल्यादेवी होळकर यांच्यावरील चरित्र कादंबरी)
- बालकुमार साहित्य संमेलनाचा पुरस्कार - मोहरांचं झाड.
- कवि रा. ना. पवार पुरस्कार - स्त्रीनक्षत्र (काव्यसंग्रह)
- महाराष्ट्र शासनाच्या नाट्यस्पर्धेत दुसरे आलेले नाटक - तूच माझा नंद.
- नाट्यपरिषदेचे तीन पुरस्कार -
उत्कृष्ट नाटक, उत्कृष्ट संवाद, उत्कृष्ट गीते.
- महाराष्ट्र शासनातर्फे कॅसेट प्रसिद्ध -
जनाचे श्लोक. गायक - रविंद्र साठे, उत्तरा केळकर, संगीत-प्रभाकर पंडित.
- शासनातर्फे व्हिडीओ कॅसेट प्रसिद्ध - कहाणी -सुमीकुमीची. (स्त्री शिक्षण, योग्य वयात लग्न, योग्य वयात अपत्य, जबाबदार पालकत्व)
- सोलापूर आकाशवाणीवर क्रमशः श्रुतीकथेच्या रूपात कांदबरी ययातिकन्या माधवी.
- सोलापूर आकाशवाणीवर यातील श्रुतिकथा 'वेंधळी'
- मुंबई आकाशवाणीवर अडीच वर्षे बालदरबार या कार्यक्रमात मुलांसाठी 'कोडी'
- मुंबई आकाशवाणीवर म्युझिकल फीचर्स.
- मुंबई मराठी बालसाहित्य परिषदेची अध्यक्ष (माजी)
- साहित्य परिषद सोलापूर या संस्थेत उपाध्यक्षा आहे,
- अहिल्यादेवी होळकरांच्या जीवनावर नाट्याभिवाचनाचे कार्यक्रम गाथा कर्मयोगिनीची. (अनेक प्रयोग होत आहेत)
- स्तंभलेखन-कथा-कविता-लेख-अनेक मासिकातून-
- आकाशवाणी रेकॉर्डस् - गायक : उत्तरा केळकर, सुरेश वाडकर, चारूशीला बेलसरे, देवकी पंडित, शोभा जोशी वगैरे-
- काव्यगायनाचे अनेक कार्यक्रम -